श्रीयशोधरचरित्र.

[illegible]

ॐ

श्रीयशोधरचरित्र.

अप्रादुर्भावः खलु रागादीनां भवत्यहिंसेति ।
तेषामेवोत्पत्तिर्हिंसेति जिनागमस्य संक्षेपः ॥

लेखक

श्रीयुत हिराचंद अमीचंद शहा, सोलापूर.

प्रकाशक

शेठ हरीभाई देवकरण गांधी, सोलापूर.

सन १९१३ श्रीवीरनिर्वाण सं० २४३९.

किंमत ८ आणे.

मुंबईंत

निर्णयसागर छापखान्यांत छापवून प्रसिद्ध केलें.

Printed by R. Y. Shedge, at the Nirnaya-sagar Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

Published by Sheth Haribhai Dewakarana Gandhi,
Sholapur.

समर्पण ।

श्री

ज्यांच्या प्रेरणेनें हें चरित्र लिहिण्याचें काम हातीं घेण्यास मला स्फूर्ति झाली, ते माझे मित्र

श्रीयुत जिवराज गौतमचंद दोशी

यांस हें पुस्तक प्रेमादरपुरःसर अर्पण केलें आहे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना.

माझें पहिलें पुस्तक 'जैनकथासुमनावली' भाग १ ला लिहिलें गेल्यानंतर बरेच दिवसांनीं ह्मणजे सुमारें २॥ वर्षांनीं ही माझी दुसरी कृति वाचकांच्या नजरेसमोर येत आहे, आणि तीहि माझे मित्र रा. जिवराज गौतमचंद यांच्या आग्रहपूर्वक प्रेरणेवरून. वाङ्मयसेवा करण्याची माझी पहिल्यापासूनच अत्युत्कट इच्छा; परंतु विचित्र कर्मोदयानुसार परिस्थितीहि बदलत चालली आणि त्यामुळें माझ्या इच्छेप्रमाणें वाङ्मयसेवेचें कार्य मधल्या काळांत मजकडून कांहीं घडून आलें नाहीं. जैनकथासुमनावलीच्या प्रस्तावनेंत अभिवचन दिल्याप्रमाणें त्या पुस्तकाचा दुसरा भाग अझूनपर्यंत हातीं न घेण्यास बदललेली परिस्थिति हेंच कारण होय, हें येथें विषय नसतांहि नमूद करणें मला जरूर वाटतें.

'अहिंसा परमो धर्मः' हें दयामूलक तत्व जैनधर्मामध्यें फारच सूक्ष्मरीतीनें निरूपिलें गेलें आहे हें यद्यपि खरें आहे, तथापि अहिंसेचें तत्व थोड्याबहुत प्रमाणानें इतर सर्व धर्मीयांसहि मान्य आहे. परंतु धर्माच्या समजुतीखालीं व इतर कांहीं मूर्खपणाच्या समजुतीखालीं आज बरेच वर्षांपासून अन्यधर्मीयांमध्यें दीन मुक्या प्राण्यांची हिंसा चालत आली आहे; विशेषेंकरून दसऱ्याच्या सणामध्यें तर ती अनिवार होते. या प्रकारास कांहीं तरी आळा बसावा या हेतूनें त्यास अनुरूप अशी एखादी आमच्या धर्मशास्त्रांतील कथा लिहून काढून ती प्रसिद्ध करण्यांत यावी, अशी येथील नगरशेठ श्रीयुत वालचंद रामचंद (शेठ हरीभाई देवकरणवाले) यांनीं आपली इच्छा प्रदर्शित केली व प्रस्तुतची कृति हें त्यांच्या इच्छेचेंहि पण फळ आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील कथा पौराणिक आहे हें ओघानें वर सांगितलेंच आहे. यांतील भवांतराची कल्पना व इतर कांहीं प्रसंग अलीकडील इंग्लिश शिक्षणाचा परिचय झालेल्या मनूस श्रद्धेय होणार नाहींत, हें मी जाणून आहें. तथापि मला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नसून जीवहिंसेपासून काय परिणाम होतात, हेंच मूळ ग्रंथकारास दाखवावयाचें असल्यामुळें मीहि पण तोच हेतू समोर ठेवून हें चरित्र लिहिलें आहे.

हें पुस्तक कोणत्याहि एका ग्रंथाचें भाषांतर नव्हे; पुष्पदंतकविकृत एका छापील हिंदी प्रतीचा, जी लाला गिरनारीलाल जैन मुकाम टीहरी जि. गढवाल द्वारा प्रकाशित केली गेली आहे, व सोमकीर्ति आचार्यकृत हस्तलिखित संस्कृत प्रतीचा आधार घेऊन स्वतंत्रपणें हें पुस्तक रचिलें आहे.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं व यांतील चित्रांची कल्पना सुचविण्याचे व चित्रांच्या डिझाइन्समध्यें योग्य तो फेरफार सुचविण्याचे कामीं माझे मित्र रा. जिवराज गौतमचंद, पंडित वंशीधर, गुरुवर्य पार्श्वनाथ शास्त्री यांनीं जी वेळोवेळीं मदत केली, त्याबद्दल मी त्या सर्वांचा फार ऋणी आहें. तसेंच, यांतील चित्रें मुंबईतील प्रसिद्ध चित्रकार श्रीयुत एम्. व्ही. धुरंधर यांनीं फार काळजीपूर्वक व अत्यंत परिश्रमानें तयार करून दिलीं, याबद्दल प्रस्तुतस्थलीं त्यांचेहि पण आभार मानणें मी आपलें कर्तव्य समजतों.

प्रस्तुतची कृति वाचकवर्गास पसंत पडल्यास आणखीहि कांहीं उपदेशपर पौराणिक चरित्रें सवडीप्रमाणें लिहून काढण्याचा माझा विचार आहे.

सोलापूर
माघ शु. १४ गुरुवार,
संवत् १९६९ श्रीवीर-
निर्वाण संवत् २४३९.

हिराचंद अमीचंद शहा.

श्रीवीतरागाय नमः

श्रीयशोधरचरित्र.

भाग पहिला.

जंबुद्वीपांतील भरतक्षेत्रामध्यें सर्व धनधान्यसमृद्ध असा योधेय नांवाचा एक देश असून त्यामध्यें अत्यंत रमणीय असें राजपूर नांवाचें शहर होतें. तेथें मारिदत्त नामें राजा राज्य करित असे. तो मोठा शूर धीर चतुर असून प्रजापालनदक्ष होता. परंतु त्याचें सर्व प्रधानमंडळ अन्यधर्मानुयायी असल्यामुळें त्यांच्या निरंतर सहवासानें अर्थातच त्यासहि मिथ्यामार्गाची गोडी लागली. अशा प्रसंगीं त्या शहरांत कोणी एक जोगी आपल्या शिष्यसमूहासह आला. मस्तकीं जटा वाढविली आहे, सर्वांगास राख फासली आहे, हातामध्यें त्रिशूल धारण केलें आहे, चर्मकंथेनें आपलें सर्वांग आच्छादित केलें आहे, गळ्यामध्यें रुद्राक्षादिकांच्या मोठमोठ्या माळा लटकत आहेत, एकंदरींत ज्यायोगें सर्व लोकांस मोह पडून ते आपल्या भजनीं लागतील असे सर्व ढोंगसोंग त्यानें अमलांत आणिले होते. तुम्ही ह्मणाल, नुसतें बाह्य ढोंग सोंग करूनच तो स्वस्थ राहिला असेल, परंतु तसें नाहीं. त्याची मजल याहीपेक्षां पुढें गेली होती; त्यानें या बाह्य ढोंगसोंगाबरोबरच मोठमोठ्या अभूतपूर्व व अकल्प्य अशा गप्पा मारून लोकांना भुरळ पाडण्यास सुरवात केली होती. लोकहि त्याच्या या बाह्य स्वरूपास भुलून जाऊन त्याच्या गप्पांवर विश्वास ठेवित होते. लोकांना भुरळ पाडण्याची त्यानें कोणतीहि संधि वाया जाऊं दिली नाहीं.

कांहीं प्रसंगीं स्वतः, तर कांहीं प्रसंगीं आपल्या शिष्यमंडळद्वारें तो आपलें महत्व वाढविण्याचा सारखा प्रयत्न करित असे. त्यास शिष्यमंडळहि असें मजेदार मिळालें होतें कीं आपल्या गुरूसंबंधानें अंतःस्फोट न होऊं देण्याविषयीं इतकेंच नव्हे, तर आपल्या गुरूचें महत्व प्रस्थापित करण्याविषयींच ते प्रयत्न करित असत. अशा रीतीनें चोहोंकडून त्यास अनुकूल साधनें मिळत गेल्यामुळें आपल्या कार्यसिद्धीच्या कामीं त्यास फारसा आयास पडला नाहीं. त्याच्या गप्पांचे कांहीं मासले या स्थळीं दिले असतां अप्रस्तुत होणार नाहीं असें आह्मांस वाटतें. तो ह्मणत असे कीं, "मी अत्यंत प्राचीनकाळापासून तसाच अमर राहिलों आहें; रामलक्ष्मणाच्या काळीं माझें अस्तित्व असून त्यांचें प्रत्यक्ष दर्शन मला झालें आहे; त्या वेळच्या कित्येक गोष्टी अझून मला आठवतात; ब्रह्मा, विष्णु, महादेव यांच्या स्थानीं जाण्याची मला शक्ति असून कित्येक वेळां त्यांच्या सभेमध्यें जाऊन त्यांच्याशीं मी वादविवादही केला आहे; मला जारण मारण उच्चाटणादि सर्व मंत्रतंत्र चांगले अवगत असून त्यायोगें माझ्या ठिकाणीं इतकी अपूर्व शक्ति प्राप्त झाली आहे कीं, मला वाटेल त्यास येथून मोक्षपदास पोहोंचवितां येतें; प्रत्यक्ष ब्रह्मा, विष्णु वगैरे देवांनींहि याच मार्गानें मोक्षप्राप्ति करून घेतली असून त्या ठिकाणीं हल्लीं ते आनंदांत नांदत आहेत; मला जरा नाहीं व मृत्यूहि नाहीं, मी स्वयंभू व तरुण दशेंतच उत्पन्न झालों असून तीच स्थिति अझूनहि माझी कायम आहे व पुढेंहि राहील; मी जर कोणावर रुष्ट झालों तर त्याचें एका क्षणांत निर्मूलन करून टाकीन; इतकेंच नव्हे, तर त्यास या दुनयेंत पुन्हां जन्म देखील घेऊं देणार नाहीं, अखंड रौरव नरकवासांतच त्यास लोळावयास लावीन, इतकें अपूर्व सामर्थ्य मजमध्यें आहे; मी प्रत्यक्ष लंकेलासुद्धां जाऊन आलों, तेथें रावण बिभीषणादिकांनीं माझा अपूर्व सन्मान केला; सारांश सर्व जगाला हलवून सोडण्याचें व सर्व देवादिकांवर

सुद्धां हुकमत चालविण्याचें मजमध्यें सामर्थ्य आहे." अशा अनेक तऱ्हेच्या वल्गनांनीं तो लोकांस भुरळ पाडित असे. त्याचें नांव भैरव असें होतें. पुष्कळशा अज्ञानी लोकांनां त्याच्या या वल्गनेंत खरेपणा वाटून ते त्याच्या अहोरात्र भजनीं लागले होते. केवळ आपलें महत्व वाढविण्याकरितां सत्यासत्यतेची चाड एकीकडेस ठेऊन लोकच्छंदानुषंगानें आपल्या वर्तनक्रमांत नेहमीं फेरबदल करणाऱ्या अशा बऱ्याच व्यक्ति जगामध्यें आढळून येतात, आणि लोकहि इष्टानिष्टतेचा विचार बाजूस ठेवून अंधपणानें त्यांच्या भजनीं लागून आपल्या जन्माचें मातेरें करून घेतात; जगामध्यें बऱ्या वाईट, खऱ्या खोट्या गोष्टींचा विचार करून त्यांतून सार काढणारे फारच थोडे लोक असावयाचे, हा सृष्टिनियमच दिसतो. असो.

अशा रीतीनें तो जोगी आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करित असतां शहरांतील अज्ञान लोक त्याच्या तावडींत सापडले यांत कांहीं विशेष नाहीं; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, सुमंत, मंत्री वगैरे मोठमोठे राजाधिकारी व इतर शिष्टलोकहि क्रमाक्रमानें त्याच्या तावडींत सांपडून ते सर्व त्याच्या दर्शनाकरितां रोज जाऊं येऊं लागले. भैरव जोग्यानें या सर्व लोकांवर आपली इतकी विलक्षण छाप बसविली होती कीं, लोकांच्या इतर नित्य क्रियेमध्यें त्याचें दर्शन घेणें हें एक प्रमुख होऊन बसलें. अशा स्थितींत कांहीं दिवस लोटल्यावर राजाधिकाऱ्यांना भैरव जोग्यासंबंधचा वृत्तांत राजास कळवावासा वाटला व त्याप्रमाणें एके दिवशीं राजा सभेंत येऊन स्थानापन्न झाल्यावर त्यांनीं त्यास विनंतीपूर्वक म्हटलें कीं, "महाराज, आपल्या शहरांत अपूर्व सामर्थ्य धारण करणारा व अनेकविद्यापारंगत असा भैरव नामें एक जोगी आला आहे. आम्ही त्याचे दर्शनास गेलों होतों त्या वेळीं त्याची विवेचनपद्धति, निर्विकारता, शांत व गंभीरस्वरूप वगैरे पाहून आम्ही फार खुष झालों. ब्रह्मा, विष्णु, महेश, रामलक्ष्मण, रावण

इत्यादिकांना तो समक्ष पाहिल्याचें सांगत आहे. अनेक विद्येमध्यें तो पारंगत असल्यामुळें त्याच्या या सांगण्यांत आम्हांस कांहीं अतिशयोक्ति भासली नाहीं. त्यानें त्या देवादिकांस पाहिलें असावें अशी आमची पूर्ण खात्री आहे. महाराज ! त्याचा पराक्रम काय वर्णावा ! आपणां सर्वांच्या पुण्याईनें साक्षात् परमेश्वरच दर्शन देण्याकरितां या समयीं प्राप्त झाला असावा असें आम्हांस वाटतें. महाराजांनीं त्याचें एक वेळ अवश्य दर्शन घेऊन नेत्राचें पारणें फेडावें अशी त्यांस आमची नम्र विनंति आहे." मंत्र्यांचे तोंडून त्या जोग्याचें असें हें कल्पनातीत व आश्चर्यचकित करणारें वर्णन ऐकून राजा त्या जोग्याचें दर्शन घेण्याविषयीं अत्यंत उत्सुक झाला. व त्यानें तत्काल आपले प्रधानास त्यास दरबारीं घेऊन येण्याविषयीं आज्ञा केली. राजाज्ञेप्रमाणें ते प्रधान मोठ्या लवाजम्यासह त्या जोग्याकडे गेले व त्यांनीं त्यास विनंतिपूर्वक राजाचा संदेश कळविला. राजाचें निमंत्रण पाहून त्यास अंतर्यामीं आनंद तर झालाच, परंतु आपली निर्लोभता, निरपेक्षता, व्यक्त करण्याच्या हेतूनें अत्यंत बेपर्वाईच्या मुद्रेनें त्यानें प्रधानांच्या ह्मणण्यास बराच वेळपर्यंत आढेवेढे घेतले व अखेर अत्यंत आग्रहामुळें आपणास यावें लागत आहे असें त्यांस दाखवून तो त्यांचेबरोबर राजदरबारीं जाण्यास निघाला. राजदरबारीं येतांच राजासह तेथील सर्व मंडळीनें उत्थापनादि विधीनें त्याचा आदरसत्कार केला व राजानें त्यास आपल्या जवळच एका आसनावर बसविलें. थोड्या वेळांत स्थिरस्थावर झाल्यानंतर राजानें उठून आपल्या भाषणास सुरवात केली. तो ह्मणाला, "महाराज ! आपल्यासारख्या अतुलपराक्रमी व दैवी शक्तीच्या मनुष्याच्या दर्शनलाभाचा सुयोग मला आज प्राप्त झाला याबद्दल मी स्वतःस अत्यंत धन्य समजतों. आपण मज पामराच्या निमंत्रणास मान देऊन या दरबारीं येण्याची तसदी घेतली व अशा रीतीनें आह्मांस अत्यंत ऋणी करून ठेविलें. तें ऋण फेडणें

आमच्या मानवी शक्तीच्या बाहेरचें असून अशा प्रसंगीं नुसत्या आभार-प्रदर्शनाखेरीज दुसरा कोणताच मार्ग आह्मांस खुला नसल्यामुळें मीसुद्धां या वेळेस त्याच मार्गाचें अवलंबन करित आहें. महाराज ! आपल्या चरणधूलीनें आज माझें घर अत्यंत पवित्र झालें. आपल्या दर्शनानें मला आज जो आनंद होत आहे तो वर्णन करण्यास मी असमर्थ आहें. महाराज ! आपणास कोणकोणत्या दैविकविद्या प्राप्त झाल्या आहेत यासंबंधीं प्रश्न केला असतां तो अयोग्य होणार नाहीं असें मला वाटतें; तरी कृपा करून माझी इच्छा पूर्ण करावी ही विनंति आहे." राजाचें हें मधुर व विनयपूर्ण भाषण ऐकून त्या महाधूर्तास आनंद झाला व तो ह्मणाला "राजन् ! तुझी इच्छाच आहे तर ऐक. मी जारण, मारण, उच्चाटण, स्तंभन, वशीकरण, आकाशगमन वगैरे अनेक विद्येमध्यें पारंगत आहे, किंबहुना मला अज्ञात अशी एकही विद्या या भूतलावर अस्तित्वांत नाहीं असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. राजन् ! जास्त काय सांगूं ? हे इंद्रअहमिंद्रादिक देव सर्व माझे समक्ष झाले आहेत. मी अमर असल्यामुळें या भूतलावरील एकहि वस्तु मला अज्ञात असणें शक्य नाहीं. एवढेंच सांगितलें असतां माझ्या ज्ञानाची व शक्तीची थोरवी किती आहे, याची तुला सहज कल्पना होईल." राजा हें वर्णन ऐकून स्तब्धच झाला. नंतर कांहीं वेळानें तो म्हणाला, "महाराज, आपण अतुलपराक्रमी आहांत, सर्व विद्यांचे ज्ञाते आहांत, त्याअर्थी मला जर आकाशगामिनी विद्या साध्य करून द्याल तर अखेरपर्यंत मी आपला शिष्य होऊन राहीन." राजाचें हें बोलणें ऐकून तो जोगी म्हणाला, "राजन्, तुझ्या इच्छेनुरूप तुला आकाशगामिनी विद्या साध्य करून देईन यांत कांहीं मोठेंसें नाहीं. पण अट हीच आहे कीं माझ्या आज्ञेनुसार तूं वागण्यास तयार झालें पाहिजे. मी सांगेन त्याप्रमाणें अक्षरशः वर्तलें पाहिजे. कोणाचीही भीडमुरवत धरतां उपयोगी नाहीं. तुला याप्रमाणें

प्रतिज्ञाच घेतली पाहिजे. मी तुला खात्रीनें सांगतों कीं तूं जर माझ्या सांगण्याप्रमाणें वर्तशील व मीं दाखविल्याप्रमाणें विद्येचें विधान करशील तर संपूर्ण पृथ्वींतील लोक राजेरजवाडे वगैरे सर्व तुझ्या अंकित झालेच म्हणून समज." हें ऐकून राजाच्या तोंडास पाणी सुटलें व तो म्हणाला, "महाराज ! आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे, आपल्या इच्छेबाहेर मी मुळींच नाहीं" असें म्हणून त्यानें त्या जोग्यानें सांगितल्याप्रमाणें अट कबूल केली. जोग्यास हें पाहून थोडासा धीर आला व तो म्हणाला, "राजन् ! तूं म्हणतोस ती विद्या साध्य करून घ्यावयाची असल्यास पहिल्यानें जगांतील सर्व जातींच्या जलचर, स्थलचर, नभचर वगैरे प्राण्यांच्या नरमादीचें एकेक जोडपें आणवून त्या सर्वांचा तुझी जी कुलदेवता असेल तिला बली दिला पाहिजे व नंतर मी सांगेन त्या विधीनें पूजनादिक क्रिया करावयास पाहिजे." हें ऐकून मारिदत्त राजाची फार चमत्कारिक स्थिति झाली. जोग्यास काय उत्तर द्यावें हें त्यास सुचेना. एकीकडे विद्येच्या मोहानें त्यास घेरलें होतें तर दुसरीकडे निष्कारण हजारों प्राण्यांचा वध होणार म्हणून त्याचें मन अत्यंत कंपायमान झालें होतें. मनाच्या अशा द्विविध स्थितींत तो सांपडल्यामुळें फार विवंचनेंत पडला. परंतु दर्शनमोहनीय कर्माच्या तीव्र उदयामुळें त्यास विद्येच्या मोहानेंच घेरलें, अखेर त्यानेंच आपली सर केली व राजा अखेर त्या जोग्याच्या म्हणण्यास कबूल झाला. वाचकहो ! सदसद्विवेकबुद्धीच्या-सारासार विचारशक्तीच्या-अभावीं कसे दुष्परिणाम घडून येतात, आपलें डोकें ठिकाणावर न ठेवल्यानें मनुष्य अनीतीच्या फेऱ्यांत कसा सांपडतो, पाखंडी लोकांच्या नादीं लागल्यानें धर्माधर्माच्या शोधकतेस कसा फाटा मिळतो, याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. व्यवहारामध्यें अशा तऱ्हेचे मनाला भुरळ पाडणारे प्रसंग अनेक येतात त्या वेळींच मनाची खरी परीक्षा होते. मनुष्य हंसस्वभावी आहे, कीं काकस्वभावी आहे, याचा निर्णय तेव्हांच

लागतो, आणि अशा वेळीं जो योग्य तऱ्हेनें प्रसंगांतून निभावून जातो तोच खरा शहाणा—मार्मिक—समजला जातो. असो.

राजानें नंतर आपल्या प्रधानास बोलावून जोग्यानें सांगितल्याप्रमाणें सर्वतऱ्हेचीं जोडपीं आणविण्याचा त्यास हुकूम केला, व राजाज्ञेप्रमाणें प्रधानानें चोहोंकडे दूत पाठवून थोड्याच दिवसांत सर्व जोडपीं आणवून तीं देवीच्या देवळांत बलीप्रीत्यर्थ सज्ज करून ठेविलीं व त्याप्रमाणें राजास संदेश पाठविला. हा संदेश ऐकतांक्षणींच राजाहि तत्काळ पुढील विधीकरितां आपले सर्व आप्तमित्र सेवक वगैरे परिवार बरोबर घेऊन त्या जोग्यासहवर्तमान देवीच्या देवळांत जाण्यास निघाला. देवळाचें आवार फार जंगी होतें व त्या आवारांतच सर्व प्राण्यांस धरून आणून ठेविलें होतें. राजा देवळांत पाऊल घालतो तोंच सर्व प्राण्यांचा एकसारखा होत असलेला भयंकर आक्रोश त्याचे कानीं आला. तो हृदयद्रावक आक्रोश प्रत्येकाचें चित्त विदारण करित होता. राजाचेंहि चित्त या प्रकारानें थर्रर झालें, परंतु करतो काय ? एकतर विद्येचा मोह आणि शिवाय त्या जोग्यानें राजावर आपली इतकी विलक्षण छाप बसविली होती कीं, त्यास त्या कल्लोळाकडे दुर्लक्ष करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. नंतर पहिल्यानें राजानें देवीस नमस्कार केला व आपले मनोरथ सफल होऊं देण्याविषयीं तिची अनन्यभावें प्रार्थना करून तो बाहेरील मंडपामध्यें आपल्या स्थानीं जाऊन विराजमान झाला. सर्व मंडळी स्थानापन्न झाल्यावर त्यानें भैरवजोग्यास अंगीकृत कार्यास आरंभ करण्याविषयीं सुचविलें, तेव्हां तो जोगी ह्मणाला, "देवीसन्मुख सर्व बली द्यावयाचे प्राणी हजर करवा ह्मणजे हननास आरंभ होईल." लागलीच त्यानें त्याप्रमाणें करण्याविषयीं आपल्या सेवकांस आज्ञा दिली, व सेवकवर्ग राजाज्ञेप्रमाणें सर्व बली देवीसन्मुख करित असतां तो जोगी सर्व जोडपीं आहेत कीं नाहींत हें न्याहाळून पाहूं

लागला. अशा रीतीनें तो पहात असतां त्यामध्यें मनुष्याचें जोडपें त्यास दिसलें नाहीं.तेव्हां तो राजास ह्मणाला "येथें सर्व जोडपीं तयार आहेत परंतु एका मुख्य जोडप्याचीच उणीव आहे. तें मानवी जोडपें होय. तें सर्वांत श्रेष्ठ असल्यामुळें त्यावांचून कामास सुरवात व्हावयाची नाहीं. करितां बत्तीस लक्षणांनीं युक्त अशा एका स्त्रीपुरुषांचें सुंदर जोडपें आणीव. त्या जोडप्याचें त्वां स्वहस्तानें हनन करून देवीचें पूजन केलें पाहिजेस." राजानें हेंहि त्याचें ह्मणणें अखेर कबूल केलें व अशा जोडप्याच्या शोधाकरितां प्रधानाकरवीं आपले सेवकगण चोहोंकडे पाठविले.

कर्मधर्मसंयोगानें त्याच दिवशीं सुदत्ताचार्यनामक अवधिज्ञानी मुनी आपल्या पांचशें मुनिशिष्यांच्या संघासह विहार करीत करीत त्या शहराबाहेरील उद्यानामध्यें येऊन उतरले होते. निर्ग्रंथशिरोमणी अशा त्या मुनींस आपल्या तपप्रभावेंकरून अनेक प्रकारच्या ऋद्धि प्राप्त झाल्या होत्या. तपोबलानें त्यांच्या मुखावर एक प्रकारचें असें कांहीं तेज आलें होतें कीं त्यांस पाहाणारास—कितीहि तो अभिमानी असो—आपलें मस्तक नमवावेंच लागे. मोठमोठ्या हिंस्रपशूंची सुद्धां ही अवस्था होऊन जात असे, मग मानवी प्राण्यांची कथा काय? द्वादशांग वाणीचें संपूर्ण रहस्य ते उत्तमप्रकारें जाणत होते. त्यामुळें कसाहि वादी त्यांचे समोर येवो, त्याचा निभाव लागत नसे. चिरंतन आत्मध्यानैकसाधनानें मोक्षलक्ष्मीस प्राप्त करून घेण्यापलीकडे त्यांचें दुसरें उद्दिष्ट नव्हतें. अशा प्रकारचे दिव्यज्ञानी मुनी ज्या उद्यानामध्यें उतरले होते तें उद्यानहि अनेक प्रकारच्या रमणीय फलपुष्पांनीं सुशोभित होतें. त्या ठिकाणीं शहरांतील लोकांना सायंकाळचे वेळीं आपल्या प्रियतमेसह आनंदानें विहार करितां यावा ह्मणून एक सुंदर वीथिका बांधली असून ठिकठिकाणीं विश्रांतीकरितां सुंदर संगमरवरी पाषाणाचीं आसनें मांडून ठेविलीं होतीं. मधून मधून जलविहार करण्या-

करितां सुंदर नकशीकाम केलेले असे लहानसे हौद बांधले असून त्याचे सभोंवतीं अनेक रंगांचे मनोहर पुष्पवृक्ष लाविले होते. तेथें मोठमोठे कारंजे बांधले असून ते उडत असतां त्यांचे जलबिंदु मौक्तिकमालेचा भ्रम उत्पन्न करित होते. कारंजाभोंवतालील आसनांवर श्रांत झालेले पथिकजन व शहरवासीजन विश्रांतीकरितां बसत असे तेव्हां तेथील जलकणमिश्रित शीतल वायू त्यांस इहलोकीला क्षणभर भुलविणारें अपूर्व सुख उत्पन्न करित असे. त्या बागेंत अनेक प्रकारचीं फळझाडें लाविलीं असून या वेळेस तीं फलभारांनीं वांकलीं असल्यामुळें त्या ठिकाणीं येणारांस मोठ्या आदरानें स्वागत करण्याकरितांच लऊन उभीं आहेत कीं काय, असा भास होत असे. अत्यंत कुशलतेनें बनविलेल्या सुवर्णमयी पिंजऱ्यांतून मयूर, पोपट, कोकिलादिक पक्षी आपल्या मंजुळ रवांनीं त्या सुखमय प्रदेशाचा क्षणभर लाभ घेण्यासाठीं मोठ्या प्रेमानें रसिकजनांस आव्हानच करित आहेत कीं काय, असें वाटे. सारांश तें उद्यान तेथील राजाच्या मालकीचें असल्यामुळें त्यानें अनेक देशांहून पुष्कळ रमणीय व दुर्मिळ वृक्ष व पक्षी आणवून त्यास अपूर्व शोभा आणिली होती. असो.

राजोद्यानांतील ही अपूर्व शोभा पाहून आचार्यांनीं विचार केला कीं, ही जागा आपणासारख्या संसारापासून पराङ्मुख झालेल्या संयमीस योग्य नव्हे, हें स्थान विलासी पुरुषांनाच अनेक प्रकारच्या क्रीडा करण्यास सोयीचें व योग्य होय. या ठिकाणीं एकाग्रतेनें आत्मध्यान होणें शक्य नाहीं, निर्जनवनच आपणास योग्य आहे. असा विचार करून त्यांनीं तें उद्यान सोडलें व जवळच एक भयंकर स्मशान होतें तेथें जाऊन आपलें वास्तव्य केलें. तो अष्टमीचा दिवस होता त्यामुळें संघांतील सर्व मुनींनीं आचार्यांजवळ येऊन प्रोषधोपवास ग्रहण केला. त्या संघामध्यें एक ब्रह्मचारी व त्याची बहीण असे दोघे नुकतीच दीक्षा धारण केलेले होते. हे दोघे स्वरूपानें अतिशय

सुंदर असून मोठ्या घराण्यांत त्यांचा जन्म झाला असल्यामुळें त्यांची शरीरयष्टी नाजूक होती. हे दोघे स्वरूपानेंच केवळ सुंदर होते असें नव्हे, तर उच्चश्रेणीच्या माणसामध्यें जीं शुभलक्षणें दिसून येतात तींहि पण त्यांचे ठिकाणीं दिसून येत होतीं. संघांतील इतर मुनींनीं आचार्यांजवळ प्रोषधोपवास ग्रहण केलेला जेव्हां या बंधुभगिनींनीं पाहिला तेव्हां त्यांसहि तो ग्रहण करण्याची इच्छा उत्पन्न होऊन त्याप्रमाणें तो आपणांसही देण्याविषयीं त्यांनीं आचार्यांजवळ विनंती केली; तेव्हां त्यांची ती अत्यंत कोमलावस्था पाहून आचार्यांनीं त्यांच्या मागणीस हरकत घेतली व ते ह्मणाले "बाळांनो, तुह्मी दोघे बहिण भाऊ अझून फार सुकुमार आहांत, त्यामुळें तुह्मांस हें कठीण व्रत सहन होणार नाहीं. करितां तुह्मी या शहरांत जाऊन आहार ग्रहण करावा हें योग्य आहे." गुरूंची आज्ञा शिरसावंद्य होय असें जाणून ते दोघेहि त्याप्रमाणें शहरच्या रस्त्याकडे आपल्या समोरील भूमिगत जीवांची हिंसा होऊं नये एतदर्थ भूमिशोधन करित चालले व कांहीं वेळानें ते शहराच्या वेशीजवळ येऊन पोहोंचले.त्या ठिकाणीं राजाचे शिपाई हजर होतेच;त्यांची नजर या उभयतांकडे जातांच एखाद्यास अवचित एखादें रत्न सांपडलें असतां जशी त्याची स्थिति होते, तद्वत् त्या उभयतांस पाहून त्यांची स्थिति झाली. ते लागलीच त्या बंधुभगिनींकडे आले व पुन्हां एकदा पूर्णपणें त्यांचे सर्व अवयव न्याहाळून पाहून राजाच्या हेतूप्रमाणें हें युगल आहे अशी त्यांची खात्री झाली. अशी सुंदर जोडी हातीं आलेली ते थोडीच सोडणार? प्रत्येकाच्या चेहऱ्यावर राजाकडून आतां आपणांस बराच द्रव्यलाभ होईल या विचारानें एक अपूर्व टवटवी दिसत होती. राजाकडून आपणास अमुक द्रव्य मिळेल, त्याचें पुढें आपण अमुक करूं, अशा तऱ्हेच्या मनोराज्यामध्यें प्रत्येक जण गुंग होता. नंतर त्या शिपायांनीं तें युगल निसटून जाऊं नये ह्मणून त्यांचे सभोंवतीं गराडा घातला व त्यांस राजाज्ञा कळविली. ती



ब्रम्हचारीः–" भगिनी, तूं मृत्यूचें भय मनांत मुळींच बाळगूं नकोस. कारण आपल्या पूर्वार्जित कर्मानुसार फल भोगणें आपणांस प्राप्त आहे.................सज्जन लोक कठीण प्रसंग प्राप्त झाला असतां मुळींच डगमगत नाहींत. " पृष्ठ ११.

The 'Lakshmi Art' Bombay.

ऐकतांच दोघांहि बंधुभगिनींचें चित्त कंपायमान झालें, परंतु ते विचारी असल्यामुळें तो परिणाम फार वेळ टिकला नाहीं. लवकरच ते पूर्ववत् निर्भय दिसूं लागले. कदाचित् आपली बहीण ही राजाज्ञा ऐकून घाबरली असल्यास तिला धीर दिला पाहिजे या हेतूनें तो ब्रह्मचारी तिला ह्मणाला–"भगिनी, तूं मृत्यूचें भय मनांत मुळींच बाळगूं नकोस. कारण आपल्या पूर्वार्जित कर्मानुसार फल भोगणें आपणास प्राप्त आहे. तें चुकवूं ह्मटल्यानें चुकणार नाहीं. तेव्हां धैर्यानें संकटाशीं तोंड देऊन त्यांतून युक्तीनें निभावून जाण्यांतच पुरुषार्थ आहे. याच नीतीतत्वास अनुसरून सज्जन लोक कठीण प्रसंग प्राप्त झाला असतां मुळींच डगमगत नाहींत. भावी परिणामाचें कसेंहि भयंकर व चित्तवृत्ति हलवून सोडणारें चित्र त्यांचेसमोर उभें राहो, खरे वीर त्याची मुळींच खंती न बाळगितां उद्भवलेल्या संकटपरंपरेस मोठ्या धैर्यानें तोंड देतात." हें ऐकून त्याची बहीण ह्मणाली, "दादा, नैसर्गिक स्वरूप धारण करणाऱ्या मुनींना या जगांत भय कोणतें ? सर्वसंगपरित्याग करून ज्यांनीं मुनिपद धारण केलें त्यांचें राजा किंवा प्रत्यक्ष करालस्वरूपी यमसुद्धां काय करूं शकणार आहे ? आह्मी उपसर्ग सहन करण्याकरितां तर दीक्षा घेतों व त्याप्रमाणें उपसर्ग प्राप्त झाला असतां मन विकारवश होऊं न देतां शांतमनानें तो सहन करणें यासच खरें तप असें ह्मटलें आहे. ह्मणून आह्मांस कोणतीहि भीति धारण करण्याचें कारण नाहीं". याप्रमाणें परस्परांनीं परस्परांस धीर दिल्यावर ते शिपायांस ह्मणाले–"तुह्मीं सर्व आमच्यापासून दूर अंतरावर उभे रहा. आह्मी येथून कोठेंहि पळून जात नाहीं, तुह्मी न्याल तिकडे येण्यास आह्मी तयार आहोंत." ब्रह्मचाऱ्याचें हें ह्मणणें शिपायांनीं मान्य करून ते सर्व त्यांच्यापासून दूर झाले व देवीच्या मंदिराकडे त्यांस घेऊन चालले. देवालयांत पोहोंचल्यावर तेथील देखावा जो या बंधुभगिनींच्या नजरेस पडला तो इतका भ-

यंकर व अंगावर शहारे येण्याजोगा होता कीं, तो पाहतांक्षणींच त्यांची दृष्टि एकदम अंध झाल्यासारखी त्यांना वाटली; एकदम मूर्च्छा येऊन आपण खालीं पडतों कीं काय, अशी त्यांस भीति वाटूं लागली; त्या ठिकाणीं हजारों पशुपक्ष्यांचा वध झाला असल्यामुळें मांसाच्या राशींच्या राशी पडल्या होत्या; रक्ताच्या नद्या चोहोंकडे वाहून तेथील सर्व जमीन रक्तवर्णाच्छादित झालेली दिसत होती; अस्थींचे डोंगर लागून राहिले होते; हजारों गिधाडपक्षी मांसभक्षण करण्याकरितां त्या देवालयासभोंवतीं घिरट्या घालीत होते; ठिकठिकाणीं चर्माच्या पताका लावल्या होत्या; देवीच्या गळ्यामध्यें पशूंच्या मस्तकांचा हार करून घातला होता; दरवाजावर अनेक प्राण्यांच्या जिभेंचीं तोरणें करून लटकाविलीं होतीं; त्या देवीच्या मंदिरांतील असा भयंकर देखावा पाहून कोणाहि सहृदय मनुष्याचें अंतःकरण विदारण झाल्याशिवाय राहिलें नसतें. ब्रह्मचाऱ्यास हा प्रकार बिलकुल सहन न होऊन राजाचें मन यापासून परावृत्त व्हावें, व त्यावर कांहीं-तरी नीतितत्वाचा ठसा उमटावा, या उद्देशानें त्यांनें मंडपांतील एका सुशोभित सिंहासनावर विराजमान झालेल्या राजास उद्देशून पुढील श्लोक ह्मटला:—

जय धर्मेण भूपाल ! शरच्चंद्रसमानन ।
सर्वत्र सहगो नूनं धर्म एव शरीरिणाम् ॥

"हे शरत्कालीन चंद्राप्रमाणें मुखकांतीला धारण करणाऱ्या राज-श्रेष्ठा ! प्राणिमात्रांना सर्व बऱ्यावाईट अवस्थेमध्यें सहकारी असा एक धर्मच आहे हें निश्चयानें समज." अशा अर्थाचा श्लोक म्हणून राजास आशीर्वाद देतांक्षणींच राजाची नजर एकदम त्या बंधुभगि-नींच्या युगलाकडे गेली व त्यांचें तें नयनमनोहर, प्रशांत व गंभीर स्वरूप पाहून तो फार आश्चर्यचकित झाला. पूर्वींचे त्याचे मनांतील रुद्र व दुष्ट विचार पार नाहींसे झाले व तो शांतस्वरूपी बनला.



राजदूतांनीं ब्रम्हचारी व त्याची बहीण यांस देवीच्या देवळांत पकडून आणल्यानंतर ब्रम्हचाऱ्यानें **मारिदत्त** राजास उद्देशून पुढील श्लोक म्हटलाः—

“ जय धर्मेण भूपाल ! शरच्चन्द्र समानन ।
सर्वत्र सहगो नूनं धर्म एव शरीरिणाम् ॥ ” पृष्ठ १२.

The Lakshmi Art Bombay.

अशा रीतीनें त्याची वृत्ति शांत बनल्यावर तो आपल्या मनांत विचार करूं लागला कीं, "काय यांचें हें मनोहर स्वरूप! विधात्यानें यांची रचना करितांना खरोखर कमाल केली आहे. यांचा प्रत्येक अवयव प्रमाणशुद्ध आहे. स्वर्गांतून शची, इंद्र मानवरूप धारण करून या ठिकाणीं अवतरले तर नसतील? किंवा रतिमदनांची तर ही जोडी नसेल? अथवा कोणी विद्याधर तर नसतील? मानवजातीमध्यें असें सुंदर रूप असणें बहुधा संभवनीय नाहीं. सामुद्रिक चिन्हांवरून तर हे पूर्ण वैभवशाली असावेत असें अनुमान होतें; तेव्हां कदाचित् हे मानव-जातींतले असतील अशी कल्पना केली तर इतक्या सुकोमलावस्थे-मध्यें व अशा वैभवाचा त्याग करून त्यांस असा कष्टप्रद वेष धारण करण्याचें काय प्रयोजन पडलें असावें, हा एक प्रश्न उद्भवतो. माझा भाचाहि असाच रूपलावण्यसंपन्न व शुभलक्षणांनीं युक्त असून त्यानें अकालींच दीक्षा ग्रहण केल्याचें ऐकिवांत आहे; तेव्हां ती जर गोष्ट खरी असेल तर हा ब्रह्मचारी कदाचित् तोच नसेल ना? एखाद्या दिव्यज्ञानी मुनीकडून आपला पूर्वभव वृत्तांत कळून येऊन त्यायोगें त्यास उपरती झाल्यामुळें त्यानें कदाचित् दीक्षा धारण केली असावी आणि तोच प्रत्यक्ष या ब्रह्मचाऱ्याच्या रूपानें येथें आला असावा असें मानलें तर त्याच्याबरोबर ही स्त्री कोण? त्याचा आणि हिचा काय संबंध? छेः, कांहींच उलगडा होत नाहीं. पण प्रत्यक्ष जर हे येथें आहेत तर अशीं अनुमानें करण्यांत वेळ कां घालवावा? यांनाच सर्व हकीकत विचारून घ्यावी म्हणजे आपोआप सर्व गो-ष्टींचा उलगडा होईल. यांना पाहतांक्षणींच दुष्ट विचारांनीं भरलेलें माझें मन एकदम दयेनें व प्रेमानें भरून गेलें तेव्हां यावरूनही हे कदाचित् माझे संबंधी असण्याचा संभव आहे." असा विचार करून राजानें मोठ्या विनयानें त्या उभयतांस नमस्कार केला व त्या ब्रह्म-

चाऱ्यास उद्देशून तो म्हणाला, "महाराज ! आपण कोणत्या कुळांत उत्पन्न झालां व रतिमदनांसारखें आपलें सौंदर्य असतांना व आपल्या शरीरावरील चिन्हांवरून आपण पूर्ण वैभवशाली असल्याचें स्पष्टतया दिसून येत असतांना सर्व सुखांवर लाथ मारून अशा बालवयांतच इतकी विरक्तता कोणत्या कारणानें उत्पन्न झाली हें कृपा करून सांगा. आपलें चरित्र ऐकण्याची आम्हांस फार इच्छा झाली आहे; तरी तें आरंभापासून सांगून माझ्या मनामध्यें उत्पन्न झालेल्या संशयाची निवृत्ति करावी". राजाचें हें बोलणें ऐकून ब्रह्मचारी ह्मणाला, "राजा, तुजसारख्या पापमूर्तीपुढें आमची पवित्र कथा निरूपण करणें प्रशस्त नव्हे. तूं आपल्या सदसद्विवेकबुद्धीला फांटा देऊन, सारासार विचारशक्तीला आपल्या हृत्प्रदेशांतून घालवून देऊन, केवळ कळसूत्री बाहुल्याप्रमाणें मिथ्यात्वी-पाखंडी-लोकांच्या नादानें ते नाचवतील तसें नाचून राहिला आहेस, पापपुण्याची भीति सोडून भलभलते अनाचार मांडले आहेस, खऱ्या राजकर्तृत्वाचा विचार न करून हजारों निरपराधी प्राण्यांचा संहार करित आहेस व त्यायोगें अखंड रौरव नरकवासाचें साधन करित आहेस, तेव्हां अशा दुष्टचित्त तुझ्यापुढें माझें पवित्र कथासंकीर्तन करणें म्हणजे आंधळ्यापुढें मनोहर नृत्य व बहिऱ्यांपुढें मधुर गायन करण्यासारखेंच आहे. आणि म्हणूनच हे राजन् ! तुजसारख्यास माझ्या कथेमध्यें रुचि उत्पन्न होणें शक्य नसल्यामुळें मी ती सांगूं इच्छित नाहीं, आणि त्वांहि तत्संबंधीं आग्रह न धरावा हें बरें." ब्रह्मचाऱ्याचें हें मर्मभेदक भाषण ऐकून राजास कृतकर्माबद्दल अतिशय पश्चात्ताप झाला आणि देवीस स्वहस्तानें बळी देण्याचे तयारीनें नग्न केलेली आपली तरवार पूर्ववत् म्यानांत घालून त्यानें ब्रह्मचाऱ्याची अत्यंत नम्रपणें क्षमा मागितली व त्यास आपली कथा चालू करण्याविषयीं विनंति केली. राजाच्या स्थितीमधील हा पालट पाहून तेथील सर्व सभासदांस फार आ-

श्चर्य वाटलें. ब्रह्मचाऱ्यास ही सर्व स्थिति, नजरेस येतांच फार समाधान वाटलें, व आपल्या दयामयी धर्माचें बीजारोपण करण्यास ही संधि उत्कृष्ट आहे असा विचार करून तो म्हणाला, "राजन्! तुझ्या परिणामांमधील रुद्रता नाहींशीं होऊन त्या ठिकाणीं शांततेचें अधिष्ठान झालेलें पाहून मला फार संतोष झाला आहे. माझी कथा चालू करण्यास मला आतां फारच उत्साह वाटूं लागला आहे. मी माझी हकीकत आरंभापासून सांगेन. मी जें स्वतः पाहिलें, ज्यांचा स्वतः अनुभव घेतला, जें पाप अथवा पुण्य स्वतः संपादन केलें, व अखेर राज्याचा त्याग करून परम पवित्र मुनिपद धारण केलें, त्या सर्वांचा त्रोटक इतिहास मी क्रमानें निवेदन करीन. तो सर्व, हे राजन्! भैरवनाथ, व सभेंतील इतर जनहो! तुम्ही सर्व एकाग्रमनानें श्रवण करा."

पहिला भाग समाप्त.

भाग २ रा.

नंतर ब्रह्मचाऱ्यानें आपली हकीकत सांगण्यास सुरवात केली. तो ह्मणाला, "याच भरतक्षेत्रांत सर्व गुणान्वित असा मालवक नामें एक देश आहे. त्यामध्यें फारच थोड्या अंतरानें हजारों गांवें वसलेलीं होतीं. तेथील लोक फारच सुंदर व धनधान्यानें समृद्ध होते. तेथें मोठमोठे उसाचे मळे असून गहूं, जवस, तांदूळ वगैरे सर्वप्रकारच्या धान्याचीहि मोठ्या प्रमाणावर लागवड झालेली दिसून येई. त्यामुळें तेथील लोकांना कोणत्याहि वस्तूकरितां दुसऱ्या देशाकडे पाहण्याचा प्रसंग येत नसे. तेथील गाई, ह्मशी वगैरे सर्व जनावरें नेहमीं रानामध्यें स्वेच्छेनें विहार करून चरत असल्यामुळें शरीरानें नेहमीं पुष्ट व गो-

जिरवाणी दिसत असत. डाळिंब, नारळीं, केळीं, जांब नारिंग वगैरे फळफळावळीचे बाग पावलोपावलीं असल्यामुळें त्या देशांतील प्रवाशांना आपल्याबरोबर शिदोरी ठेवण्याची कधींहि जरूरी भासली नाहीं. याशिवाय अन्नछत्र व पाणपोया तर सर्व ठिकाणीं उभारलेल्या असतच. तेथील लोक परोपकाररत असत. परद्रव्य व परस्त्री यांकडे नजर ठेवणें हें त्या देशांत फार अधमपणाचें मानलें जाई. अशा प्रकारें न्यायानें वागण्याची तेथील लोकांची प्रवृत्ति असल्यामुळें दुष्काळानें आजपर्यंत कधींहि आपलें उग्र स्वरूप तेथें प्रगट केलें नव्हतें. अशा प्रकारच्या ऐश्वर्यांनीं युक्त असलेल्या त्या देशांत उज्जयिनी नामक स्वर्गासहि खालीं पहावयास लावणारें असें एक अत्यंत सुंदर शहर होतें. ब्रह्मदेवानें हें शहर रचण्याकरितां सर्व सामुग्री स्वर्गाहून आणिली असावी असा पाहणाऱ्यास भास होई. त्या शहरांतील गोपुरांच्या भिंती रत्नमयी असून त्यांचीं शिखरें आकाशांत इतकीं उंच गेलीं होतीं कीं सूर्याला आपला रथ या शिखराच्या टोंकाला लागून मोडेल कीं काय या भीतीनें बाजूनें न्यावा लागे. त्या शहराला लागूनच शरयू नामें एक विस्तीर्ण पात्राची नदी होती. तिचें जल अत्यंत मधुर होतें. त्या नदीतीरावरच उज्जयिनी शहर सर्व वसलेलें होतें. त्यामुळें नदीस एक प्रकारची अपूर्व शोभा प्राप्त झाली होती. मोठमोठ्या श्रीमान् लोकांचे आकाशाशीं स्पर्धा करणारे असे उंचच उंच प्रासाद, मोठमोठीं जिनमंदिरें वगैरेंनीं तें शहर फारच खुललेलें दिसून येई. तेथील जिनमंदिरामध्यें भव्य जीवांचा जय ! जय ! असा कोलाहल मचून राहिला होता. सर्व लोक पूजाप्रभावनेंत मग्न असून दानादिक कर्में करण्यांत सर्वदा तत्पर असत. मोठमोठ्या विद्वान् लोकांच्या धर्मोपदेशानें धर्ममार्गाच्या ठिकाणीं अत्यंत रुचि उत्पन्न झाल्यामुळें कुमार्गाच्या ठिकाणीं तेथील लोकांची सहसा प्रवृत्ति होत नसे. सर्व लोक आपापला व्यापार उदीम, उद्योगधंदा न्यायानें चालवित असत. त्या-

मुळें राजकीय सामाजिक किंवा नैतिक गुन्हेगारांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच दिसून येई. बौद्धिक औद्योगिक वगैरे शिक्षणाच्या सोयी फारच उत्तम रीतीनें तेथें करण्यांत आल्या असल्यामुळें तेथील लोकांस आपल्या निर्वाहाच्या साधनाची कधींहि फिकीर भासली नाहीं. सर्व लोक आपापल्या उद्योगधंद्यांत गढून गेलेले दिसून येत असत. तेथील राजाकडूनहि अनेक प्रकारच्या सवलती प्रजाजनांस मिळत असल्यामुळें आपल्या उद्योगधंद्याचें क्षेत्र वाढविण्यास त्यांस उत्तम संधी मिळाली होती. त्यामुळें दिवसेंदिवस तेथील लोकांची जास्त भरभराट होत चालली होती. तेथील स्त्रिया अत्यंत सुंदर असून पुरुषांप्रमाणें त्याहि सद्गुणी होत्या. पतीची आज्ञा उल्लंघन करणें हें त्यांस स्वप्नींहि माहित नव्हतें. याप्रमाणें त्या शहरांतील चारी वर्णांचे लोक आपापल्या कर्मांत अत्यंत दक्ष असल्यामुळें सर्वत्र आनंदीआनंद तेथें दिसून येत असे. शहराबाहेर मोठमोठे बगीचे असून अनेक प्रकारचीं क्रीडाभुवनें तेथें स्थापिलीं होतीं. मोठमोठ्या विहिरी व तलाव तेथें निर्माण केलें होते. शहरामध्यें क्रयविक्रय करणाऱ्या व्यापारी लोकांकरितां निरनिराळ्या दुकानांची मांडणी फारच सुरेख रीतीनें केली होती. त्या देशांतील व्यापाराच्या घडामोडीचें तेंच शहर केंद्रस्थान असल्यामुळें परदेशांहून हजारों व्यापारी त्या ठिकाणीं आपापला माल घेऊन येत असत व त्यामुळें तें नेहमीं गजबजलेलें दिसून येई. अशा एक कीं दोन, कोणकोणत्या गोष्टींनीं त्या शहराच्या मोहकतेचें वर्णन करावें!

अशा त्या उज्जयिनी शहरामध्यें कीर्त्यौघ नामेंकरून एक राजा राज्य करित असे. तो फारच गुणी व न्यायशील असून स्वरूपानें साक्षात् मदनाप्रमाणें होता. त्या राजाचे ठायीं असलेला दातृत्वगुण पाहून कल्पवृक्ष जे पळून गेले ते पुन्हां तोंड देखील दाखवित नाहींत! रणभूमीवर त्याच्याशीं युद्ध करण्यास सामोरा उभा राहील असा पराक्रमी

राजाच त्या वेळीं त्या देशांत दुसरा कोणी नव्हता, त्यामुळें परचक्राचें भय मुळींच नव्हतें. हा स्वतः गुणवान् असल्यामुळें कोणाहि गुणी पुरुषाची तो फार वाहवा व चहा करित असे. अशा त्या पुण्यश्लोक राजाची सर्वगुणालंकृत अशी चंद्रमती नांवाची स्त्री होती. ती सतीव्रतधुरंधर असून स्वरूपानें साक्षात् रतीच होती ह्मटलें असतां चालेल. परस्परोपयोगी सर्व गुणांमध्यें हें दांपत्य युक्त असून जर कोठें विरोध असेल तर तो एकाच गोष्टींत होता. पण ती गोष्ट फारच महत्वाची होती. ती मिथ्यामार्गी होती हीच ती होय. आमचा हा राजा दयामयी धर्मामध्यें रत असून राणीनें हिंसामयी धर्माकडे आपला ओढा दाखवावा हा विरोध कांहीं सामान्य नव्हे. राजानें आपल्यापरी शक्य तितका हा विरोध नाहींसा करण्याचा प्रयत्न केला तथापि मिथ्यादर्शनाचा तिचे ठिकाणीं जबर उदय असल्यामुळें त्यास त्या कामीं यश आलें नाहीं. हें मात्र खरें कीं, तो विचारी असल्यामुळें त्यानें या विरोधापासून आपल्या प्रेमांत यत्किंचित्हि बिघाड येऊं दिला नाहीं. त्या उभयतांचें एकमेकांवर अवर्णनीय प्रेम होतें. पुढें कांहीं वर्षांनीं राणीस गर्भधारणा होऊन नवमास पूर्ण झाल्यावर मी पुत्र होऊन तिच्या उदरीं जन्मास आलों. माझ्या जन्मकालीं राजानें महान् उत्सव केला. जिनमंदिरांत अभिषेकपूजा, पुण्याहवाचन वगैरे विधी करवून याचकवर्गास इच्छित दान देऊन तृप्त केलें. राजास पुत्रप्राप्ति झाली ह्मणून सर्व शहरवासी लोकांनाहि अत्यंत आनंद होऊन त्यांनीं तो आनंद शहरामध्यें मोठा उत्सव करून व्यक्त केला. माझें नांव यशोधर असें ठेविलें. पुढें क्रमानें विद्याभ्यासास योग्य अशी माझी अवस्था झाली, तेव्हां एके दिवशीं सुमुहूर्तानें माझ्या वडिलांनीं जिनमंदिरांत अभिषेकपूजा करवून संपूर्ण कलाभिज्ञ व अनेकशास्त्रपारंगत अशा एका विद्वान् आचार्यांजवळ विद्याभ्यासाकरितां व संपूर्ण कलेचें ज्ञान मिळविण्याकरितां मला ठेविलें. नंतर कांहीं वर्षेंपर्यंत मी

गुरूजवळ राहून अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें व सर्व कला त्यांजपासून अवगत करून घेतल्या. माझ्या अपूर्व बुद्धिसामर्थ्यामुळें मला त्या सर्वांचें ज्ञान होण्यास फारसा काल लागला नाहीं. मला शिकण्यासारखें आतां कांहीं उरलें नाहीं अशी माझ्या गुरूचीहि खात्री झाली, तेव्हां एके दिवशीं त्यांनीं मला पित्याकडे नेलें व त्यांस माझा विद्याभ्यास सर्व पूर्ण झाला असल्याचें वर्तमान कळविलें. हें ऐकून राजास फार आनंद झाला व माझी परीक्षा घेण्याकरितां मोठमोठ्या विद्वान् लोकांस पाचारण करून एके दिवशीं त्यानें एक मोठा दरबार भरविला. दरबारांत अनेक विद्वानांनीं मला अनेक तऱ्हेचे प्रश्न विचारले व त्या सर्वांचीं उत्तरें मी समाधानकारक दिलीं हें पाहून सर्व विद्वद्गण अत्यंत संतुष्ट झाला व त्यांनीं माझी मुक्तकंठानें प्रशंसा केली. राजाच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले व त्यानें जवळ घेऊन मोठ्या प्रेमानें माझें चुंबन घेतलें. नंतर माझ्या गुरूचा राजानें मोठा सन्मान केला व गुरुदक्षिणा ह्मणून एक हजार दिनार व सात गांवांची जहागीर त्यास इनाम देऊन संतुष्ट केलें.

मी याप्रमाणें सर्व विद्येंत पारंगत झालों असें पाहून माझ्या गुणस्वरूपाला योग्य अशी वधू मिळविण्याच्या शोधास राजा लागला. एके दिवशीं तो राजसभेंत बसला असतां परदेशाहून कोणी वकील भेटण्यास आला आहे अशी द्वारपालानें त्यास वर्दी दिली. राजानें त्यास घेऊन येण्याविषयीं सांगितलें व त्याप्रमाणें द्वारपाल त्या वकीलास घेऊन राजसभेंत आला. वकील राजास सविनय नमस्कार करून व हात जोडून म्हणाला "महाराज, कौशिक देशामध्यें महापुर नांवाचें एक शहर असून तेथें भूपाल नामक एक अत्यंत पराक्रमी राजा राज्य करित आहे. प्रसुमती नांवची त्यास एक पट्टराणी असून तिच्यापासून अमृता नामक एक कन्यारत्न प्राप्त झालें. ती कन्या अत्यंत स्वरूपवान्, गुणी, संगीतशास्त्रपारंगत

अशी आहे. ती यौवनावस्थेंत आलेली पाहून तिच्या रूपगुणानुरूप वर कसा मिळेल या चिंतेंत तो अहोरात्र व्यग्र झाल्यामुळें दिवसेंदिवस त्याचें शरीर कृश होत चाललें. दरबारी कामाकडे त्याचें मुळींच लक्ष लागेना. तेव्हां एके दिवशीं प्रधानमंडळानें राजास अशी स्थिति प्राप्त होण्याचें कारण विचारतां त्यानें आपल्या कन्येसंबंधाची हकीकत त्यांस कळविली. ती ऐकून प्रधानमंडळानें थोडा वेळ विचार करून आपल्या पुत्राचें नांव सुचविलें. तेव्हां महाराजांसहि तें पसंत पडून त्यांनीं तत्संबंधीं बोलणें करण्याकरितां मला आपणाकडे पाठविलें आहे. महाराजांचे हेतु आपण पुरविल्यास आह्मी आपले फार ऋणी होऊं." वकीलाचे तोंडून ही हकीकत ऐकतांच राजासहि आपल्या पुत्रास अनुरूप स्थळ मिळालेलें पाहून फार आनंद झाला व तो म्हणाला, "फार उत्तम आहे. पण लग्नसोहळा येथेंच झाला पाहिजे आणि याकरितां आपण जर माझ्या शहरीं मुलगी घेऊन येण्यास तयार असाल तर मीहि मोठ्या आनंदानें आपल्या ह्मणण्यास रुकार देईन." राजाची ही अट वकीलानें तत्काळ मान्य केली व परत आपल्या राज्यांत जाण्यास परवानगी विचारिली. राजानेंहि वस्त्राभूषणादिकांनीं त्याचा मोठा गौरव करून व एक लग्नपत्रिका लिहून देऊन त्यास रवाना केलें. तो वकील मजल दरमजल करित आपल्या शहरीं येऊन पोहोंचल्यावर पहिल्यानें त्यानें राजद्वारीं प्रवेश केला व आपल्या आगमनाचें वर्तमान द्वारपालाकरवीं राजाकडे पोहोंचविलें. राजानेंहि तत्काल त्यास येण्याविषयीं हुकूम केला व त्याप्रमाणें तो राजाकडे गेल्यावर त्यानें सर्व हकीकत राजास कळविली. भूपाल राजा ती हकीकत ऐकून आनंदानें डोलूं लागला. त्यानें त्या वकीलाचा अपूर्व सन्मान करून व त्यास खुष करून रवाना केलें. नंतर राजा लग्नाच्या तयारीस जारीनें लागला व कांहीं दिवसांनीं लग्नाची पूर्णपणें तयारी झाल्यावर एके दिवशीं शुभमुहूर्तावर तो आ-

पल्या परिवारगणासह मोठ्या समारंभानें उज्जयिनीनगरीस जाण्याक-रितां निघाला. मुक्काम दरमुक्काम करित तो उज्जयिनीस येऊन पोहों-चला व नगराबाहेरील एका मोठ्या बागेमध्यें तळ देऊन राहिला. कीर्त्यौंघ राजास हें वर्तमान कळतांच तोहि आपल्या सर्व परिवारगणासह त्यास सामोरे जाण्याकरितां त्या बागेंत गेला व तेथें मोठ्या समारंभानें भेटीपरतभेटी होऊन एकमेकांचें कुशल जाणून घे-तल्यावर ती सर्व मंडळी शहराकडे जाण्यास निघाली. इच्छितस्थळ आल्यावर तेथें कीर्त्यौंघराजानें वऱ्हाडी मंडळीस मोठ्या व्यवस्थेनें उतर-विलें, व त्यांचा निरोप घेऊन तो आपल्या घरीं गेला. या लग्नप्रसं-गामुळें सर्व शहर अनेक प्रकारच्या ध्वजापताकांनीं व कोमल लता-वेलींनीं सुशोभित केलें. मंगलप्रसंगीं कोणतेंहि विघ्न उपस्थित होऊं नये म्हणून शांतिपूजा व दानधर्म चालू ठेवला. नंतर दुसरे दि-वशीं सुवासिनी स्त्रियांनीं मला मोठ्या समारंभानें सुगंधित उटणीं लावून मंगलस्नान घातलें व अत्यंत मौल्यवान् असा रत्नजडित पोषाख अंगावर चढविला. इकडे राजवाड्यामध्यें लग्नमंडपाकडे जाण्याकरितां शहरांतील प्रमुखमंडळी, अधिकारी लोक व आप्तइष्ट वगैरे सर्व एकत्र होत होते व प्रयाणाची सर्व तयारी जारीनें चालू होती. नंतर सर्व तयारी होऊन बाहेर पडण्याची वेळ आली तेव्हां पहिल्यानें मी गृहचैत्यालयांत जाऊन श्रीजिनप्रतिमेस मोठ्या भक्तीनें नमस्कार केला व सर्व परिवा-रासह मोठ्या समारंभानें हत्तीवरून माझी मिरवणूक लग्नमंडपाकडे जाण्यास निघाली. रस्त्यानें जयजयकार करणाऱ्या हजारों दीनअनाथ लोकांस दान देण्याचा क्रम चालू ठेविला होता. अशा अपूर्व था-टमाटानें कांहीं वेळानें आमची मिरवणूक लग्नमंडपीं येऊन दाखल झाली. तो लग्नमंडप अनेक प्रकारच्या मौक्तिकांच्या तोरणांनीं व ध्व-जापताका, लतावेली वगैरेनीं सुशोभित केला होता. नंतर मी हत्ती-वरून खालीं उतरलों व तोरणांस स्पर्श केला. त्याबरोबर सर्व सुवा-

सिनी स्त्रियांनीं मंगल गीतें गाण्यास सुरुवात केली व माझा मोठा सन्मान करून मला आंतील घरामध्यें नेलें. हे मारिदत्त राजन्! त्या अंतर्गृहामध्यें सर्व परिजनांनीं वेष्टिलेली अत्यंत रूपलावण्यसंपन्न अशी ती माझी प्रिया अमृतादेवी विराजमान झाली होती. तिचें वर्णन काय सांगूं? तिचा प्रत्येक अवयव प्रमाणबद्ध व अत्यंत मनोहर होता एवढें म्हटलें म्हणजे पुरे. नंतर पुरोहितांनीं आह्मां उभयतां वरवधूंचे हात संमीलित करून वस्त्रानें गुंडाळिले व आम्हांस लज्जाहोमापुढें आणून बसविल्यावर होमहवनादिक क्रियेस प्रारंभ झाला. आशीर्वादात्मक मंगलश्लोक कित्येक जणांकडून म्हटले गेले व सप्तपदी झाल्यानंतर सर्व जनसमूहापुढें "मीं हिला वरिली, हिचें धर्म अर्थ व काम यांहीं युक्त पालन करीन" अशा तऱ्हेची पुढील पत्नीकर्तव्यासंबंधीची प्रतिज्ञा मजकडून घेवविली. सर्व कार्य निर्विघ्नपणें पार पडलें हें पाहून उभयपक्षांकडील सर्व मंडळीस अत्यानंद झाला. आमचा पाणिग्रहणविधी झाल्यानंतर श्वशुरानें वरदक्षिणा म्हणून पुष्कळसे अलंकार व हत्तीघोडे वगैरे सरंजाम दिला व आम्ही वरवधू मोठ्या थाटानें मिरवत मिरवत राजवाड्यांत प्रवेश करिते झालों. पुढें लग्नसोहळा सर्व आटोपल्यावर श्वशुरपक्षीय मंडळीनें आमचा निरोप घेऊन आपल्या राजधानीकडे प्रयाण केलें. मारिदत्ता! याप्रमाणें पांचशें सुंदर कन्यकांशीं मीं लग्न लाविलें व त्यांच्याशीं अनेकप्रकारचे सुखोपभोग घेऊं लागलों. याप्रमाणें पूर्वजनित पुण्यप्रतापानें मला अनेक प्रकारची भोगसामग्री प्राप्त झाली असतांहि मी अंधपणानें तिचा उपभोग घेण्याचें कधींहि मनांत आणिलें नाहीं. पुरुषार्थाचें खरें मर्म मला पूर्वींच कळून चुकलें असल्यामुळें धर्मपुरुषार्थास संभाळूनच मी उपभोग घेत असें. विषयांध होऊन पूजाप्रभावनादिक नित्य धर्मक्रियेमध्यें कधींहि व्यत्यय आणिला नाहीं. असो.

भाग २ रा समाप्त.

भाग ३ रा.

क्षुल्लक पुढें म्हणाला, "मारिदत्त राजा ! एके दिवशीं माझा पिता कीर्त्यौंघराजा दर्पणामध्यें आपलें मुखावलोकन करित असतां त्यास मस्तकावर एक पांढरा केंस उगवलेला नजरेस पडला. तो पाहतांच त्याचे विरक्त परिणाम होऊन संसाराचें क्षणभंगुरत्व त्यास वाटूं लागलें; देह, पुत्र, पौत्र, धन वगैरे त्यास नश्वर भासूं लागले; एक आत्म्याशिवाय शाश्वत असा दुसरा पदार्थ या जगांत त्यास दिसेनासा झाला व आत्मकल्याणैक उद्दिष्ट त्याचे नजरेसमोर फिरूं लागलें. आत्मकल्याणाशिवाय त्यास दुसरा कोणताच विचार सुचेनासा झाला व खरें धर्मसाधन—आत्मकल्याण—प्राप्त करून घेण्याकडे त्याच्या मनाची प्रवृत्ति होऊं लागली. त्याचे मनांत पुन्हां असेंहि विचार आले कीं, जरेनें या पिकलेल्या एका पांढऱ्या केंसाच्या मिषानें मला वैराग्य उत्पन्न व्हावें म्हणून ही धूळच फेंकिली असावी; किंवा माझ्या मस्तकावर उज्ज्वल धर्माभिषेकाचें चूर्ण टाकलें असावें. या वेळपर्यंत आत्मकल्याणाचा मला मार्ग सुचला नाहीं, तेव्हां मी कितीतरी अभागी म्हणावयाचा ! म्यां महामूर्खानें आजपर्यंत विषयजालांत स्वतांला गुरफटून घेऊन धर्मसाधन कांहींच केलें नाहीं. अतींद्रिय वस्तूंनीं मला सन्मार्गाकडे सन्मुख होण्याकरितां प्रयत्न करावेत आणि मीं जर अझूनहि तिकडे दुर्लक्ष केलें व वेळींच सावध झालों नाहीं तर माझ्यासारखा मूर्ख इतरत्र आढळणें कठीण आहे. ज्या निमित्तानें मला मोहनिद्रेंतून उठवून जागें केलें त्याचे मजवर अनंत उपकार आहेत. मला या प्राप्त झालेल्या संधीचा उपयोग करून घेतलाच पाहिजे. अशा तऱ्हेचे अनेक विचार त्याचे मनांत घोळूं लागले व त्यायोगें त्याची वैराग्यभावना दृढ होत चालली. त्यानें संपूर्ण राज्यभार माझे स्वाधीन करून स्वतः दीक्षा ग्रहण करण्याविषयींचा बेत निश्चित केला व त्या तयारीस

लागण्याचे हेतूनें त्यानें प्रधानमंडळास बोलावण्याची आज्ञा केली. हुकुमाप्रमाणें सर्व प्रधानमंडळ लागलेंच जमलें व राजानें त्यास आपला निश्चित बेत कळवून माझ्या राज्याभिषेकाची सर्व तयारी करण्यास सांगितलें. राजाज्ञा सुटल्यावर तेथें काय उशीर आहे ! लवकरच राज्याभिषेकाची सर्व तयारी झाली व त्याप्रीत्यर्थ सर्व प्रमुखमंडळी, मानकरी वगैरे लोकांस निमंत्रणें पाठवून दरबार भरविला. नंतर राजा मला बरोबर घेऊन दरबारामध्यें दाखल झाला व आम्ही पितापुत्र स्थानापन्न झाल्यावर राजानें आपला मनोदय सभासदांस जाहीर करून त्यांची त्या बाबतींत संमति विचारिली. सभासदांनींहि पूर्ण विचारांतीं या गोष्टीस आपली मान्यता दर्शविली व लागलीच विधिपूर्वक राज्याभिषेक होऊन राजानें आपला राजमुकुट माझे मस्तकीं ठेविला. त्याबरोबर सर्वत्र टाळ्यांचा गजर व आशीर्वादात्मक उद्गार सभेंतून निघूं लागले, मंगलवाद्यें वाजूं लागलीं व चोहोंकडे आनंदीआनंद झाल्यासारखा दिसला. नंतर राज्यकारभारासंबंधीं सर्व महत्वाच्या बाबींचा मला उलगडा करून देऊन उपदेशादाखल माझ्या पित्यानें अखेरचे प्रेमाचे म्हणून चार शब्द सांगितले. तो म्हणाला, "बाळा, मीं तुला आजपर्यंत सर्वतऱ्हेच्या विद्येमध्यें व कलेमध्यें प्रवीण करून माझा राज्यभार वाहण्यास समर्थ केलें आहे, व अशारीतीनें मीं आपलें कर्तव्य पूर्णपणें बजाविलें आहे. आतां तुजवर लोककल्याणाचें ओझें टाकून मी आत्मकल्याण करून घेण्याकरितां जाणार, त्याअर्थीं शेवटीं तुला दोन शब्द तुझ्या हिताचे म्हणून सांगावेत अशी प्रेमामुळें मला इच्छा झाली आहे. तूं सर्व विद्येमध्यें निपुण आहेसच, तेव्हां तुला विशेष कांहीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. तरी ज्याअर्थीं मजकडे पितृपणाचा बोजा आहे त्याअर्थीं एक विशेष कर्तव्य म्हणून व अंत:करणांत गुप्तरूपानें वसत असलेल्या अकृत्रिम प्रेमाचें चिन्ह म्हणून ते शब्द माझ्या हृत्प्रदेशांतून जबरीनें बाहेर पडूं

पहात आहेत त्यास माझा नाइलाज आहे. बाळा यशोधरा ! तूं आपल्या कुलाचाराविरुद्ध कशाहि प्रसंगीं वागूं नकोस. आपल्या कुलामध्यें जीवहिंसा कधींहि केली जात नाहीं. सर्व प्राणिमात्राविषयीं दयाभाव धारण करणें हाच आपला मुख्य कुलाचार होय. जगामध्यें चतुः कषायांच्या[1] वशीभूत होऊन अनेक प्रकारचे लोक अनेक प्रकारच्या उपायांनीं व मोहक भाषणांनीं सत्यधर्माबद्दल अनादर उत्पन्न करून विपरीत व हिंसक, परंतु बाह्यतः अज्ञानामुळें मोहक वाटणाऱ्या मार्गाकडे माणसांची प्रवृत्ति उत्पन्न करण्याचा नेहमीं प्रयत्न करित असतात. तेव्हां अशा वेळीं तूं आपली सदसद्विवेकबुद्धि सदैव जागृत ठेऊन अशा मायाचारी लोकांच्या जालामध्यें स्वतःस अडकवून घेऊं नकोस. बाळा, आपल्या कुळामध्यें आजपर्यंत अनेक दयाधर्मप्रवर्तक साधुपुरुष होऊन गेले. त्यांनीं रागद्वेषादिकांचा समूळ नाश केला होता. अर्थात् अशा लोकांनीं जो आदर्श आपणापुढें ठेविला आहे त्याप्रमाणें सदैव वर्तन ठेव. त्याविरुद्ध जाण्याचें कधींहि साहस करूं नकोस. अरे, ज्यांच्या मूळाशीं रागद्वेषादि मनोविकारांचा सद्भाव असेल ते कधींतरी सत्यधर्माचें प्रतिपादन करितील काय, याचा विचार कर. निर्दोष धर्म प्रतिपादन करण्यास निर्दोष स्थिती ज्यास प्राप्त झाली असेल तोच अधिकृत होईल. तेव्हां याचा पूर्ण विचार करून प्राणावर बेतलें असतां सुद्धां हिंसा करण्यास प्रवृत्त होऊं नकोस. या हिंसेपासून परलोकाचा नाश होऊन अनंतानंत संसारपरिभ्रमण प्राप्त होतें. याचप्रमाणें असत्यवचन, चोरी, परस्त्रीसेवन व परिग्रहामितता (परिग्रहाचें—भोग्यवस्तूंचें—प्रमाण न ठेवणें) यांपासूनहि अनंत दुःखाची प्राप्ति होते म्हणून यांचाहि त्याग करणें अवश्य आहे. बाळा, आपल्या कुलामध्यें रात्रिभोजन, कंदभक्षण, दिवामैथुन, अगालितजलसेवन वगैरे क्रिया कधींहि केल्या जात नाहींत.

---

१ क्रोध, मान, माया, लोभ.

आपण नेहमीं परोपकार करण्यामध्यें तत्पर राहावें व सम्यक्त्व धारण करून जैनधर्माचें पालन करावें असा आपला कुलाचार आहे, त्याचें कधींहि उल्लंघन करूं नकोस. माझ्या दृष्टीनें हाच महत्वाचा भाग तुला सांगावयाचा होता तो सांगून टाकिला. याखेरीज बाकीच्या राजकारणादि क्रियेमध्यें तूं निपुण असल्यामुळें त्यासंबंधीं कांहीं सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रजेच्या दृष्टीनें मात्र कांहीं थोडेंबहुत सांगावयाचें राहिलें आहे तें हें कीं, 'आपल्या प्रजेचें पुत्रवत् पालन कर, आपलें सर्व राज्य तिच्याकरितांच आहे, तिचें सुखदुःख तें आपलें सुखदुःख, ही भावना निरंतर हृदयांत जागृत ठेव व तिच्या हरएक बाबींतील अभ्युदयाकरितां —उन्नतीकरितां—नेहमीं यत्नशील रहा. राज्याची संपत्ती केवळ भोगोपभोगाची सामुग्री वाढविण्याकडे खर्च व्हावयाची नसून प्रजेकरितां ती आहे, तीवर सर्व प्रजेचा हक्क आहे, आणि ह्मणूनच प्रजेच्या कल्याणाकरितां तिचा विनियोग व्हावयास पाहिजे, हें नेहमीं लक्षांत असूं दे आणि तदनुरूप आपल्या राजकारभाराचें धोरण ठेव.' याप्रमाणें अमोल्य असा मला उपदेश करून ते दीक्षाग्रहणासाठीं वनांत जावयास निघाले व तेथें त्यांनीं पिहिताश्रव नामक मुनीजवळ दिगंबरदीक्षा ग्रहण करून घोरतर तपश्चर्या करण्यास आरंभ केला.

मी राज्यारूढ झाल्यानंतर पित्याचा उपदेश ध्यानांत ठेऊन त्याप्रमाणें सर्व राज्यकारभार पाहूं लागलों व माझी पट्टराणी जी अमृतादेवी तिच्याशीं पुष्कळ काळपर्यंत सुखोपभोग घेतला. पुढें तिच्या पोटीं एक सुंदर पुत्र होऊन त्याचें नांव यशोमति असें ठेविलें. पुत्राच्या जन्मकाळीं मीं मोठा उत्सव केला व याचकांस इच्छित दानें देऊन तृप्त केलें. पुढें योग्य कालीं त्यास एका विद्वान् आचार्याजवळ विद्याभ्यासाकरितां ठेविलें व विद्याभ्यास संपवून तो घरीं आल्यावर त्याच्या गुणस्वरूपाला अनुरूप अशा शंभर कन्यकांशीं त्याचा विवाह करून दिला.

माझी प्रियतमा अमृतदेवी हिच्यावर माझें विलक्षण प्रेम होतें. तिच्या गुणांवर मी इतका लुब्ध झालों होतों कीं तिच्या सहवासाशिवाय एक क्षणहि अन्य व्यवसायामध्यें व्यतीत करूं नये, सर्व काळ तिच्याशीं अनेक तऱ्हेचे विलास करण्यांतच घालवावा, असें मला पुढें पुढें वाटूं लागलें. माझा पुत्र यशोमति हा आतां राज्यभार वाहण्यास समर्थ झाला असल्यामुळें राज्यकारभाराची मला फारशी फिकिर वाटली नाहीं. राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें त्याचे स्वाधीन करून आपण मोकळें व्हावें असा मीं आपल्या मनाशीं निश्चय केला. तिच्या ठिकाणीं माझी इतकी आसक्ति कां व्हावी हें मलासुद्धां अझून नीट कळत नाहीं. परंतु तसें झालें खरें. मी आपल्या मनाशीं ठरविलेला हा विचार लवकरच अमलांत आणणार होतों परंतु भवितव्यता कांहीं निराळीच होती. मानवी अपेक्षा व भवितव्यता हे परस्पर अगदीं भिन्न आहेत व याचे अनुभव व्यवहारांत पदोपदीं येतात. भवितव्यतेपुढें मानवी अपेक्षेचा कांहींच टिकाव लागत नाहीं. मानवी अपेक्षा ही फारच दुर्बल—परतंत्र—आहे. ती जर तशी नसती तर जगामध्यें 'दुःख' ही वस्तूच राहिली नसती. ह्मणून मनुष्यानें कोणताहि निश्चय ठरविण्यापूर्वी सारासार विचार केला पाहिजे. परिस्थितीकडे पूर्ण लक्ष द्यावयास पाहिजे. सारासार विचारशक्तीला फांटा देऊन केवळ उच्छृंखल मनोवृत्तीला बळी पडणाऱ्या पुरुषांची अखेर फसगतच झालेली अशीं कितीतरी उदाहरणें आहेत? एखाद्या गोष्टीवर अंधपणानें एकदम विश्वास कधींहि ठेवतां कामा नये. बाह्यतः मनाला भुलविणाऱ्या गोष्टीच केवळ विचारांत घेऊन भागावयाचें नाहीं. अंतर्गत गोष्टीकडेहि थोडेंबहुत लक्ष पुरवावयास पाहिजे. सारांश अंतःस्थितीस जास्त महत्व द्यावयास पाहिजे. असो.

अशा प्रकारच्या आसक्तीनें प्रेरित होऊन मी एके दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें रात्रीच्या वेळीं चंद्रोदय झाल्यावर माझ्या पट्टराणीच्या

महालाकडे जाण्यास निघालों. तिच्या महालाचें वर्णन काय करावें? अनेक प्रकारच्या मनोहर रंगांत सुबक चित्रें काढिलीं असून चोहोंकडे रत्नदीप लाविले असल्यामुळें त्यास अवर्णनीय शोभा आली होती. त्या महालास एकंदर आठ मजले असून पहिल्या मजल्याची भूमि माणिकरत्नानें मढविली होती. त्यामुळें तेथें जाणारास आपल्या ओष्ठाचीं लाली कळत नसे. दुसऱ्या मजल्याची भूमि हिऱ्यानें मढविलेली असून त्याच्या पायऱ्याहि त्याच रत्नानें बनविल्या असल्यामुळें दुरून पाहणारांस त्या ठिकाणीं देंठरहित मोगऱ्याचीं फुलेंच चोहोंकडें विखरलीं आहेत कीं काय, असा भास होत असे; परंतु या कल्पनेनें जेव्हां ते पुढें जात व भासमान फुलांचा वास येईनासा होई, तेव्हां त्यांना आपण चकलों असें वाटून मोठी लज्जा उत्पन्न होत असे. मोठेमोठे मी मी ह्मणविणारे सुद्धां या ठिकाणीं चकून जात असत. तिसऱ्या मजल्याची भूमि पद्मरागमण्यांनीं बनविली होती, त्यामुळें रात्रीच्या वेळीं सूर्यप्रभाच त्या ठिकाणीं फांकलेली दिसून येई. चौथ्या मजल्याची भूमि पांच रत्नांनीं बनविली होती, त्यामुळें त्या ठिकाणीं पोपटाच्या कांतीप्रमाणें चोहोंकडे प्रभा पसरली होती. मयूराच्या पिसाऱ्याप्रमाणें चित्रविचित्र रंगाच्या रत्नांनीं पांचव्या मजल्याची भूमि बनविली होती. वैडूर्यमण्यांनीं सहाव्या मजल्याची भूमि बनविली होती त्यामुळें त्यास मयूरसमूहाची शोभा प्राप्त झाली होती. सातव्या मजल्याची भूमि सुवर्णानें बनविली असून आठव्याची सूर्यकांतमण्यांनीं बनविली होती. माझी प्रिया शेवटच्या मजल्यावर असून अनेक दासी तिच्या सेवेंत तत्पर होत्या. कांहीं दासी माझ्या येण्याची मार्गप्रतीक्षा करित महालाच्या गवाक्षांतून खालीं पहात होत्या. मला आलेलें पाहतांच त्यांनीं आपल्या स्वामिणीस मी आल्याची वर्दी कळविली. त्याबरोबर तीहि तात्काळ उठून मला सामोरें होण्याकरितां पुढें आली व तिच्याशीं सहवर्तमान मी तिच्या महालांत जाऊन तिनें दाखवून दिलेल्या एका

रत्नजडित मंचकावर मी अधिष्ठित झालों. नंतर नानातऱ्हेच्या मनोहर भाषणांनीं व हावभावविलासादिकांनीं तिनें माझें मन रंजविण्यास सुरुवात केली. आपल्या बाहुपाशांमध्यें घेऊन तिनें मला गाढ आलिंगन दिलें व यथेच्छ क्रीडा करून हास्यविनोदादिकांमध्यें आमचा बराचसा वेळ गेल्यावर श्रमपरिहारार्थ निद्रादेवीची आराधना करित आह्मी उभयतां मंचकावर पडलों. कांहीं वेळानें आह्मांस गाढ झोंप लागली. पहाटेच्या वेळीं आमच्या महालाजवळच एक हत्तीवरचा महात रहात असे, त्याच्या मनोहर व सुस्वर गायनानें आह्मी जागे झालों. माझी प्रिया तर तें गायन ऐकून वेडीच झाली व तिच्या मनांत आतां निराळ्या तऱ्हेचे विचार सुरू झाले. त्या गायनानें तिच्या मनःपावित्र्यास जबर धक्का बसविला व त्या महाताशीं आपला संयोग कोणत्या निमित्तानें जुळून येईल याच एका शोधामध्यें तिच्या मनाचें एकीकरण झालें. नंतर सूर्योदय झाल्यावर माझ्या पश्चात् तिनें आपल्या मनोरथसिद्ध्यर्थ एका दासीस त्याजकडे पाठविलें. ती त्याजकडे जाऊन पहाते तों तो अत्यंत कुरूप, रोगी, कुबडा व ज्याच्या सर्वांगाची अत्यंत घाण येत आहे असा दिसला. त्याबरोबर तिला अत्यंत चिळस येऊन ती तशीच परत पावलीं माघारी फिरली व आपल्या स्वामिणीस त्याच्या स्वरूपाचें वर्णन करून ह्मणाली "बाईसाहेब, आपल्यासारख्या राजघराण्यांतील स्त्रियांनीं पावित्र्यानें राहणें हेंच उचित होय. परपुरुषाचा नुसता विचार सुद्धां मनांत न आणणें किंबहुना, शक्य तों त्याचें दर्शनसुद्धां टाळणें हा आपला धर्म होय. स्त्रियांना शीलासारखें दुसरें भूषण नाहीं. असें असतां परपुरुषांची वांछा धरणें—त्यांतून अशा नीचकुलोत्पन्न, कुरूप, रोगी पुरुषाशीं संयोग घडवून आणण्याची इच्छा बाळगणें अत्यंत गर्ह्य व निंद्य होय. आपल्या कुलशीलाचा विचार करा व शुद्ध नजरेनें आपल्या या आचरणाकडे पहा ह्मणजे तुमचा तुह्मांलाच

पश्चात्ताप झाल्यावांचून राहणार नाहीं. कामवश होऊन अंध होऊं नका व आपल्या या उच्च राजघराण्याच्या नांवलौकिकास आपल्या दुर्वर्तनानें काळिमा फांसूं नका, एवढेंच या गरीब दासीचें विनंतीपूर्वक सांगणें आहे." दासीच्या या बोलण्याचा तिच्या मनावर कामांधतेमुळें यत्किंचित्हि परिणाम झाला नाहीं,परंतु उलट ही क्षुल्लक दासी आपल्यास शहाणपणाच्या गोष्टी शिकविते, या विचारानें तिच्या अंगाचा संताप मात्र झाला व दासीच्या अंगावर ओरडून जाऊन ती ह्मणाली, "अगे ए चहाटळ, पुरें कर तुझें हें तत्वज्ञान; मला हें सर्व कळतें. लहान तोंडीं मोठा घास घेण्याचा आचरटपणा फार झाला. ज्यांनीं त्यांनीं आपापल्या मर्यादेनें राहावें. तुला माझी आज्ञा ऐकलीच पाहिजे. तो कसाहि असला तरी तो मला प्रियच असून त्याच्याशीं मी संयोग करणार. तुला रिकाम्या वल्गना करण्याची कांहीं गरज नाहीं. जा, आतांचेआतां पुन्हां त्याच्याकडे जा व आजरात्रीं मी त्याचें घरीं येईन असें त्यास कळीव व हरप्रयत्नानें त्याचें मन वळवून मान्यतादर्शक त्याचा उलट निरोप घेऊन ये. तुझ्याकडून उलट असा निरोप कळेपर्यंत मला स्वस्थता मिळणार नाहीं. मात्र एक गोष्ट लक्षांत ठेव कीं, तुझ्या प्रयत्नांत कसूर झाल्याचें जर मला कळून येईल तर तुझ्या घराची राखरांगोळी करून तुझ्या आईबापांस देशोधडी भीक मागावयास लावीन व तुझे हालहाल करून प्राण घेईन. या सर्व गोष्टींचा विचार करून जें करावयाचें असेल तें कर." दासीनें हें गुऱ्हाळ ऐकिलें मात्र, बिचारीचे हातपाय गळाले व अत्यंत निराश होत्साती ती त्या महाताकडे पुन्हां जाऊन तिनें त्यास आपल्या स्वामिणीचा निरोप कळविला. सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. बिचारीस सत्तेपुढें आपल्या प्रामाणिक समजुतीस विसरावें लागलें व धनिणीची मर्जी सांभाळावी लागली. अशाच

रीतीनें या सत्तेच्या जोरावर जगामध्यें किती अनर्थ ओढवत असतील याची कल्पना करवत नाहीं. असो.

महातास दासीचें हें बोलणें ऐकून फार आश्चर्य वाटलें व हो, ना, करित करित अखेर त्यानें तिच्या ह्मणण्यास रुकार दिला. दासीनें त्याचा हा संमतिदर्शक निरोप राणीस कळविला त्याबरोबर तिला फार आनंद होऊन तिनें त्याच रात्रीं त्या महाताकडे जाण्याची तयारी केली. ठरल्याप्रमाणें दोनप्रहर रात्र उलटल्यानंतर सर्व भूषणें अंगावर घालून आपल्या दासीस बरोबर घेऊन ती आपल्या जाराकडे जाण्यास निघाली व दासीनें त्याचें घर दाखवितांच ती त्यामध्यें शिरून त्याच्याशीं यथेच्छ संभोगसुख घेतलें. राजा, ही हकीकत सांगतांना अंगावर कांटा येतो व मन दुभंगून जातें, परंतु खरी हकीकत सांगणें प्राप्त असल्यामुळें ती सांगितल्यावांचून निर्वाह नाहीं. ही हकीकत तरी मला त्याच वेळीं कळली नाहीं; परंतु पुढें तिच्या वर्तनाचा मला संशय येऊं लागल्यापासून मी बारीकरीतीनें शोध करण्यास जेव्हां आरंभ केला तेव्हांच ती मला कळून आली.

तिनें दुराचरण केल्या दिवसांपासून तिच्या वर्तनामध्यें बराच फरक दिसून येऊं लागला. पूर्वींसारखें तिचें प्रेम राहिलें नाहीं व मोकळ्या मनानें मजशीं तिचें बोलणें होईना. अशा स्थितींत आठचार दिवस लोटल्यावर एके दिवशीं ती मध्यरात्रीं नित्यक्रमाप्रमाणें मी निद्रावश झालों असें पाहून आपल्या जाराकडे जाण्यास निघाली. तिच्या या दुर्वर्तनासंबंधीची गुणगुण यापूर्वींच माझ्या कानीं आल्यावरून व तिच्या माझ्याशीं असलेल्या संशयजनक वर्तनावरून माझ्या मनास एकप्रकारची अस्वस्थता उत्पन्न झाली होती व या प्रकरणाचा प्रत्यक्ष शोध कसा लावतां येईल या विचारामध्यें माझी झोंप उडून जाऊन मी स्वस्थ डोळे झांकून पडलों होतों. तोंच ती आपल्या शयनावरून उठून बाहेर जाण्याच्या तयारीनें सर्व शृंगार आपल्या अंगावर चढवून

बाहेर पडली. मी हें पाहतांच या प्रकरणाचा छेडा लावण्यास ही अत्युत्तम संधि आहे असें जाणून उठून बसलों व आपल्यास कोणीं ओळखूं नये म्हणून काळें वस्त्र परिधान करून व हातांत नेहमींची तलवार घेऊन नकळत तिच्या पाठोपाठ जाण्यास निघालों. माझी स्त्री कामांध झाल्यामुळें अर्थातच आपल्या पाठीमागें कोण येत आहे याचें तिला मुळींच भान राहिलें नव्हतें. ती झपाट्यानें मार्गक्रमण करीत होती. अशा स्थितींत कांहीं वेळ गेल्यावर तिचें इच्छित स्थल आलें व ती एकदम तेथें शिरली. ती गेली त्या वेळीं तिचा जार निद्रावस्थेंत असल्यामुळें त्यास जागें करणाच्या हेतूनें तिनें आपल्या कोमल हातानें हळूच त्याचे पाय चुरण्यास सुरवात केली. त्याबरोबर तो एकदम जागा झाला व नेहमीपेक्षां उशीर केल्याबद्दल अत्यंत क्रुद्ध होत्साता तिची वेणी धरून त्यानें तीस लोहशृंखलेनें यथेच्छ चोप दिला. परंतु आश्चर्य हें कीं, तिनें हा सर्व मार मुकाट्यानें सहन करून पुन्हां आपल्या चुकीबद्दल क्षमा मागितली. हा सर्व प्रकार मी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यानें पहात होतों. त्या वेळीं माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल याची कल्पना तूंच कर. मी विकारवश न होतां मोठ्या धैर्यानें तो राग सहन केला. जिला आपल्या महालाबाहेर चार पावलेंहि जाण्याचें कधीं माहित नाहीं ती झपाट्यानें इतक्या लांब गेली कशी व जिला नुसत्या विनोदानें हळूच गालावर चपराक मारिली असतां गाल लालभडक होऊन जात इतकें जिचें कोमल शरीर, तिनें आपल्या जाराचा हा असह्य मार ब्रहि न काढतां मुकाट्यानें कसा सहन केला याचेंच राहून राहून मला फार आश्चर्य वाटतें. हा सर्व मदनाचाच प्रताप म्हणावयाचा ! दुसरें काय ?

पुढें तिनें क्षमा मागितल्यावर व बरीच वेळपर्यंत त्याची मनधरणी केल्यानंतर तो शांत झाला व प्रसन्नचित्तानें तिला गाढ आलिंगन देऊन तिच्याशीं त्यानें रतिक्रीडा करण्यास सुरुवात केली. हें पाहून



कुबडा व महारोगी **महात** नेहमींपेक्षां येण्यास उशीर झाल्याबद्दल **अमृतादेवी** राणीस लोहश्रृंखलेनें चोप देत आहे व ती त्याची क्षमा मागत आहे. पृष्ठ ३२.

The Lakshmi Art Bombay.

तर क्रोधातिशयानें माझें देहभान उडून जाऊन त्या उभयतांच्या नरडीचा घोंट घेण्याकरितां मी आपली तरवार म्यानांतून बाहेर काढली व पुढें सरसावणार तोंच, त्या तलवारीच्या अद्वितीय तेजाकडे माझी दृष्टि जाऊन माझ्या मनानें तें अनुचित कृत्य करण्याविषयीं माघार घेतली. ज्या तरवारीनें समरांगणांत मोठमोठ्या बलाढ्य शत्रूंचे प्राण घेऊन त्यांच्या रुधिरपानानें आपली तृप्ति करून घेतली त्याच तरवारीस अशा नीचांच्या रक्तानें अपवित्र करून तिची योग्यता कमी करणें मला प्रशस्त वाटलें नाहीं. त्या वेळीं माझ्या हृदयांतील क्रोध समूळ नाहींसा होऊन एक निराळाच मनोविकार त्या ठिकाणीं प्रादुर्भूत झाला. जी माझ्या अत्यंत विश्वासांतली व जिच्यावर मी अत्यंत आसक्त झालों होतों, त्या माझ्या पत्नीचें तें अलौकिक चरित्र पाहून संसाराविषयीं मला अत्यंत वीट आला व वैराग्यानें आपलें ठाणें पूर्णपणें माझ्या हृत्प्रदेशीं वसविलें. नंतर त्या ठिकाणीं रहाणें मला बरें न वाटून तशा विरक्त मनःस्थितींतच मी परत तिच्या महालीं येऊन मंचकावर पडलों. आपल्या पुत्रास राज्याभिषेक करून हा सर्व संसार सोडून देऊन संन्यास ग्रहण करण्यासंबंधीचे विचार त्या वेळीं माझे मनांत घोळूं लागले; व अशा विचारक्रांतीमध्यें मी निमग्न असतां कांहीं वेळानें ती निर्लज्ज माझे शेजारीं येऊन मी जागा होऊं नये ह्मणून हळूच मला धक्का लागूं न देतां निजली. त्या वेळीं तिला दूर लोटून द्यावी, तिचा स्पर्शहि नको हा विचार क्षणभर माझे मनांत आला. परंतु लागलीच, तसें केलें असतां जी एवढें साहस करण्यास भ्याली नाहीं तीच आपल्या प्राणावरहि कदाचित् उलटणार नाहीं कशावरून, या विचारानें मीं कांहीं हालचाल न करितां तिला तसेंच आपल्या शेजारीं निजूं दिलें. नंतर कांहीं वेळानें पहांट झाली व सर्व

लोक आपापल्या उद्योगास लागले, असें पाहून मीहि उदासवृत्तीनें मंचकावरून उठून प्रातर्विधी वगैरे उरकण्याकरितां महालाबाहेर पडलों."

भाग ३ रा समाप्त.

भाग ४ था.

क्षुल्लक पुढें म्हणाला, " राजा, नंतर मी स्नानगृहांत जाऊन तेथें शौचमुखमार्जनादि विधी आटोपून स्नान केलें व सामायिक, जप, स्वाध्यायादि नित्यक्रिया उरकून सभेस जाण्याच्या तयारीस लागलों. इतक्यांत, एक वनपाल कांहीं कमलपुष्पें बरोबर घेऊन तेथें आला व तीं मजपुढें ठेवून मला नमस्कार करून निघून गेला. रात्रौ घडून आलेल्या कृत्यासंबंधानें माझ्या मनांत एकसारखा विचार चालू होताच, तेव्हां हिची फजिती करण्यास ही संधि बरी आहे असें जाणून मीं त्या कमलांतून एक कमल उचललें व तें तिच्या उरप्रदेशावर फेंकिलें मात्र, लागलीच ती बेशुद्ध होऊन जमिनीवर पडली. हें पाहतांच, आसपासच्या दासी धांवत येऊन तिला शीतोपचार करूं लागल्या. कोणीं वाळ्याच्या पंख्यानें वारा घालित आहेत, तर कोणी चंदनाची उटी लावित आहेत, कोणी शीतल जलाचें मुखावर सिंचन करित आहेत, अशा अनेक तऱ्हेनें तिला शुद्धीवर आणण्याचा त्या प्रयत्न करूं लागल्या. नंतर कांहीं वेळानें ती शुद्धीवर आली व खरोखरीच मूर्च्छितावस्थेंतून उठलेला मनुष्य जसे अंगविक्षेप वगैरे करितो त्याप्रमाणें सर्व ढोंग तिनें केलें. मला हें सर्व पाहून फार आश्चर्य वाटलें व स्त्रीचरित्राविषयीं निरनिराळ्या तऱ्हेचे माझे मनांत विचार येऊं लागून, मी तेथील सर्व दासींना मर्मभेदक रीतीनें म्हणालों, " स्त्रियांना नुसत्या कमलघातानें जर मूर्च्छा येते तर त्या प्रसंगविशेषीं लोहशृंखलेचा मार

कसा सहन करितात हें एक कोडेंच आहे. दासींनों! घरांतील साखरेचें पक्वान्न तुच्छ वाटून बाजारांतील घाणेरडा मेवाच कित्येकांना गोड लागतो! तळपायाला फोड झाल्यामुळें जिला घराबाहेर एक पाऊल देखील टाकवत नाहीं, तीच ऐन मध्यरात्रीच्या वेळीं बरोबर कोणी न घेतां लांबचेलांब झपाट्यानें चालून जाते हें स्त्रीचरित्र गहन आहे. मजसारख्यास तरी हें कोडें उलगडणें कठीण आहे. तुह्मी कांहीं खुलासा करूं शकाल काय?" माझें हें बोलणें ऐकून ती दुष्टा आपल्या मनांत कचरली व विचार करूं लागली कीं, रात्रौ आह्मां दोघांखेरीज तेथें कोणीहि दुसरें नसतांना यांना हें सांद्र वर्तमान कळलें कसें? पण यांना तें समजलें ह्मणून तरी काय हरकत आहे? हे माझें काय करणार? माझे मनोरथ तर सिद्ध होऊन चुकले तेव्हां मला आतां कशाची भीति आहे? वेळेवर जर प्राणावरच बेतलें तरी मारीन किंवा मरेन हा तर आपला केव्हांचाच निश्चय आहे. मग आतां याची तरी पर्वा कां बाळगावी? अशा विचारानें ती आपल्या मनाचें समाधान करून घेऊन निर्भयरीतीनें घरांत वावरूं लागली. माझें सर्व लक्ष तिच्या चेहऱ्यावरील मनोविकारांकडेच असल्यामुळें तिचा अभिप्राय मीं तत्काळ ओळखून घेतला व त्यामुळें तर मला जास्तच उदासीनता प्राप्त झाली. नंतर मला तेथें रहाणें बरें न वाटून राजसभेंत जाण्याच्या मी तयारीस लागलों. हें पाहून जवळच्या दासदासींनीं माझे नेहमींचे अलंकार घालण्याकरितां मजपुढें आणिले. माझ्या उदासीनतेमुळें पहिल्यानें ते अलंकार मला नकोसे वाटले, परंतु पुन्हां असा विचार उत्पन्न झाला कीं, जर मी हे अलंकार न घालतां साध्या वेषानेंच राजसभेंत गेलों तर तेथील सर्व प्रधानमंडळ व इतर सभासद लोक माझा हा वेष पाहून नानातऱ्हेचे तर्कवितर्क करूं लागतील. शहरामध्येंहि ही गोष्ट फुटल्याशिवाय राहणार नाहीं, व जो तो आपापल्या समजुतीप्रमाणें खरीं खोटीं अनुमानें काढित रहाणार, तेव्हां इतका प्रसंग ओढावण्यापेक्षां अलंकार घातले

ह्मणून काय बिघडेल? या बाह्य अलंकारांनीं आपलें मन थोडेंच बदलणार आहे? असा विचार करून मीं ते अलंकार मोठ्या नाखुषीनें अंगावर चढविले व नेहमींच्या परिवारजनासहित राजसभेकडे जाण्याकरितां निघालों. सभेंत येऊन आपल्या सिंहासनावर विराजमान झाल्यावर सर्व प्रधानमंडळानें येऊन मला नमन केलें व ते सर्व आपापल्या स्थानीं विराजमान झाले. रीतीप्रमाणें दरबारांत गवई लोकांनीं मला रंजविण्याकरितां सुस्वर गायन केलें, भाट लोकांनीं माझ्या यशाचे पोवाडे गाइले, कलावंतिणींनीं मनोहर नृत्य केलें, परंतु माझें कोणत्याच गोष्टीकडे लक्ष लागेना. गेल्या रात्रीच्या प्रकारानें माझ्या मनास अत्यंत उद्विग्नता प्राप्त झाली असल्यामुळें माझें मुख म्लान झालें होतें. तोंडावर बिलकूल तेज राहिलें नव्हतें. या सर्व व्यापांतून एकदां सुटका करून घेऊन मुनिपद ग्रहण करण्यास अनुकूल संधि कशी प्राप्त करून घेतां येईल, याच एका विचारानें माझें मन व्यग्र झालें होतें. इतक्यांत माझी मातोश्री चंद्रमती पालखींत बसून त्या ठिकाणीं आली. तिला पाहतांच मी उठून साष्टांग प्रणिपात केला व जवळील एका आसनावर तिला बसवून दरबारीं कां येणें केलें, असा नम्रपणें प्रश्न केला. यावर "तुझें कुशल जाणून घेण्यापलीकडे दुसरा कांहीं हेतु नव्हता" असें उत्तर देऊन "कालची रात्र तुला खुशालीची गेली ना?" असा तिनें मला पुन्हां प्रश्न केला. आईच्या या प्रश्नास काय उत्तर द्यावें हें एक मला कोडेंच पडलें. कांहीं वेळ विचार करून मीं तिला उत्तर दिलें "आई, कालची रात्र मला कांहीं बरी गेली नाहीं. मध्यरात्रीच्या सुमारास मला एक दुष्ट स्वप्न पडलें. त्यांत एक प्रचंड राक्षस माझ्या छातीवर येऊन बसला व मला ह्मणाला, 'तूं आपलें राज्य यशोमती कुमाराच्या स्वाधीन करून जिनदीक्षा ग्रहण कर. असें जर तूं करणार नाहींस तर तुझा सर्व परिवारासह नाश करून टाकीन.' असें ह्मणून त्यानें मजकडून यासंबंधीची

प्रतिज्ञा घेवविली व मग तो माझ्या छातीवरून उठून चालता झाला. आई, मला आतां या प्रतिज्ञेप्रमाणें वर्तन केलेंच पाहिजे. अन्यथा जर मी वर्तेन तर माझी धडगत नाहीं." हें ऐकून आई ह्मणाली, "यशोधरा! एवढ्यावरून तूं असा उदास होऊं नकोस. अशीं स्वप्नें कधीं कधीं पडत असतात. त्याबद्दल शांतीचे कांहीं उपाय केले ह्मणजे मग कांहीं भीति रहात नाहीं. तूं घाबरूं नकोस. मी सर्व कांहीं व्यवस्था करवितें. तुला वाटल्यासच ह्या स्वप्नाप्रमाणें तूं हा राज्यभार पाहिजे तर यशोमति कुमाराच्या स्वाधीन कर व खुशाल सुखोपभोग घेत रहा. या संकटाच्या शांतीप्रीत्यर्थ आपण आपली कुलदेवता जी चंडिकादेवी तिला अनेक प्राण्यांचा बली देऊन तिचें पूजन करूं ह्मणजे आपोआप देवीच्या साह्यानें संकट निवारण होईल. कसेंहि भयंकर संकट असलें तरी आपल्या देवीची अशा रीतीनें पूजा केली असतां ती हटकून त्याचें निवारण करिते अशी तिची प्रसिद्धि आहे. याखेरीज शांतीप्रीत्यर्थ आपल्या उपाध्याय-वर्गाकडून अनेक तऱ्हेचे मंत्रतंत्रादिक उपाय योजूं; जपजाप्यादि विधानें करवूं. तूं तिलमात्रहि यासंबंधी काळजी करूं नकोस." आईचें हें हिंसाप्रवर्तक बोलणें ऐकतांच माझ्या अंगावर एकदम शहारे आले व कर्ण बधिर झाल्यासारखे वाटले. तिचें बोलणें मला मुळींच ऐकवेना. माझी चित्तवृत्ति फारच चमत्कारिक होऊन गेली. मी तिला ह्मणालों, "आई, तुजसारख्या समंजस स्त्रीनें हिंसेसारख्या निषिद्ध कार्यास प्रोत्साहन द्यावें हें बरें नव्हे. विचार कर. राजेच जर स्वतः हिंसा करूं लागले, तर 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें सर्व प्रजाहि हिंसातत्पर होऊन अनेक निरपराधी प्राण्यांचे रोज खून पडत जातील व सर्वत्र बेबंदशाही माजून जाईल. शिवाय, हिंसा करण्यापासून नरकवास भोगावा लागतो हें तुला माहित नाहीं काय? जीवहिंसेसमान कोणतेंहि महत्पाप नाहीं. इतर जीवांचें अनिष्ट

चिंतून आपल्या रक्षणाची इच्छा करणें ह्मणजे अग्नीपासून शीतलता मिळण्याची इच्छा करण्यासारखेंच आहे. कारण हें प्रत्यक्षच आहे कीं, जो दुसऱ्याचें बरें पहातो त्याचें बरें होतें व दुसऱ्याचें अनिष्ट चिंतितो त्यास दुःख प्राप्त होतें. दुसऱ्याचें नुकसान करून आपलें कधींकाळीं सुद्धां बरें होणार नाहीं. जीववधामध्यें पाप आहे हें निर्विवाद आहे. अर्थात्, पापकर्मापासून सुखरूपी फलाची आकांक्षा करणें कितपत सयुक्तिक होईल? पापाचें फळ दुःख हेंच असणार; आणि हें जर खरें आहे तर अशा पापकर्मापासून संकट निवारण होण्याची आशा करणें अत्यंत चुकीचें होय. दुसरें असें कीं, जीववधादिक निंद्य पापकर्मामध्यें जर धर्म मानिला जाईल तर मग पापोत्पत्तीला कारणें कोणतीं? मग पापाची कल्पनाच सोडून द्यावयास पाहिजे. परंतु माते; अशी स्थिति नाहीं. जगामध्यें पाप हा शब्द ऐकूं येतो. अर्थात्, अमुक गोष्टी वाईट आहेत, त्या केल्या असतां इहलोक व परलोक बिघडतो, अशा तऱ्हेच्या कल्पना आपणांमध्यें रूढ आहेत. पापपुण्याची आपणांस भीति आहे आणि यामुळेंच, 'अहिंसा परमो धर्मः' हें उच्च तत्व थोड्याबहुत प्रमाणानें सर्वधर्मीयांना मान्य आहे. या तत्वाचा विचार कोणीं स्थूलमानानें केला असेल तर कोणीं अत्यंत सूक्ष्म रीतीनें केला असेल, हा प्रश्न निराळा. जैनधर्मानें या तत्वाचा विचार जेवढ्या सूक्ष्मतेनें केला आहे तेवढा कोणत्याहि धर्मानें केला नाहीं, हें मात्र निःसंशय खरें आहे.

"आपलें हिताहित, आपलें सुखदुःख, आपलें जन्ममरण, चंडिकेसारख्या देवतांच्या हातीं असतें तर जगामध्यें कर्म-नशीब-हा शब्द ऐकूंच आला नसता; व नानामतें स्थापन न होतां, सर्व लोक अशा देवतांच्याच भजनीं लागले असते. पण माते, वस्तुस्थिती तशी नाहीं. अशा देवतांना सुद्धां कर्मानें सोडिलें नसून त्यांस आपलें भवितव्य टाळतां येत नाहीं. तेव्हां अशा पारतंत्र्यावस्थेंत त्या इतरांचें भवितव्य

कसें फिरविणार हा खरोखर विचाराचा प्रश्न आहे. प्राचीनकाळीं असंख्य पुरुष कालवश झाले त्या वेळीं अशा देवतांचें अस्तित्व नव्हतें, किंवा तिला बली देण्यास पशुवर्ग अस्तित्वांत नव्हता, किंवा अशा देवतांना बली दिल्यानें आपली संकटपरंपरा नाहींशी होते या तत्वाचें ज्ञान त्या वेळच्या लोकांना नव्हतें? यांपैकीं कोणाचाहि अभाव असणें शक्य नाहीं. प्रत्येकाचें अस्तित्व असलेंच पाहिजे. अर्थात्, असें जर आहे तर तत्कालीन महापुरुष सध्यां कां नजरेस पडत नाहींत? ते कालचक्राच्या फेऱ्यांत कां सांपडले? यावरून हेंच अनुमान निघतें कीं, चंडिका किंवा तिच्यासारख्या अन्य देवता यांपैकीं कोणाहिमध्यें प्राणिवर्गाचें भवितव्य टाळण्याचें सामर्थ्य नाहीं. अर्थात्, बलिदानानें त्यांना खुष करून त्यांच्यापासून सुख मिळण्याची आशा करणें व्यर्थ होय.

"संसारामध्यें जितके ह्मणून प्राणिवर्ग आहेत ते सर्व कर्माच्या आधीन असून आपापल्या कर्मोदयानुसार ते सुखदुःख भोगित असतात. कोणी कोणाचा उपकार करित नाहींत किंवा अपकार करित नाहींत. उपकार किंवा अपकार हे शुभाशुभ कर्मेंच करित असतात. अर्थात्, उपकारअपकारसंबंधाचा—सुखदुःखासंबंधाचा—हवाला देवादिकांवर टाकणें कधींहि प्रशस्त होणार नाहीं."

माझें हें भाषण ऐकून आई ह्मणाली, "बाळा, संपूर्ण पृथ्वीमध्यें धर्मरूपी वृक्षाचें मूल वेद हें असून तद्वारा कथन केलेल्या मार्गानेंच राजे लोकांनीं जाणें, हें उचित होय. आपलें वेदशास्त्र असें ह्मणतें कीं, देवतांप्रीत्यर्थ प्राण्यांची हिंसा करण्यापासून पाप होत नाहीं आणि याच कथनानुसार देवतांना बली देण्याची प्रथा चालत आली असून या प्रथेचें अवलंबन करणारा महापुरुष स्वर्गाधिकारी समजला जातो. अर्थात्, तुलाहि अशा संकटप्रसंगीं याच मार्गाचें अवलंबन करण्यास काय हरकत आहे? दुराग्रह सोडून दे व राजमार्गाचें अवलं-

बन करून शांति स्थापन कर. भलतेच कुतर्क लढवून आपल्यावर संकट ओढून घेऊं नकोस. वेदशास्त्र पुन्हां असेंही ह्मणतें कीं, बली दिलेल्या प्राण्यांस स्वर्गप्राप्ति होते. असें जर आहे तर ज्या प्राण्यांचा आपण बली देतों, त्यांचें एकप्रकारें अभीष्टच केल्यासारखें होत नाहीं काय? अर्थात्, या बलिदानानें आपलेंहि संकटनिवारण व बली जाणाऱ्या प्राण्यांस स्वर्गप्राप्ति अशीं दोन्हीं कार्यें साधत असतां तें आपण कां करूं नये? शिवाय, राजधर्मच असा आहे कीं, प्रसंगविशेषीं अशा मार्गाचें अवलंबन करणें जरूरच असतें. तूं शास्त्रनिपुण आहेस खरा, परंतु राजधर्माचा तुला अनुभव नाहीं. त्यामुळें केवळ एका दृष्टीनेंच तूं विचार करितोस." मातेचें हें बोलणें मला ऐकवेना, सर्वांगावर शहारे उत्पन्न झाले व माझें मस्तक एकदम कंपायमान होऊन मी तिला म्हणालों, "माते, वेद वेद ह्मणून जो त्याचा इतका आधार तूं पुढें करितेस तो प्रमाण मानण्याइतकी त्याची योग्यता तरी काय आहे हें कळूं दे. वास्तविक स्थिति अशी आहे कीं, मूळ वेदामध्यें हिंसा प्रतिपादिली नसून तिच्या संबंधींचें प्रकरण मागाहून कोणा तरी गृहस्थानें घुसडलें असलें पाहिजे, असें त्याच्या रचनेच्या स्वरूपावरून सहज अनुमान होतें. कोणताहि ग्रंथ एकाच ग्रंथकर्त्याच्या हातून लिहिला गेला असतां त्यांत सहसा विरोध कोठें दिसून येणें शक्य नसतें; परंतु एकच ग्रंथ अनेक ग्रंथकारांच्या हातीं पडला व त्यास नियतकर्ता कोणी नसेल, तर त्यांत कालानुरोधानें फेरफार होणें अपरिहार्य असतें व असे फेरफार सूक्ष्म अवलोकन करणारास तत्काळ नजरेस येतात. वेदाचीहि जवळ जवळ अशीच स्थिति झाली आहे. त्याचा निश्चित असा कर्ता कोणी नसल्यानें त्यांत ठिकठिकाणीं विरोधात्मक अशीं कांहीं गमतीचीं स्थळें राहून गेलीं आहेत कीं, त्यावरून वेदाचें खरें स्वरूप चट्दिशीं नजरेस येतें.

"वेदांचा नियतकर्ता कोणी नाहीं याचें कारण ते कोणा मानवी प्राण्यानें रचिले नसून ईश्वरप्रणीत आहेत असें कित्येकांचें ह्मणणें आहे. परंतु त्यांस आमचा असा प्रश्न आहे कीं, ईश्वर जर सर्वज्ञ आहे तर त्यानें सांगितलेल्या वेदांमध्यें ठिकठिकाणीं विरोध कां दिसून येतो? सर्वज्ञानें सांगितलेल्या वाणीमध्यें मुळींच विरोध दिसतां कामा नये. दुसरें असें कीं, धडधडीत वाईट दिसणाऱ्या गोष्टीमध्यें चांगुलपणाचें आरोपण करून त्या इष्ट आहेत असें भासविण्याचा प्रयास करण्यामध्यें ईश्वरास कोणता हेतू साधून घ्यावयाचा होता? निर्विकार, निर्दोष इत्याद्यनेक गुणविशिष्ट ईश्वरास इतका प्रयास करण्याचें कारण नाहीं. या सर्व गोष्टींवरून हेंच सिद्ध होतें कीं, वेद हे प्रमाण मानण्याच्या योग्यतेचे मुळींच नाहींत.

"राजनीतीची तुझी कल्पनाहि बरीच विपरीत दिसते. खरी राजनीति, खरा राजधर्म तूं म्हणतेस तसा नसून दुष्टांचा निग्रह व सुष्टांचें प्रतिपालन करणें हीच खरी राजनीति किंवा राजधर्म समजला जातो. राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव जरी मला नसला तरी राजनीतीचीं तत्वें मी समजून घेतलीं आहेत. आपल्या बऱ्याकरितां इतर निरपराधी प्राण्यांचा प्राण घेणें ही कोठली राजनीति? कोणत्याहि कारणानें प्राणहिंसा केली तरी त्यापासून पाप उत्पन्न होणारच. देवतांना बली देण्याचे निमित्तानें प्राणहिंसा करा किंवा इतर कोणत्याहि निमित्तानें करा, त्यापासून फल हें सारखेंच उत्पन्न होणार! अमृतासारख्या मधुर भाषणांनीं मन मोहित करून विष पाजलें, तरी तें आपलें प्राणघाताचें कार्य करणारच. एवंच, प्रत्येक गोष्ट, प्रत्येक वस्तु आपापलें इष्टानिष्ट कार्य करित राहणारच हा सृष्टिनियम आहे आणि ह्मणून, त्यांच्या ठराविक पाकनिष्पत्तीहून विपरीत फलांची आकांक्षा धरणें मूर्खपणाचें होईल.

"माते, या वेळेस तूं आपल्या मातृधर्माचें उल्लंघन करित नाहींस

काय? इहपरलोकीं जेणेंकरून आत्मकल्याण होईल, असा उपदेश द्यावयाचा सोडून उलट ज्या योगें संसारबंधन ज्यास्तच मजबूत होईल, असा विपरीत उपदेश देण्याची तुला प्रवृत्ति व्हावी, हें मी आपलेंच दुर्भाग्य समजतों. यांत तुझा तरी काय दोष? माते, इतकेंहि होऊन तुझी समजूत निवत नसेल व आपलेंच म्हणणें चालविण्याचा तुझा दुराग्रह असेल तर इतर निरपराधी प्राण्यांचा वध करण्यापेक्षां मी स्वतःचेंच शीर्ष रत्नमुकुटासह देवीला अर्पण करितों, म्हणजे एक प्रकारें मी या त्रासांतून तरी मुक्त होईन व तुझ्या देवीचीहि मग कांहीं तक्रार राहणार नाहीं." असें ह्मणून मी आपली तरवार म्यानांतून बाहेर काढून मानेवर ठेवतांच एकदम चोहोंकडे हाहाःकार झाला व चंद्रमती देवीनें एकदम माझ्या मानेवरील शस्त्र काढून घेऊन व माझे दोन्ही हात धरून रुदन करीत होत्साती ती म्हणाली, "बाळा, तूं आपलें मन निर्दय करून कसलें भयंकर कर्म करण्यास प्रवृत्त झालास? इतक्या थरावर गोष्ट येऊं देण्याचें कांहीं कारण नव्हतें. बाळा, कांहीं झालें तरी इतर सर्व गोष्टींपेक्षां तुझा प्राण आम्हांस प्रिय असून त्याच्या संरक्षणार्थच तर इतकी माझी तळमळ होती. तुला जर ही गोष्ट पसंत नसेल तर राहूं दे. तुझ्या इच्छेच्या बाहेर आम्हांस थोडेंच जावयाचें आहे! यांतूनहि आपण दुसरा मार्ग शोधून काढूं." मातेच्या या करुणास्पद भाषणानें मीहि थोडा शांत झालों व कांहीं वेळ चोहोंकडे स्तब्ध झालें. नंतर माता म्हणाली "बाळा, मला एक मार्ग सुचतो आहे कीं, जेणेंकरून आपली कार्यसिद्धि होऊन जीवहिंसेचा संबंधहि राहणार नाहीं. तेव्हां, हा मार्ग पसंत करण्यास तर तुला कांहीं अडचण नाहीं? तूं कांहीं करूं नकोस. फक्त पिठाचें एक कृत्रिम कोंबडें तयार करून त्याचा आपल्या कुलदेवतेस बळी दे. यानेंहि थोड्या बहुत अंशानें कार्यसिद्धि होण्यासारखी आहे." मातेच्या एक प्रकारच्या भिडेमुळें तिचें हें बोलणें मला नाकबूल करितां येईना व अखेर तिच्या या गोष्टीस संमति

दिली. मीं तिला अशी संमति दिली तरी माझें मन मला खातच होतें. मातेला अशा रीतीनें संमति देण्यांत आपण मोठी चूक केली हा विचार मला क्षणोक्षणीं बोंचत होताच व त्यायोगें माझ्या चेहऱ्यावर अस्वस्थतेमुळें बरीच उदासीनता प्राप्त झाली होती. मातेच्या हटाग्रहापुढें माझी कांहीं मात्रा चालेना. असो.

माझी संमति मिळतांच मातेनें सेवकगणाकरवीं एक सुंदर कृत्रिम कोंबडें तयार करवून आणविलें व त्यास पुष्पहार, अलंकार वगैरेंनीं सजवून सर्व शहरांतून मिरवत मिरवत देवीच्या देवळांत आणिलें. मातेनें नंतर देवीस साष्टांग प्रणिपात करून विघ्नशांतीप्रीत्यर्थ तिची मनोभावें प्रार्थना केली व मला त्या कोंबड्याची मान कापण्यास आज्ञा दिली. मातेच्या आज्ञेप्रमाणें भीतभीतच मी त्याच्या मानेवर सुरी ठेवून ती धडापासून वेगळी केली तोंच तें कोंबडें आरवलें. त्याचा तो शब्द ऐकून आश्चर्य व भीति या योगें माझें मन व्यापून जाऊन मी असा विचार करिता झालों कीं, वस्तुतः हें कोंबडें अचेतन असूनहि त्याचे ठिकाणीं जीवत्वाचा संकल्प करून त्याचा वध केल्यामुळें त्याचा हा परिणाम झाला असला पाहिजे आणि हें खरें असेल, तर ज्या जीवहिंसेला मी भीत होतों व जी टाळण्यासाठीं व मात्राज्ञेचें पालन करण्यासाठीं अज्ञानतेनें मी अचेतन वस्तूचा बली देण्यास तयार झालों तीच अखेर माझ्या नशीबीं आली. हाय! हाय! अचेतन वस्तूच्या ठिकाणीं जीवत्वाचा आरोप करून तिचा वध केल्यानें ती संकल्पी हिंसाच होते हें मला महामूर्खाला आतां कळून चुकलें. पण आतां त्याचें काय! गोष्ट व्हावयाची ती होऊन गेली. आतां पुढें तरी फार सावधगिरीनें राहावयास पाहिजे. आपल्या इष्टानिष्टतेचा आपण स्वतःच विचार करून त्याप्रमाणें वर्तन करावयास पाहिजे. कोणाची कितीहि भीड पडली, कितीहि दाब बसला तरी आपल्या प्रामाणिक समजुतीचें उल्लंघन करितां कामा नये. परक्यांच्या मुरवतीचें आपल्या विवेकशक्तीवर कधींहि दडपण

बसूं देतां कामां नये. मातेची भीड न बाळगतां आपलें हिताहित जर मीं स्वतःच शोधलें असतें व तदनुरूप आचरण केलें असतें, तर असा पश्चात्तापाचा प्रसंग येताच ना. सर्वस्वी अंध होऊन परप्रत्ययी मी झालों त्याचा हा परिणाम. व्यर्थ दुसऱ्यांना दोष देण्यांत काय अर्थ आहे?" अशा पश्चात्तापाच्या विचारांनीं माझें मन व्यग्र झालें आहे तोंच आई ह्मणाली. "हा बली देवीचा प्रसाद ह्मणून समजला जातो याकरितां याचें मांस बली देणाऱ्याच्या सर्व कुटुंबवासियांनीं ग्रहण करणें अवश्य आहे. यापासून कौटुंबिक सर्व विघ्नें नाहींशीं होतात. तेव्हां या बलीचें सर्व मांस काढून घेऊन तें तूं घराकडे पोहोंचीव." आईच्या पूर्वोक्त्यानें माझे ठिकाणीं संताप उत्पन्न केला होता त्यांत या तिच्या बोलण्यानें अधिकच भर पडून मी अत्यंत उद्वेगानें तिला म्हणालों, "तुझी बुद्धि भ्रष्ट झाली आहे, तिच्या ठिकाणीं चांचल्य उत्पन्न झालें आहे, विवेकशक्तीची व तुझी फारखत झाली आहे असें मला आतां स्पष्टपणें ह्मणावें लागतें. अगे, मांसभक्षणानें कधीं कोणास सद्गति झाली आहे काय? परलोकची गोष्ट तर दूरच राहो; परंतु इहलोकीं सुद्धां मांसभक्षणानें कितीतरी महान् दुःखें भोगावीं लागतात? मांसभक्षकांचें शरीर ह्मणजे सर्व रोगांचें माहेरघर, जगामध्यें त्यांची मानमान्यता ह्मणजे कवडीइतकी, अशी स्थिति प्रत्यहीं आपल्या नजरेस येत असतां केवळ क्षणिक सुखाच्या आशेनें—तें मिळेल कीं नाहीं हा प्रश्न निराळा—तिकडे दुर्लक्ष करून आपल्या खऱ्या कर्तव्याची ओळख तूं विसरून जावीस व उलट पापकर्माकडे माझी प्रवृत्ति करण्याचा त्वां प्रयत्न करावास हें आश्चर्य नव्हे काय? तूं आणि मी या दोहोंतील संबंधाच्या दृष्टीनें—नात्याच्या दृष्टीनें—ही मी कितीतरी दुर्दैवाची गोष्ट समजावयास पाहिजे? अगे, मांसभक्षणानें एखादा तरी सुखी असलेला दाखीव. मांस हें उद्भिज्ज किंवा खनिज यांपैकीं कोणत्याच प्रकारचें नसून तें मिळविण्या-

करितां प्राण्यांचा वधच केला पाहिजे. तेव्हां अशा रीतीनें परजीवांच्या घातानें मिळणारें मांस भक्षण करून कोण विवेकी अखंड रौरव नरकवासाचें साधन करून ठेवील?" खोट्या पुत्रमोहानें व क्षणिक सुखाच्या लालसेनें अंधवत् बनलेल्या माझ्या मातेच्या मनावर या माझ्या कठोर भाषणानें कांहीं सुद्धां इष्ट परिणाम घडून आला नाहीं किंवा दुसरे तिसरे विकारही तिच्या चेहऱ्यावर उमटलेले दिसून आले नाहींत. ती माझें बोलणें शांतपणें ऐकून घेत होती. माझ्या बोलण्याची तिला कांहींच किंमत न वाटून उलट आपल्याच विचाराचें समर्थन करण्याच्या हेतूनें ती पुन्हां ह्मणाली, "बाळा, तुझें ह्मणणें एकपक्षीं खरें असलें तरी कृत्रिम बलीचें मांस ग्रहण करण्यांत कांहीं दोष असेलसें मला वाटत नाहीं. आपलीं शास्त्रें विशदरीतीनें सांगत आहेत कीं, बली देणाऱ्यानें बलीचें मांस ग्रहण केलेंच पाहिजे. त्याशिवाय इष्टफलसिद्धि कधींहि व्हावयाची नाहीं. त्यांतून हा पिठानें बनविलेला बली. याचें मांस ह्मणजे पीठच. तेव्हां तें ग्रहण करण्यास कोणती अडचण आहे?" मातेच्या अशा कोटिक्रमानें तर माझी चित्तवृत्ति अधिकाधिकच उदास होत चालली, व तिला कांहीं उत्तर न देतां दीक्षा घेण्याची कधीं संधि येते याची मी अत्यंत आतुरतेनें वाट पाहूं लागलों.

"मौनं अर्धसंमतिः" या न्यायानें माझें मौन पाहून मातेनें त्या गोष्टीस माझा रुकार आहे अशी आपली समजूत करून घेतली व तो बली घराकडे पाठवून दिला. मी तें सर्व पहात होतों परंतु त्या प्रसंगीं कांहीं न बोलतां उदासवृत्तीनें घरीं निघून आलों. सर्व प्रधानांस बोलावणें पाठविलें व सभा भरविण्याविषयीं त्यांस आज्ञा देऊन मी माझा पुत्र यशोमति कुमार यासह सभेंत येऊन दाखल झालों. नंतर सर्व सभासदांनीं मला प्रणाम करून ते आपापल्या स्थानीं जाऊन बसल्यावर मीं त्यांस माझें मनोगत कळविलें. व त्यांची संमति मिळवून मी यशोमतिकुमारास माझा राज्यमुकुट अर्पण केला. नंतर कुमारास

उपदेशाच्या चार गोष्टी सांगून व प्रधानवर्गासहि राज्यकारभारासंबंधीं आवश्यक अशा कांहीं सूचना करून, मी माझे इष्ट मनोरथ सिद्ध करण्याकरितां घराबाहेर पडलों. मी राज्याचा त्याग करून जात आहेसें पाहून माझ्या पुत्रास व तेथील सर्व मंडळीस फार वाईट वाटलें, परंतु माझा दृढनिश्चय पाहून माझ्या कामीं कोणीं कांहीं अडथळा केला नाहीं. अमृतादेवी मात्र त्याच वेळीं तेथें आली. तिचा चेहरा फार दुःखमय दिसत होता. ती आली तशी माझ्या पायावर एकदम लोळण घेऊन म्हणाली, "महाराज, या दीन दासीला दुःखार्णवांत लोटून जाण्याइतकें आपण आज कठोर मन कां केलें? मजकडून अक्षम्य असा कोणता मोठा अपराध घडला? मी तुमची सहचारिणी तेव्हां तुम्हांस जर दीक्षाच ग्रहण करावयाची होती तर मलाहि आपल्याबरोबर न्यावयाचें होतें. मला एकटीला घरीं ठेवून आपण जाण्यानें माझी दुःखातिशयानें किती वाईट अवस्था होईल? आपली गति ती माझी गति. आपल्याबरोबर मीहि यथाशक्ति तपश्चरण करून परलोक सुधारीन. आपल्या सहवासानें हा लाभ मला देण्याची आपली इच्छा नाहीं काय? आपल्याकरितां तर हें सर्व ऐश्वर्य आणि आपणच याचा त्याग करून जाऊं लागल्यावर मला तरी हें घेऊन काय करावयाचें आहे? आपल्याबरोबर कष्ट सोसून आपल्याच सहवासांत शेष जीवन व्यतीत करण्यांत मला जो आनंद वाटेल तो दुसऱ्या कशानेंहि वाटणार नाहीं. महाराज, दासीची ही विनंति आपणास मान्य केलीच पाहिजे. माझी आतां दुसरी कोणतीहि अपेक्षा नाहीं. फक्त एकच अपेक्षा आहे आणि ती ही कीं, आजचा दीक्षा घेण्याचा बेत रहित करावा व उदईक या दीन दासीच्या घरीं शेवटचें अन्न ग्रहण करून तिच्या समवेत दीक्षा ग्रहण करावी." पत्नीच्या मनोवृत्तींत असा हा विलक्षण फरक पडलेला पाहून मी आश्चर्यचकित झालों व आपलीच ही पत्नी कीं काय, असा क्षणभर

भ्रम उत्पन्न झाला. महारोगी, कुबड्या नीचपुरुषाशीं आसक्त झालेल्या स्त्रीचें मन एकदम तद्विपर्ययी गोष्टीकडे वळणें कसें संभवनीय आहे, हाच एक विचार माझ्या डोक्यांत वारंवार येऊं लागला. राजा, तिनें आपल्या या भाषणानें माझ्या ठिकाणीं विलक्षण क्रांति घडवून आणिली. तिच्या संबंधीं माझे ठिकाणीं करुणाभाव उत्पन्न झाला. तिची मला कींव येऊं लागली, व त्याचा परिणाम असा झाला कीं, मीं तिच्या ह्मणण्यास संमति दिली. राजा, दीक्षाग्रहणाचा एक दिवसच पुढें ढकलल्यानें पुढें महान् अनर्थ ओढवला व मीं रौद्रध्यानवश होऊन कुगतीच्या फेऱ्यांत सांपडलों. पत्नीच्या भाषणांतील कौटिल्य माझ्या नजरेस आलें नाहीं. भोळेपणानें मीं तिच्या ह्मणण्यास संमति दिल्यानें पुढें मला भयंकर परिणाम सोसावे लागले. राजा, माझी पुढील कथा फारच हृदयद्रावक आहे. "शुभस्य शीघ्रम्" या न्यायानें शुभ कामें कधींहि आजचीं उद्यावर न टाकतां जेव्हांचे तेव्हां करून टाकावयास पाहिजेत. आजचें उद्यांवर टाकल्यानें काय परिणाम होतात, हें माझ्या उदाहरणावरून चांगलें कळून येण्यासारखें आहे. असो."

क्षुल्लक पुढें ह्मणाला, "माझी संमति मिळालेली पाहून अमृतादेवीस आनंद झाल्यासारखा दिसला व ती आपल्या मंदिराकडे पाकसिद्धी करण्याकरितां निघून गेली. नंतर ठरल्याप्रमाणें दुसरे दिवशीं, मी स्नान वगैरे उरकून व जिनेश्वराचें पूजन करून मातोश्रीसमवेत पत्नीच्या महालाकडे जाण्यास निघालों. तेथें पोहोंचल्यावर तिनें आमचा मोठा आदरसत्कार केला व फारच विनय दाखवून तिनें आपल्या सेवकगणाकडून ताट वाढून आणविलें. आह्मी सर्व जण जेवावयास बसलों. नंतर आपल्या पूर्व बेतानुसार कांहीं वेळानें ती म्हणाली, "महाराज, माझ्या बापाचे घरून मला खाण्याकरितां म्हणून कांहीं लाडू आले आहेत. आपल्यावांचून मी कोणतीहि नवीन वस्तु ग्रहण करित नसल्यानें आपण अलीकडे माझ्या घरीं आलां नाहींत ह्मणून

मीं ते जसेच्या तसेच पेटींत ठेवून टाकिले आहेत. सुदैवानें आज आपण आला आहांत, तरी ते लाडू आपण सर्व जण मिळून भक्षण करूं." असें म्हणून तत्काळ ती जेवतां जेवतांच उठली व एका पेटींतून कांहीं लाडू बाहेर काढून ते तिनें आमच्या ताटांत वाढिले. राजा, ते लाडू विषमिश्रित होते. तिच्या या वर्तनाचा मला थोडा संशय आला खरा, परंतु लागलीच तो नाहींसा होऊन मीं तो खाण्यास सुरवात केली. एकदोन घास पोटांत गेले तोंच मला घेरी आल्यासारखें वाटलें, सर्व दिशा फिरूं लागल्याप्रमाणें भास झाला व त्या योगें माझा पूर्वसंशय पुन्हां जागृत होऊन शरीरस्थितीमध्यें जसजसा पुढें बदल होत चालला तसतसा तो दृढ होत चालला. विषप्रयोगासंबंधानें माझी पक्की खात्री झाली व पुढें मी जास्त वेळ तेथें न बसतां लागलीच घरीं येऊन आसनावर बसणार, तोंच मूर्च्छावश होऊन मी खालीं पडलों. हें पाहून आजूबाजूची सर्व मंडळी व अंतःपुरांतील स्त्रिया धांवून आल्या. अर्धवट मूर्च्छित असतांनाच माझ्या तोंडांतून अडखळत उद्गार बाहेर पडले कीं, "मला विषप्रयोग झाला आहे, वैद्यांना बोलवा." अमृतादेवीहि माझ्या पाठोपाठ त्या ठिकाणीं आलीच होती. माझें हें बोलणें तिनें ऐकलें मात्र, तोंच वैद्यानें माझें विष नाहींसें करून मला उठविल्यावर पुढें होणाऱ्या आपल्या विटंबनेचें भेसुर चित्र तिच्या समोर उभें राहिलें. ती फार घाबरून गेली व मला कायमचीच मुक्ति देण्याचा विचार करून बाह्यतः पतीच्या मूर्च्छनेनें आपणास अपरिमित दुःख झालें आहे, हें दाखविण्याच्या मिषानें आपले केस वगैरे मोकळे सोडून ती मोठमोठ्यानें विलाप करूं लागली व हा दुःखावेग न साहिला गेल्यामुळेंच कीं काय, आपणासहि मूर्च्छा आल्याचें ढोंग करून ती माझ्या अंगावर पडली. तिनें आपल्या गळ्यांतील हार तत्काळ तोडून टाकिला व संधी साधून नकळत इतक्या निर्दयतेनें तिनें माझा गळा दाबला कीं, त्यासरशीं माझी प्राणज्योत एकदम नाहींशीच झाली.

राजवाड्यांत, अंतःपुरांत व शहरांत, चोहोंकडे एकच हाहाःकार उडून गेला. अमृतादेवीच्या महालामध्यें माझी माता विषभक्षणानें मूर्च्छित होऊन पडली होती, तीहि कांहीं वेळानें परलोकवासी झाली व आह्मां दोघां मातापुत्रांचा अंत्यसंस्कार एकाच ठिकाणीं करण्यांत आला.

माझ्या दुसऱ्या स्त्रियांपैकीं कांहींनीं त्यानंतर उदासवृत्तीमुळें दीक्षा ग्रहण केली, तर कांहींनीं भोगोपभोग कमी केले व माझा पुत्र यशोमती राजा निष्कंटकरीतीनें राज्य चालवूं लागला.

भाग ४ था समाप्त.

भाग ५ वा.

क्षुल्लक मारिदत्त राजास पुढें ह्मणालाः—"राजा, येथून माझ्या हालअपेष्टांस सुरुवात झाली. यशोधर राजाच्या कुडींतून माझा प्राण निघून गेल्यानंतर, एका पर्वतावर मी मयूरीच्या पोटीं जन्म घेतला. एके दिवशीं, एक भिल्ल पारधी त्या ठिकाणीं येऊन त्यानें माझ्या मातेवर धनुष्यबाण फेंकलें, त्यामुळें ती घायाळ होऊन कांहीं वेळानें मृत झाली. नंतर त्यानें मला एका खंदकांत लोटून देऊन त्या मृत मयूरीचे टक्के करण्याकरितां तिला एके खेडेगांवीं तो घेऊन चालला. परंतु कर्मधर्म-संयोगानें वाटेंत त्याला कांहीं चोरांनीं गांठून ती मयूरी त्याजपासून हिरावून घेतली व ते पळून गेले. हातची शिकार गेल्यामुळें हताश होत्साता तो भिल्ल नंतर घरीं आला, परंतु घरीं अठराविश्वे दारिद्र्य असल्यामुळें पोराबाळांची निर्वाहाची सोय आज झाली नाहींसें पाहून, त्याच्या स्त्रीनें त्यास घराबाहेर हांकून लाविलें. नंतर ज्या खंदकांत मला टाकिलें होतें, तेथें पुन्हां मला हुडकीत हुडकीत तो आला व मला उचलून एका बाजारीं नेऊन तेथें एका कोतवालास अल्प किंमतीनें विकलें. त्या कोतवालानें मला खाऊं पिऊं घालून माझा

चांगला सांभाळ केला व कांहीं दिवसांनीं यशोमती राजास (माझ्या मुलास) मला नजर केलें. पूर्वजन्मीच्या संबंधामुळें यशोमती राजास मला पाहून फार मोह उत्पन्न झाला व त्यानें माझा सांभाळ करण्याकरितां मला त्याच्या आश्रयाखालील एका वृद्ध मनुष्याच्या स्वाधीन केलें.

माझी आई चंद्रमती, जी विषभक्षणानें मरण पावली होती, ती कर्नाटक देशामध्यें कुत्री होऊन जन्मली. तेथील राजानें तिला बाळगिलें होतें. कर्मधर्मसंयोग असा कीं, तेथील राजाचा व यशोमतीचा चांगला स्नेह असल्यामुळें त्यास ती कुत्री यशोमती राजास नजर करण्याची सहज एके दिवशीं बुद्धि झाली व त्याप्रमाणें त्यानें ती त्याजकडे पाठवूनहि दिली. पूर्वजन्मीच्या संबंधामुळें अर्थातच तिलाहि पाहून यशोमती कुमारास मोह उत्पन्न झाला व त्यानें तिला ठेवून घेतलें.

एके दिवशीं, मी राजवाड्यावरील गच्चीवर मौजेनें क्रीडा करित असतां माझी नजर माझ्या पूर्वजन्मीय स्त्रीच्या महालाकडे गेली. तेथें ती त्या वेळीं आपल्या कुबड्या जाराशीं रममाण झाली होती. महालामध्यें भयंकर दुर्गंध सुटला होता. त्यासंबंधीं दासीजनाचे अनेक तर्कवितर्क चालले होते. ती गुणगुण माझ्या कानीं येतांच मला पूर्वभवीची आठवण होऊन तिचें नातें मीं ओळखिलें, व अझूनहि तिला दुष्कृत्यांत रत असलेली पाहून माझ्या अंगाचा भयंकर संताप झाला, व त्यासरशीं माझ्या कोत्या सामर्थ्याचा विचार न करितां तेथून एकदम उडून स्त्रियेच्या मस्तकावर एक जोराचा सपाटा हाणिला व तत्क्षणीं दुसऱ्या एका उच्चस्थलीं जाऊन बसलों. अचानक रीतीनें मस्तकीं टोला बसलेला पाहून अमृतादेवी घाबऱ्या मुद्रेनें इकडे तिकडे पहात असतां, मी दुसऱ्यांदा टोला मारण्याकरितां उठून तिच्या मस्तकीं बसणार तोंच, तिनें मला धरिलें व माझ्या मर्मस्थानीं असा एक घाव मारिला कीं त्यासरशीं मी मोठ्यानें एक किंकाळी फोडून

जमिनीवर मूर्च्छा येऊन पडलों. त्या वेळीं यशोमती राजा जवळच कोठें असल्यामुळें ती किंकाळी कानीं पडतांच त्या ठिकाणीं तो धांवत आला व माझी ती आत्यंतिक अवस्था पाहून भयभीत होत्साता "अरे मोर पडला धरा! धरा!!" असें मोठ्यानें उद्गारला. माझीं शंभर वर्षें पुरींच भरलीं होतीं. त्याच्या त्या 'धरा' या शब्दानें राजाच्या कुत्रीनें (माझी पूर्वजन्मींची आई) माझ्यावर एकदम झडप घातली व माझें पुरेंच काम केलें. आपल्या ओरडण्याचा असा विपरीत परिणाम झालेला पाहून राजास फार संताप चढला व आपल्या तरवारीचा एकदम तिच्यावर प्रहार करून त्यानें तिला जीवन्मुक्त केलें. पूर्वजन्मींचे राजाचे आम्ही संबंधीच; तेव्हां अर्थातच आम्हांवर त्याचा अतिशय लोभ जडला असल्यामुळें, आमचा अशा वाईट रीतीनें अंत झालेला पाहून त्यास आपल्या कोणी संबंधी जनवियोगाप्रमाणें दुःख झालें, व आम्हां उभयतांच्या शरीराचा यथाविधि प्रेतसंस्कार करवून पुन्हां आमच्या आत्म्यास शांति मिळावी या सदिच्छेनें ब्राह्मणांस अनेक प्रकारचीं दानें व भोजनें दिलीं. पण त्याचा आम्हांस काय उपयोग? आमचें जें व्हावयाचें तेंच झालें व पुन्हां व्हावयाचें तेंच होणार. असो.

यानंतर मी जाहक[1] झालों व माझी माता सर्पयोनींत जन्म पावली. या योनींत आम्हां उभयतांचा मोठ्या दुःखामध्यें अंत होऊन उज्जयनी-जवळील शिप्रानामक नदीमध्यें आम्ही उभयतां रोहिताक्ष मत्स्य व सुसर असे होऊन जन्मलों. पूर्वजन्मीय वैरामुळें एके दिवशीं तिनें मला पकडून भक्षण करण्याकरितां आपल्या तोंडामध्यें धरिलें असतां, त्याच वेळीं त्या डोहांत जलक्रीडा करित असलेल्या कांहीं राजदासीं-तून एकीनें दुसऱ्या एका दासीस विनोदानें ढकलिलें, तों ती अना-यासें मजवरच पडून त्या तिच्या धक्यानें मी सुसरीच्या तोंडांतून

१ या शब्दाचे दोन अर्थ आढळतात; १ केंसाळ मांजर व २ जळू. परंतु प्रस्तुतस्थलीं पहिलाच अर्थ ग्राह्य दिसतो.

निसटून जाऊन एका बिळांत जाऊन बसलों. माझ्या जागीं ती दासी आलीसें पाहून त्या सुसरीनेंहि कांहीं विचार न करितां तिला आपल्या तोंडांत धरिलें व आपल्या नखांनीं तिला फाडून तिचें भक्षण केलें. हें पाहून इतर दासी तेथून एकदम पळाल्या व घाबऱ्या मुद्रेनें त्यांनीं सर्व वृत्तांत राजास कळविला. राजानें तो वृत्तांत ऐकून घेऊन धीवरास ती सुसर धरून आणण्याविषयीं आज्ञा केली व राजाज्ञेप्रमाणें त्यांनीं तिला धरून आणून राजापुढें हजर करितांच, तिचे तुकडे तुकडे करून टाकण्यास त्यानें आज्ञा केली. या भवांत माझ्या मातेचा अशा वाईट रीतीनें अंत झाला.

इकडे मी त्या सुसरीस धरून नेलेंसें पाहून बिळांतून निघालों व पाण्यामध्यें निर्भयतेनें यथेच्छ विहार करूं लागलों. कर्मधर्मसंयोगानें एके दिवशीं पूर्वींचेच धीवर लोक त्या ठिकाणीं येऊन त्यांनीं आपलें जाळें पाण्यांत टाकिलें व मी त्या जाळ्यामध्यें सांपडलों. अशी मोठी शिकार हातीं आलेली ते थोडेच सोडतात? त्यांनीं मला राजद्वारीं नेलें व राजाच्या स्वाधीन केलें. त्या दिवशीं आमचीं श्राद्धतिथि असल्यामुळें यशोमतीनें ब्राह्मणभोजनाची जंगी तयारी चालविली होती. अशांतच एक महामत्स्य (मी) मिळालेला पाहून राजास फार आनंद झाला व याच्या सेवनानें स्वर्गांतील पितर फार संतुष्ट होतील, या विचारानें त्यानें मला पाकशाळेकडे पाठविलें व तेथील आचाऱ्यांनीं मला कापून काढून पुढें जें करावयाचें तें केलें. भोजनाच्या वेळीं यशोमतीसुद्धां सर्व ब्राह्मणांनीं माझ्या मांसावर यथेच्छ ताव मारिला.

मारिदत्ता! कोण आमची ही दैना! माझ्या मातेची ती दशा व माझी इकडे ही दशा! **माझाच वध करून माझ्या मांसावर हा माझा पुत्र मला संतुष्ट करणार!** काय दैवगती? विचित्रस्वरूपी संसारामध्यें असे वेडेचार कितीतरी असतील? मारिदत्ता! आमच्या दुःखाची मर्यादा येथें संपली नाहीं. भयंकर दुःख तर अझून पुढेंच आहे. असो.

नंतर माझी माता शेळी होऊन जन्मली व मी तिच्याच पोटीं बोकड होऊन जन्मलों. पुढें मी मृत्यु पावून तिच्याच पोटीं पुन्हां जन्म घेतला व माझी माता मृत्यु पावून कोणा एका देशामध्यें म्हैस होऊन जन्मली. एके दिवशीं तेथील एका व्यापाऱ्यानें पुष्कळसा माल या ह्मशीवर लादून तिला यशोमतीच्या राजधानीस आणलें, व तेथील एका सरोवरावर नेऊन तिला पाणी पाजवित असतां त्याच वेळीं राजाचे कांहीं घोडे पाणी पिण्याकरितां त्याच सरोवरावर आले. त्या घोड्यां-मध्यें राजाची एक आवडती घोडी होती, तिची व या म्हशीची अकस्मात् नजरानजर झाली. त्याबरोबर पूर्वजन्मीय वैर जागृत होऊन म्हशीस त्वेष आला व ती या घोडीच्या अंगावर चालून जाऊन तिनें तीस आपल्या शिंगांनीं भोंसकून ठार केलें. यशोमतीराजास ही हकीकत कळली मात्र, कीं लागलीच त्यानें त्या व्यापाऱ्याचा सर्व माल जप्त करण्याविषयीं व त्या म्हशीस धरून आणण्याविषयीं आपल्या सेवकांस आज्ञा केली. आज्ञेबरहुकूम त्यांनीं त्या म्हशीस धरून आणून राजासमोर उभें करतांच त्वेषानें राजानें त्या म्हशीस जिवंत-पणींच शिजवून काढण्याचा आपल्या आचाऱ्यांस हुकूम केला. राजाज्ञाच ती! ती अमलांत येण्यास काय उशीर? एक मोठी कढई आणवून त्या कढईमध्यें पाणी भरून त्यांत मसाल्याचे सर्व क्षार-पदार्थ टाकून दिले व खालीं अग्नि लावून त्या म्हशीस आंत ढकलून दिलें. राजा! त्या वेळच्या त्या म्हशीच्या प्राणांतिक वेदना काय विचाराव्यात? एक अग्नीचा ताप, आणि दुसरें, क्षारपदार्थमिश्रित कढत जल पोटांत गेल्यामुळें सर्वांगांत उडालेला भडका, यामुळें मोठमोठ्यानें ती हंबरडे फोडूं लागली, पण तिच्या हंबरड्याची कोणासही दया आली नाहीं. अखेर तापातिशयानें तिच्या शरीरांतील सर्व आंतडीं बाहेर पडलीं व अशा भयंकर रीतीनें तिचा अंत झाला.

आतां माझी अवस्था काय झाली ती पहा. त्या वेळेस मला तेथेंच

बांधून ठेविलें होतें. म्हशीचा अशा रीतीनें निकाल लावल्यावर राजाची मजवर नजर गेली व मलाहि ठार करण्याविषयीं त्यानें आपल्या सेवकांस आज्ञा दिली. त्याबरोबर मला ठार करून माझें व म्हशीचें मांस यांवर भोजन तयार केलें व आम्हां मातापुत्रांच्या श्राद्धतिथी-प्रीत्यर्थ ब्राह्मणांना आमंत्रण करून त्यांस तें मांसाचें भोजन वाढलें, व त्यांबरोबर खुद्द राजा व अमृतादेवी या दोघांनींहि तें यथेच्छ सेवन केलें.

राजा, या योनीमध्यें आम्हां मातापुत्रांचा अशा वाईट रीतीनें अंत झाला. हें सर्व आमच्या कृतकर्माचेंच फळ होय. जीवहिंसेसमान दुसरें पातक नाहीं व दयामयी धर्मासारखा दुसरा धर्म नाहीं. शहाण्या मनुष्यांनीं हेयोपादेयाचा पूर्ण विचार करून वर्तन करित असावें. कारण, अविचाराचा परिणाम फार भयंकर होतो.

भाग ५ वा समाप्त.

भाग ६ वा.

क्षुल्लक पुढें म्हणाला, "मारिदत्ता! नंतर आह्मी दोघे मातापुत्र कोंबडीच्या गर्भामध्यें राहिलों. कांहीं दिवसांनीं आह्मी अंड्यांतून बाहेर पडून थोडेसे मोठे झाल्यावर आमचें गोजिरवाणें रूप पाहून एक कोतवाल आमच्यावर फारच मोहित झाला, व त्यानें आह्मांस विकत घेऊन आमचें चांगल्या तऱ्हेनें पालनपोषण केलें. पुढें, एके दिवशीं, त्यानें आह्मांस नजर करण्याकरितां राजाकडे नेलें. पूर्वजन्मीय संबंधामुळें राजाहि आह्मांस पाहून मोहित झाला व त्यानें कोतवालाची विनंति मान्य करून आह्मांस त्याचेचकडे सांभाळ करण्याकरितां सोंपविलें.

पुढें वसंत ऋतु प्राप्त झाला असतां, एके दिवशीं राजा आपल्या सर्व स्त्रियांसह एका वनामध्यें क्रीडा करण्याकरितां गेला. हें वर्तमान कोतवालास समजलें तेव्हां, तोहि आमचा पिंजरा बरोबर घेऊन राजाचें मनरंजन करण्याच्या हेतूनें त्या ठिकाणीं आला. तेथें आमचा पिंजरा एका झाडास टांगून तो वनशोभा पहात इकडे तिकडे फिरत आहे तोंच, त्याच्या पूर्वसुकृताच्या उदयानें एका अशोक वृक्षाखालीं एक मुनि ध्यानस्थ बसलेले त्याच्या नजरेस पडले. त्यांचें तपस्तेज कांहीं विलक्षण होतें, तथापि त्याचा प्रथमदर्शनीं कोतवालाच्या मनावर कांहीं परिणाम न होऊन उलट त्यांचें तें नग्न स्वरूप यास अपशकुनासारखें भासूं लागलें व त्यांस कोणत्या उपायांनीं वनांतून काढून लावावें, याविषयीं तो विचार करूं लागला. निरपराधी साधु–आपल्या तपामध्यें निमग्न–कोणास त्यापासून कोणत्याहि तऱ्हेचा त्रास नाहीं–तेव्हां अशास एकदम घालवून देणेंहि बरें नव्हे, कांहीं युक्तिप्रयुक्तीनेंच त्यांस घालविलें पाहिजे, अशा विचारांत तो असतां त्यास त्या मुनीशीं वितंडवाद घालून त्यांस भंडावून सोडावें ह्मणजे अनायासें आपलें कार्य होईल, ही कल्पना सुचली व पुन्हां विचारांतीं ही कल्पना बरी वाटल्यावर तो त्या उद्देशानें त्या मुनीकडे गेला. परंतु भवितव्य कांहीं निराळेंच होतें. त्याची आकांक्षा व्यर्थ होती. त्याच्या पूर्वसुकृताचा यावेळेस जबर उदय होता ह्मणूनच त्यानें वाईट फलाकांक्षेनें आरंभ केलेल्या कार्याचा अखेर परिणाम कल्याणप्रदच घडून आला, हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल.

तो कोतवाल याप्रमाणें त्या मुनीकडे गेला त्या वेळीं मुनीनींही आपलें ध्यान सोडिलें होतें. कोतवालानें त्यांस नमस्कार केला, त्या वेळीं मुनीनींहि त्यास "धर्मवृद्धिरस्तु" असा आशीर्वाद दिला. नंतर कोतवालाचीं व त्यांचीं खालीलप्रमाणें प्रश्नोत्तरें झालीं.

कोतवाल—"महाराज! आपण जो "धर्मवृद्धिरस्तु" असा आशीर्वाद दिला तो मीं शिरोधारण केला; परंतु वीरपुरुषांचा खरा धर्म धनुष्य हाच असून त्याच्या गुणद्वारें शत्रुविध्वंसनानिमित्त जो बाण सोडला जातो तोच मोक्ष होय. याखेरीज दुसऱ्या धर्माची व मोक्षाची कल्पना आम्हां वीरपुरुषांस असणें शक्य नाहीं. अर्थात्, जर आमच्या समजुतीनें मोक्ष हा दुसरा पदार्थच नाहीं तर मोक्षसंबंधीं सुख तें कसलें? त्या नुसत्या वल्गना होत. ह्मणूनच पंचेंद्रियसंबंधीं विषयसेवन हेंच खरें सुख आह्मी समजतों.

"मुने! तुह्मी या निर्जन अरण्यांत वास करून काय करित आहांत? धड तुमच्या शरीरावर एक वस्त्रहि नाहीं, तुमचे सर्व अवयव अत्यंत क्षीण होऊन गेले आहेत, एक निमिषमात्रहि तुह्मी निद्रा घेत नाहीं, रात्रंदिवस डोळे मिटून ध्यान करित आहांत, तें कोणाचें ध्यान करित आहांत हें कळवाल काय? आह्मांस तर यामध्यें भ्रांति उत्पन्न होते. या आपल्या नित्यक्रमानें आपल्यास काय लाभ वाटत असेल तो असो, परंतु आह्मांस तर हाच उत्तम मार्ग दिसतो कीं, अशा फलविहीन कर्माचरणानें आपलें शरीर क्षीण करून घेण्यापेक्षां विषयोपभोगाचें रुचिपूर्वक सेवन करणें बरें."

मुनि—"वत्सा! कर्मलिप्त जीवापासून कर्माचा वियोग करून एकट्या शुद्धस्वरूपी जीवाचें आम्हीं ध्यान करित असतों; आणि अजर, अमर व शाश्वत, असें ठिकाण जें निर्वाण त्याप्रत पोहोंचण्याची आम्ही इच्छा करित आहोंत.

"वत्सा! तूं या दुर्बल, मलीन व वस्त्ररहित शरीराची निंदा करित आहेस, परंतु या चतुर्गतिरूप संसारपरिभ्रमणामध्यें जीवानें अनेक प्रकारचे चांगले व वाईट असे पर्याय धारण केले आहेत. संसारामध्यें असा एकहि पर्याय राहिला नसेल, कीं जो या जीवानें धारण केला नाहीं. वत्सा! या अशरणस्वरूपी संसारामध्यें आ-

जपर्यंत जें जें दुःख मीं भोगिलें आहे त्याची मला उत्तम प्रकारें आठवण आहे. त्यामुळेंच इंद्रियजनित विषयसुखाचा त्याग करून अत्यंत बलिष्ठ अशा मोहास निर्बल करून मीं हा वेष ग्रहण केला आहे; व या निर्जनवनस्वरूपी एकांतवासाचा स्वीकार केला आहे. आमच्या मुख्य ध्येयप्राप्तीचा हाच खरा मार्ग आहे. अन्य सर्व मार्ग संसार-परिभ्रमण वाढविणारेच आहेत.

"जीवाला आधारभूत जें शरीर आहे तें यद्यपि अचेतन आहे, तथापि बैलाच्या साह्यानें चाललेल्या गाड्याप्रमाणें चैतन्याच्याच[1] योगानें त्यास हलनचलन मिळत आहे. यामुळें तें शरीरच चैतन्य-मयी असल्याचा भास होतो, परंतु तो भासच आहे. वस्तुस्थिति याहून निराळी आहे. आत्मा व शरीर हे परस्पर भिन्न आहेत. बै-लाशिवाय जसा गाडा चालावयाचा नाहीं, त्यास गति मिळावयाची नाहीं, तद्वतच चैतन्याशिवाय या पुद्गल[2]परमाणुमयी शरीरास हलन-चलन मिळावयाचें नाहीं. अर्थात्, जीव व शरीर हे भिन्नस्वरूपी आहेत हें सिद्ध झालें.

"असें जर आहे—आत्मा व शरीर हे भिन्न आहेत-तर अशा परक्या शरीराचे ठिकाणीं आम्हीं आपला मोह कां ठेवावा? आमच्या खऱ्या स्वरूपाची प्राप्ति हेंच एक आमचें मुख्य कर्तव्य उरलें असून, तत्प्रीत्यर्थ आम्हीं आपल्या शुद्धस्वरूपाची कल्पना करून त्याचेंच ध्यान अहर्निश करीत असतों. आत्मस्वरूपावांचून दुसऱ्या ध्यानाची आह्मांस जरूरीच नाहीं.

"आह्मी जें अन्न ग्रहण करितों तें त्यामध्यें आसक्ति म्हणून नव्हे, तर संयमवृद्धीकरितां शरीर हें कारणीभूत असल्यामुळें तें टिकावें ह्मणूनच ग्रहण करितों. आणि इंद्रियदमन करण्याविषयीं निरंतर

---

१ जीवनरूपशक्ति. २ स्पर्श, रस, गंध आणि वर्ण हे चार गुण ज्यांत आहेत तें पुद्गल होय.

तत्पर राहून अशुभ कर्मवर्गणांचा आत्मप्रदेशामध्यें प्रवेश न होऊं देण्याविषयीं अतिशय सावधगिरी बाळगितों."

कोतवाल—"भो मुने! शरीरापासून जीव भिन्न असल्याचें आपण सांगितलें त्यावर माझा मुळींच भरंवसा बसत नाहीं. कारण, ज्याप्रमाणें पुष्पापासून गंध भिन्न असणें शक्य नाहीं, त्या दोहोंची जशी एकरूपता आहे तद्वतच, आत्मा व शरीर यांची स्थिति आहे. त्यांच्या भिन्नतेची कल्पना करणें चुकीचें होईल. पुष्पाचा नाश झाला असतां त्याबरोबरच त्याच्या गंधाचाहि ज्याप्रमाणें नाश होतो त्याप्रमाणेंच, शरीराचा नाश झाला असतां त्याबरोबर त्याच्या आत्म्याचाहि नाश व्हावयास पाहिजे. ह्मणूनच आमचा असा सिद्धांत आहे कीं, शरीराला कष्ट देण्यापासून आत्म्यालाहि कष्ट होतात."

मुनि—"वत्सा, आत्मा आणि शरीर यांची भिन्नता प्रत्यक्षसिद्धच आहे. तुझेंच पुष्पाचें उदाहरण मीं घेतों. चंपकपुष्प तेलामध्यें टाकिलें असतां त्याचा मूळचा सुगंध राहील काय? गंधाबरोबर पुष्पाचाहि नाश होतो असें म्हणावें तर येथें पुष्प कायम आहे. मग गंध कोठें गेला? यावरूनच पुष्प व गंध यांची भिन्नता सिद्ध होते, आणि हीच युक्ति आत्मा व शरीर यांचे ठायींहि लागू केल्यास अशीच प्रतीति येईल."

कोतवाल—"देहाहून आत्मा भिन्न असल्याचें आपण प्रतिपादितां, परंतु देहामध्यें आत्म्यास येतां जातां कोणीं पाहिलें आहे काय? तुम्हीं तें पाहिलें असेल तर सांगा. हें शरीर मात्र स्त्रीचें रुधिर व पुरुषाचें वीर्य यांपासून बनलेल्या गर्भरूपी गृहामध्यें वृद्धिंगत होत असलेलें आपण पहातों. त्यांत पुन्हां निराळा आत्मा कोठून शिरला?"

मुनिराज—"वत्सा, येतां जातां जीव दिसत नाहीं हें तुझें म्हणणें खरें आहे, परंतु एखादी वस्तु आपल्या अमूर्तत्व गुणाच्या योगानें दृश्यमान होत नसल्यास तेवढ्यावरूनच तिचें अस्तित्व नाक-

बूल करितां येईल काय? दुरून ऐकूं येणारे शब्द आपणांस प्रत्यक्ष दिसतात काय? कर्णेंद्रियाचा तो विषय असल्यामुळें आपणांस ते प्रत्यक्ष दिसत नसले तरी कर्णेंद्रियाच्या साह्यानें त्यांचें अस्तित्व आपण कबूल करितों. याच नियमास अनुसरून संसारामध्यें अनेक योनि धारण करणारा जीव, आपल्या सूक्ष्मत्व स्वरूपाच्या योगानें प्रत्यक्ष दिसत नसला तरी त्याचा अभाव समजला जात नाहीं. अनुमानज्ञानानें तो ज्ञात होतो. यामध्यें मुख्य कारण हेंच आहे कीं, ज्या इंद्रियाचा जो विषय ठरलेला आहे, तें त्यासच ग्रहण करणार. ठरींव विषयाहून अन्य विषय तद्द्वारा ग्रहण करितां येणार नाहीं. उदाहरणार्थ, नासिका इंद्रियाचा विषय जो गंध, तो तद्व्यतिरिक्त इतर ह्मणजे नेत्र, कर्ण, जिव्हा, आणि स्पर्शन या इंद्रियांस ग्रहण करितां येणार नाहीं. याचप्रमाणें बाकीच्या इंद्रियांचेंहि समजावें.

"बा कोतवाला! हें निरूपण फक्त मूर्तिक पदार्थांपुरतेंच झालें. म्हणजे मूर्तिक इंद्रियांचा विषयहि मूर्तिकच असतो व मूर्तिक विषयास मूर्तिक इंद्रियच ग्रहण करितें. आतां मूर्तिक विषयांमध्यें सुद्धां जर इंद्रियवर्गासंबंधानें वर दर्शविलेली मर्यादा आहे, तर अमूर्तिक विषयास मूर्तिक इंद्रिय ग्रहण करूं शकतें, हें विधान कितपत युक्तीस अनुसरून होईल?

"हा जीव नामक पदार्थ अमूर्तिक असून त्याचें अमूर्तत्व ज्ञात होणें हा केवलज्ञानाचा[1] विषय आहे. जीव द्रव्याचें वस्तुस्वरूप केवलज्ञानद्वाराच अवलोकितां येणें शक्य आहे. अर्थात्, तें केवली भगवानांशिवाय इतरांस कसें ज्ञात होणार? या सर्व विवेचनावरून देहांत-

---

१ त्रैलोक्यांतील संपूर्ण पदार्थांचें हस्तामलकवत् विशद व पूर्ण ज्ञान होणें यास केवलज्ञान ह्मणतात; व हें ज्ञान ज्यांना प्राप्त झालें आहे त्यांस केवली भगवान् असें ह्मणतात.

र्गत जीव पदार्थ देहापासून भिन्न आहे हा आमचा सिद्धांत सत्य ठरतो."

मुनींचें हें विवेचन ऐकून कोतवाल पुन्हां म्हणाला–"महाराज! देह आणि आत्मा यांचें परस्पर भिन्नत्व घटकाभर आम्ही कबूल करूं. परंतु हें सांगा कीं, आत्म्यास एका योनीमधून दुसऱ्या योनीमध्यें फिरवणारा कोणी तरी कर्ता पुरुष असला पाहिजे; तरी तो कोण आहे व त्याचें स्वरूप काय आहे?"

मुनि—"या चैतन्यस्वरूपी आत्म्यास अनेक योनींमध्यें भ्रमण करविणारें एक अचेतन कर्म आहे आणि तेंच या जीवास चतुर्गतीमध्यें व चौऱ्यांशीं लक्ष योनींमध्यें आपल्या मर्जीनुरूप नर्तन करावयास लावतें. या त्रैलोक्यांत सर्वांत अत्यंत बलिष्ठ ह्मणजे एक कर्मच असून त्याच्या राज्याची व्याप्ति संपूर्ण त्रैलोक्यभर पसरली आहे; आणि ज्याप्रमाणें, लोहचुंबकाच्या सांनिध्यानें आकर्षित झालेला लोहपिंड निर्वीर्य होऊन जाऊन सर्वांशीं चुंबकाच्या स्वाधीन राहतो त्याप्रमाणें, जीव हा कर्मेंकरून आकर्षिला गेला आहे आणि त्याचें भवितव्य पूर्णांशीं कर्माधीन होऊन बसलें आहे.

"कर्मप्रकृतींच्या अनुरोधानें हा जीव संकोच व विस्तार या दोन्हीं स्थितींस धारण करितो. हा जीव अत्यंत सूक्ष्म शरीरहि धारण करितो व प्रचंड असें हत्तीचें शरीरहि धारण करितो. एवंच, कर्मप्रकृत्यनुसार ज्या तऱ्हेचें शरीर मिळेल त्याच शरीराच्या मानानें तो आपले प्रदेश संकुचित किंवा विस्तृत करून राहतो. म्हणून जीवास शरीरप्रमाणी असें आचार्यांनीं सांगितलें आहे.

"हा जीव जर संपूर्ण लोकप्रमाण, सर्वव्यापी, निश्चल आणि निष्क्रिय असा मानला जाईल तर त्याचें परिभ्रमण कोठून राहणार व भीषणस्वरूपी कर्मबंध कोणास व कसे होणार? निवळ शुद्धस्वरूपीच जीव मानिल्यानें गुरुशिष्याचा संबंध तरी कसा राहणार?

मुळींच राहणार नाहीं. सर्व जीव एकवर्गी होऊन जातील. यावरून हेंच सिद्ध होतें कीं, हा जीव आपल्या विभावरूप परिणामांनीं बद्ध झालेल्या कर्मेंकरूनच अनेक प्रकारचीं शुभाशुभ कार्यें करित असून पुन्हां त्या कार्यानुसार कर्मबंध करून घेतो.

"जर शरीरासच आत्मा ह्मणाल तर शरीर जडस्वरूपी असल्यामुळें आत्म्यासहि तद्रूपच व्हावें लागेल आणि अशा रीतीनें आत्म्यास अचैतन्यावस्था जर प्राप्त होईल, तर इंद्रियवर्गाच्या साह्यानें होणारा तत्तद्विषयानुभव कोणास व कसा होणार? अर्थात्, सर्व सृष्टि शून्यमय होऊन जाईल व सर्व अनर्थ होईल. यावरून देहास आत्मा मानणें सर्वथैव चुकीचें आहे. आत्मा देहधारी असूनहि तो देहापासून भिन्न व ज्ञानी आहे असेंच मानणें भाग आहे.

"चार्वाकमतस्थापक बृहस्पति नामक आचार्यांनीं पृथ्वी, आप्, तेज, वायु आणि आकाश या पंच पदार्थांनाच ब्रह्मा, हरि, हर, ईश्वर आणि शिव अशीं पांच नांवें दिलीं असून, पुन्हां ते असें प्रतिपादितात कीं, वरील पांच प्रकारच्या पदार्थसमूहानेंच स्पर्श, रस, गंध, वर्ण आणि शब्द एवं पंचगुणविशिष्ट जीव नामक पदार्थ बनला आहे. चार्वाकमतानुयायींचें हें म्हणणें सर्वथैव विरुद्ध आहे. कारण, जीव हा अनादिनिधन आणि चैतन्यगुणविशिष्ट असून अमूर्तिक आहे. यामुळें स्पर्शादि पांच गुण जीवाचे नसून संसारावस्थेमध्यें तो देहधारी झाला असतां पंचेंद्रियांच्या साह्यानें तो ते गुण अनुभविणारा आहे.

"चार्वाकमतवाले पुन्हां असेंहि म्हणतात कीं, जो जो म्हणून दृश्यमान (नेत्रांला विषयीभूत) पदार्थ आहे तोच प्रत्यक्ष असून प्रमाणभूत मानला पाहिजे. नेत्रविषयेतर पदार्थ खरविषाणाप्रमाणें केवळ असत्य होत. चार्वाकांचें हें मत सुद्धां युक्तीला सोडून आहे. कारण, आपल्या पितामहांनीं एखाद्या गुप्त ठिकाणीं कांहीं द्रव्य पुरून ठेवलें

असून तें ठिकाण प्रत्यक्षपणें आपल्या दृष्टीगत झालें नसलें, व फक्त त्यासंबंधीं आपणास ऐकून माहिती असली, तथापि तेवढ्यावरून त्या द्रव्याचें अस्तित्व नाकबूल करितां येईल काय? प्रत्यक्ष चार्वाकसुद्धां अशा प्रसंगीं तें द्रव्य शोधल्यावांचून राहील काय?

"याप्रमाणें चार्वाकांचें मत दूषित ठरल्यामुळें तें प्रमाणभूत होत नाहीं; तर हितोपदेशी सर्वज्ञ वीतरागप्रभूंनीं उपदेशिलेलें मतच सर्वथैव ग्रहण करण्यायोग्य आहे. रागद्वेषादि विकारांपासून जिन भगवान् अलिप्त असल्यामुळें त्यांचेंच वचन प्रमाण मानण्यायोग्य आहे. अशरीरी प्रभूंचें संसारपरिभ्रमण सुटल्यामुळें उत्पत्ति, लय, कर्तृत्व वगैरेंचा त्यांचे ठिकाणीं संबंध पोहोंचत नाहीं. अशरीरी परमात्म्यांचें (सिद्ध परमेष्ठींचें) याप्रमाणें स्वरूप समजावें व जे शरीरसहित वीतराग भगवान् (अर्हत् परमेष्ठी) आहेत त्यांचें स्वरूप खालीलप्रमाणें समजून ध्यावें.

"इंद्रसमूहांकडून जे पूजनीक, एक हजार आठ शुभ लक्षणांनीं युक्त, त्रैलोक्यांतील संपूर्ण चराचर वस्तूंना प्रत्यक्ष करणाऱ्या केवलज्ञानरूपी अद्वितीय नेत्रांनीं युक्त, छत्रचामरादि अनुपम विभूतींनीं विराजमान, धर्मचक्रानें सुशोभित व ज्ञानादिक आत्मगुणांचा घात करणाऱ्या कर्मांचा नाश होण्यापासून उत्पन्न होणारे अपरिमित ज्ञान, दर्शन, सुख आणि बल हे आत्म्याचे चार गुण ज्यांना प्रगट झाले आहेत असे, ते सशरीर परमात्मा कीं, ज्यांना जीवन्मुक्त असेंहि म्हणतां येईल, त्यांना अर्हत् परमेष्ठी ही पदवी आहे. त्यांनीं सांगितलेलें आत्म्याचें स्वरूप असें आहे कीं, सामान्य अपेक्षेनें आत्मा नित्यस्वरूपी व विशेष अपेक्षेनें तोच आत्मा अनित्यस्वरूपी आहे. जसें, चैतन्य वगैरे शक्तींच्या अपेक्षेनें मनुष्यादि अनेक अवस्था प्राप्त होत असतांनाहि, तो जीव एकच आहे ह्मणजे नित्य आहे असें दिसेल; परंतु नर, पशु आदि त्याच्या निरनिराळ्या अवस्था लक्ष्यांत आणून विचार केला असतां,

त्या अवस्था शाश्वत नसल्यामुळें तोच जीव अनित्य आहे असें दिसेल. आणि जे एकांतवादी आत्म्याला सर्वथा नित्य समजतात, त्यांच्या मतानुसार पाहिलें असतां आत्मा जन्ममरणादि समस्त उपाधिरहित, आकाशाप्रमाणें निर्लेप व निष्क्रिय असा मानावा लागेल.

"अशा रीतीनें आत्मा जर निष्क्रिय ठरेल तर त्यास नेहमीं कूटस्थ रहावें लागेल, व असें होईल तर अनेक दोष उत्पन्न होतील. या सर्व अडचणींचा परिहार करणें असल्यास, आत्म्याचें स्वरूप कथंचित् नित्य व कथंचित् अनित्य असेंच मानावें लागेल. आणि ह्मणून, जिनेश्वरांनीं आत्म्याचें याप्रमाणें सांगितलेलें स्वरूप श्रद्धेय समजलें पाहिजे.

"श्रीजिनेश्वरांनीं आत्म्यास अनेकस्वरूपी वर्णिलें आहे, तर अद्वैतवादी जीव एकच आहे असें प्रतिपादितात. ते असें म्हणतात कीं, ज्याप्रमाणें पाण्यानें भरलेल्या अनेक घटांमध्यें वास्तविक चंद्र एकच असूनहि त्याचीं अनेक स्वरूपें प्रतिबिंबित होतात, तद्वत् जीव हा वस्तुतः एकच असून तो अनेकरूपी दिसतो. अद्वैतवाद्यांचें हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. कारण, याप्रमाणें जर पाहिलें तर प्रत्येक जीवाचीं जीं निरनिराळीं कार्यें दिसून येतात तीं दिसतां कामा नये. जीव जर एकच आहे तर सर्व जीवांचीं कार्यें पण एकाच स्वरूपाचीं असावयास पाहिजेत. वास्तविक चंद्रबिंबामध्यें व घटस्थ चंद्रबिंबामध्यें कांहीं फरक दिसतो काय? दोन्हीं एकचस्वरूपी दिसतात. तसा अनुभव जीवाचे ठिकाणीं दिसत नाहीं. प्रत्येक जीवाची कार्यव्याप्ति निराळी, स्वभाव वेगळा, असा भेदभाव प्रत्यक्ष नजरेस येतो. यावरून अद्वैतवाद्यांचें आत्म्याचें एकरूपत्व चुकीचें ठरतें व जीव एक नसून अनेक आहेत या सिद्धांतास पुष्टि मिळते.

"तसेंच, क्षणिकवादी (बौद्ध लोक) हें जग क्षणवर्ती आहे असें प्रतिपादितात. ते असें ह्मणतात कीं, हें संपूर्ण जग एका क्षणांत उत्पन्न

होतें व एका क्षणांत त्याचा लय होतो. ह्मणजे पहिल्या समयाचें अस्तित्व दुसऱ्या समयामध्यें रहात नाहीं. यामुळें जगाची उत्पत्ति व लय सारखींच आहेत. यावर प्रश्न असा उद्भवतो कीं, बौद्धांच्या मतानुसार जर हें जग क्षणवर्ती मानलें तर बौद्ध लोक तपश्चरण तरी कां करितात? बौद्धलोक आत्म्यास विज्ञानस्कंध असें मानतात तोहि त्यांचा हटवादच होय.

"जग जर क्षणवर्ती मानलें, तर एक जीव दुसऱ्या जीवाची कृति कशी जाणतो? जर हा आत्मा क्षणध्वंसी मानला तर सहा महिन्यांपूर्वींच्या वेदना त्यास कशा आठवतील? बौद्ध लोकांचें यावर उत्तर असें आहे कीं, जीव जो सहा महिन्यांपूर्वींच्या वेदना अनुभवितो, तो पूर्ववासनाद्वारें अनुभवितो. यावर आह्मी असें विचारितों कीं, जर संपूर्ण जग क्षणिक आहे तर या वासनांच्या ठायींही कां क्षणिकत्व राहूं नये? तीच एकटी कां शाश्वतस्वरूपी असावी? बौद्धलोक पुन्हां, ही वासना विज्ञान, वेदना, संज्ञा, संस्कार आणि रूप इत्यादि पांच स्कंधांहून भिन्न आहे असेंहि प्रतिपादितात. तेव्हां या सिद्धांतानुसार तिच्या ठिकाणीं जाणीव शक्ति कोठून आली हें कळत नाहीं. यावरून हेंच ठरतें कीं, आत्मा सर्वथा क्षणिक नसून कथंचित् क्षणिक व कथंचित् ध्रुव आहे."

आत्म्याचें याप्रमाणें साधारणतः स्वरूप सांगून मुनीश्वरांनीं सद्धर्माचा अंगीकार केल्यापासून काय सुखप्राप्ति होते, व भलत्याच समजुतीस धर्म मानल्यानें काय अनर्थ ओढवतात याचें थोडेंसें विवेचन केलें; व जैनधर्माचें संक्षेपांत स्वरूप सांगून अहिंसादि पांच अणुव्रतें व अष्टमूलगुण धारण करण्यास त्या कोतवालास सांगितलें.

यावर तो कोतवाल ह्मणाला, "महाराज, आमच्या कुलामध्यें वंशपरंपरा हिंसा चालत आली असून तीच आम्हांस उपजीविकेचें साधन होऊन बसली आहे. त्यामुळें ती सुटणें सर्वथैव अशक्य असून हिंसात्या-

गाशिवाय, बाकी जे कांहीं तुम्हीं धर्माचरण करण्यास सांगितलें आहे तें सर्व मीं ग्रहण केलें आहे. माझी वृत्ति श्रेष्ठ कोतवालाची असल्या-मुळें जीवाचा वध करणें, त्यास मारणें, कारागृहांत टाकणें, हीं कामें तर मला प्रथम केलीं पाहिजेत. त्यामुळें अहिंसाव्रताचरण मजकडून होणें कठीण आहे."

कोतवालाचें हें म्हणणें ऐकून मुनि म्हणाले, "हिंसाकर्म इतकें पापमूलक व दुर्गतिप्रद आहे कीं, त्याचें विस्तारपूर्वक वर्णन होणें अशक्य आहे. प्रत्यक्षच पुरावा जर पाहिजे असेल तर हें कुक्कुट-युगल याच हिंसाकर्माच्या योगानें किती दुःख भोगित आलें आहे, हें पाहिलें असतां तत्संबंधींची खरी कल्पना होईल. करितां, यांचें पूर्वजन्मकथन सांगतों तें नीट लक्षपूर्वक ऐक. तें ऐकून तुला उपरति झाल्यास उत्तमच, नाहींपेक्षां तुझें दुर्दैव !"

नंतर मुनींनीं संक्षेपामध्यें त्या कुक्कुट युगलाचें (आमचें) पूर्वजन्म-कथन सांगितलें. तें ऐकून कोतवालास फारच पश्चात्ताप झाला, व त्यानें आपल्या हिंसामयी कुलधर्मास तिलांजलि देऊन, मुनींनीं सांगितल्या-प्रमाणें सर्व श्रावकधर्माचा अंगीकार केला व त्यांस पुन्हां एकदां भक्तिभावानें नमस्कार करून तो एकीकडे जाऊन बसला.

क्षुल्लक पुढें ह्मणाला, राजा! मुनींनीं सांगितलेली आमची भवा-वली आमच्या कानीं पडल्यामुळें आम्हांसहि जातिस्मरण झालें, पूर्व-जन्मींच्या दुःखाची आठवण झाली, आणि पापापासून मुक्त होण्या-करितां श्रावक धर्माचें आम्हींहि ग्रहण केलें. आम्हांस त्या योगें फारच उल्हास वाटूं लागला व त्या उल्हासाच्या भरांत आम्ही आरवूं लागलों. इतक्यांत, कर्मधर्मसंयोगानें जवळच यशोमती राजा आ-पल्या स्त्रीसह भोगविलास करित असतां, त्यास आमचें आरवणें ऐकूं गेलें व आपलें शब्दवेधांतील प्रावीण्य आपल्या स्त्रीस दाखविण्याचे मिषानें त्यानें नेमका आमच्यावर बाण सोडला. तो आह्मां दोघांच्याहि

वर्मी लागून आम्ही तत्काळ गतप्राण झालों. सुदैवानें मृत्यूपूर्वी आमचे परिणाम मुनींच्या उपदेशानें उज्ज्वल झाले होते, त्यायोगें आम्ही आमच्या सुनेच्याच (यशोमतीच्या स्त्रीच्या) गर्भामध्यें जाऊन राहिलों. पुढें तो गर्भ पूर्णावस्थेस आल्यानंतर, आमच्या मातेस अभयदान देण्याचे डोहाळे होऊं लागले व ते आमच्या पित्यानें मोठ्या आनंदानें पुरविले. नंतर शुभदिवशीं, आमची माता प्रसूत होऊन आमचें युगल तिच्या गर्भाशयांतून बाहेर आलें. मी पुत्र व माझी माता कन्या होऊन जन्मली. आमच्या जन्मकालीं आमच्या पित्यानें फार मोठा उत्सव करून याचकजनांस इच्छित वस्तूंनीं तृप्त केलें. सर्व शहरवासी जनांनींहि फारच मोठा उत्सव करून आमच्या जन्माप्रीत्यर्थ आपला आनंद व्यक्त केला. आमच्या गर्भकाळीं आमच्या मातेस अभयदानाचे डोहाळे लागले होते म्हणून आमच्या पित्यानें आमचीं नांवें अनुक्रमें अभयमति व अभयरुचि अशीं ठेविलीं. पूर्वकालीन निकट संबंधामुळें आमच्या पित्याचें आह्मांवर फारच प्रेम जडलें. आह्मी दोघे राजगृहीं दिवसेंदिवस शुक्लपक्षांतील चंद्रकलेप्रमाणें वाढूं लागलों. पित्यानें आम्हांस उत्तमतऱ्हेचें शिक्षण देऊन सर्व कलेमध्यें निपुण केलें, आणि आह्मी सुखोपभोग घेत राहिलों. याप्रमाणें सहा भवांमध्यें पूर्वपापकर्मामुळें अतिशय दुःख भोगल्यानंतर मागील जन्मीं मुनींचा दर्शनलाभ होऊन त्यांच्या उपदेशानें परिणामांमध्यें विशुद्धता उत्पन्न झाल्यामुळें मला हा मनुष्यभव प्राप्त झाला. सारांश इतकाच कीं, प्रत्येक मनुष्यप्राण्यानें योग्य परीक्षापूर्वक सद्धर्माचा अंगीकार करून त्याप्रमाणें आपल्या वर्तनक्रमांत सुधारणा केल्यास त्यास मजप्रमाणें पुढें पश्चात्तापाचा व दुःखाचा प्रसंग येणार नाहीं.

भाग ६ वा समाप्त.



मुनींना नामशेष करण्याच्या हेतूनें सोडलेले कुत्रे मुनींच्या तपो-बलानें मुनिसंनिध शांत होऊन बसलेले जेव्हां **यशोमति** राजानें पाहिलें तेव्हां त्यास आतिशय क्रोध उत्पन्न होऊन त्या आवेशांत तो मुनीवर स्वतःच तलवार घेऊन उठला. पृष्ठ ६७.

The 'Lakshmi Art' Bombay.

भाग ७वा.

ब्रह्मचारी मारिदत्त राजास पुढें ह्मणाला, "राजा, कोणे एके वेळीं यशोमती राजा आपल्याबरोबर पांचशें कुत्रे घेऊन शिकारीला जाण्याकरितां निघाला असतां शहराच्या बाहेर अशोकवृक्षाखालीं तेच सुदत्ताचार्य मुनि ध्यानस्थ असलेले त्याच्या नजरेस पडले. त्यांची ती नग्नावस्था पाहून त्यास आपल्या इष्ट कार्यांत अपशकुन झालासें वाटलें, व त्यायोगें अर्थातच त्यास क्रोध चढून कोणत्यातरी उपायानें या मुनींचा नाश केला पाहिजे या विचारानें त्यानें आपल्याजवळचे कुत्रे त्या मुनींच्या अंगावर सोडले. धन्याचा हुकूम होतांक्षणींच ते महान् क्रूर असे मोठमोठे शिकारी कुत्रे मोठ्या त्वेषानें तोंड पसरून त्या मुनींच्या अंगावर धांवून गेले. परंतु आश्चर्य हें कीं, ते कुत्रे तेथें जाऊन पोहोंचताहेत तोंच, मुनींच्या तपोबलानें त्यांचे क्रोधादि सर्व तामस विकार नाहींसे होऊन ते शांतपरिणामी बनले व मुनींना तीन प्रदक्षिणा देऊन, ज्याप्रमाणें श्रोते नम्रतेनें खालीं मान घालून धर्मश्रवण करित बसतात, त्याप्रमाणें ते सर्व नम्र होऊन मुनिसंनिध जाऊन बसले. हा विपरीत प्रकार पाहून तर राजास ज्यास्तच त्वेष चढला व त्या भरांत तो मुनींवर तलवार घेऊन उठला. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें असें घडून आलें कीं, राजाचा कल्याणमित्र नामेंकरून कोणी एक वणिक्मित्र व्यापाराच्या निमित्तानें परदेशीं गेला होता, तो त्याच वेळीं त्याच रस्त्यानें परत येत असतां त्याच्या नजरेस हा भयंकर प्रकार पडला. त्याबरोबर त्यास अतिशय खेद उत्पन्न होऊन मुनीवरील तो उपसर्ग टाळण्याच्या हेतूनें त्यानें कांहीं वेळ दम धरण्याविषयीं राजास मोठ्यानें ओरडून सुचविलें व तें स्थल लवकर गांठण्याच्या हेतूनें फारच त्वरेनें तो तिकडे येऊं लागला. थोड्याच वेळांत तो तेथें येऊन पोहोंचला व लागलीच त्यानें राजास एकीकडे सारून ह्मटलें, "महाराज,

सर्वांचे प्रतिपालक ह्मणून आपल्या आश्रयास प्रजाजनानें राहावयाचें असतां, आपणच उलट प्रजेवर उलटून पडलां तर दाद कोणापाशीं मागावयाची? ही साधारण प्रजाजनांची गोष्ट झाली आणि हे तर अपूर्व शक्तिमान् साधुपुरुष ! यांच्या वधापासून किती भयंकर संकटें ओढवतील याचा विचार आहे काय ? राजाचें प्रजापालनाबरोबर धर्मपालन हेंहि पवित्र व श्रेष्ठ कर्तव्य आहे आणि त्यास अनुसरून धर्मध्वजा फडकविणाऱ्या व धर्मतत्वें प्रसृत करणाऱ्या साधुपुरुषांची जोपासना राजानें करावयास पाहिजे. असें असतां राजा जर साधुपुरुषांवर उलटून पडेल तर मग धर्म तरी कोठून राहणार? महाराज, हे साधु फार शक्तिमान् आहेत, संपूर्ण त्रैलोक्याला हलविण्याचें सामर्थ्य यांचेमध्यें आहे, मात्र तें अप्रकट असतें व आपल्या क्षमाभावानें ते त्याचा कधींहि उपयोग करित नाहींत, हें खरें आहे. तथापि एकदां का क्रोधवन्हि यांचे ठिकाणीं प्रज्वलित झाला म्हणजे मग यांचे पुढें चक्रवर्तींचें सामर्थ्य सुद्धां पुरणार नाहीं. सर्वांस यांच्या क्रोधाग्नीस बळी पडावें लागेल. करितां अशा साधुपुरुषांचा छळ न करितां त्यांस वंदन करून त्यांची कृपा संपादन करणेंच हितकर आहे. तरी आपण यांस वंदन करून झाल्या कृत्याबद्दल यांची क्षमा मागावी." हें ऐकून राजा म्हणाला, "पुरे कर तुझें तत्त्वज्ञान. अरे जे नग्न, ज्यांची कुलजात माहित नाहीं, सदा घाणेरडे, अमंगल, ज्यांस पहातांच चिळस येते, अशा लोकांना साधु कसें म्हणावें हेंच कळत नाहीं. अशा अपशकुनी लोकांचा नायनाट करणेंच योग्य आहे. असें असून तूं मला यांस नमस्कार करावयास सांगतोस, हें आश्चर्य नव्हे काय ?"

कल्याणमित्र—"महाराज, आपण अशा पवित्र साधूची निंदा करित आहां, हें योग्य नव्हे. आपलें हें वचन बालवाक्याप्रमाणें हास्यास्पद आहे. महाराज, हे साधु जरी स्नान करित नाहींत तरी शीलरत्नानें यांनीं आपला देह पवित्र केला आहे. अपवित्र सप्तधातुमय शरीरास

वरून पाण्यानें कितीहि स्नान घातलें तरी अंतरंगीं शीलव्रत बाणलें असल्यावांचून तें थोडेंच शुद्ध होणार आहे? पावित्र्य केवळ नग्नानग्नतेवर अवलंबून नसतें. त्यास अंतरंगशुद्धीची अपेक्षा आहे. सम्यग्दर्शनज्ञानचारित्रादि रत्नत्रयांनींच अंतरंगाची खरी शुद्धि होते व हें रत्नत्रय यांनीं धारण केलें असल्यामुळें यांचे ठिकाणीं केवळ बाह्य चिन्हांवरून अपावित्र्याचा आरोप करणें, हें भयंकर होय. तपश्चरणादिकांनीं यांनीं आपल्या इंद्रियांचें दमन केलें असल्यामुळें यांची दिगंबरमुद्रा यांस बाध करूं शकत नाहीं. मनुष्यप्राणी ज्या वेळीं बाल्यावस्थेंत असतो त्या वेळीं त्याची दिगंबरमुद्राच असते. परंतु पुढें जसजसा तो विकारमय जगताच्या संगतीनें वाढूं लागतो, तसतशी त्याचे ठायीं विकारांचीहि वृद्धि होत जाते. विकार उत्पन्न न झाले अथवा ते नाहींसे करून टाकिले, तर वस्त्रप्रावरणाची मुळींच जरुरी नाहीं. या मुनींनीं आपले सर्व विकार दाबून टाकिले आहेत व क्रमानें त्या सर्वांचा नाश व्हावा, या इच्छेनें ते भयंकर तपश्चरण करित आहेत. अशा निर्मोही व इंद्रियजेत्या साधूंना बाह्य वस्त्रादिकांचें काय प्रयोजन आहे? मोही पुरुषांनाच लाजलज्जादि विकार उत्पन्न होतात आणि अशांनाच आपल्या लज्जासंरक्षणासाठीं वस्त्राची जरुरी आहे. महाराज, या नग्न मुद्रेलाच आजपर्यंत मोठमोठ्या चक्रवर्ती, बलभद्र, नारायणादिक पुण्य पुरुषांनीं नमस्कार केला आहे, त्याअर्थी आपणालाही नमस्कार करणें योग्य आहे.

"दुसरी शंका आपली अशी आहे कीं, जैनमुनि कधींहि स्नान करीत नाहींत, यामुळें ते सदैव अशुचि होत. परंतु कृपानाथ, आपली ही शंका चुकीची आहे, असें थोड्या विचारांतीं कळून येईल. मीं मघां सांगितलेंच आहे कीं, पावित्र्यास अंतरंगशुद्धीची अपेक्षा असते. बाह्य स्नानादिकांनींच आत्म्याची शुद्धि होती, तर नेहमीं पाण्यांतच राहणारे मासे कां अपवित्र समजले जाते? दुसरें, अशी कल्पना

करा कीं, एक वेदस्मृति जाणणारा व उत्तम क्रियावान् असा ब्राह्मण एखाद्या निर्जल प्रदेशीं गेला आहे व तेथें त्याला पाण्याचा एक बुंद सुद्धां मिळत नाहीं. अशा वेळीं स्नानादि शौचकर्माच्या अभावीं त्याचें आजपर्यंतचें धार्मिक वर्तन निष्फळ झालें असें समजावयाचें काय? असें जर होऊं लागेल तर जगामधून धर्म ही वस्तूच काढून टाकावी लागेल. महाराज, विचार करा कीं, रक्तशुक्रादिकांपासून उत्पन्न झालेल्या व मातेच्या अशुद्ध गर्भांत दीर्घ कालपर्यंत राहिलेल्या अमंगल शरीराची नुसत्या स्नानादिकानेंच शुद्धि होती, तर प्राचीन महर्षींनीं मोठमोठीं धर्मबंधनें घालून देण्याचा इतका अट्टाहास तरी कां केला? मग त्यांची मुळींच जरूरी राहत नाहीं. परंतु तसें नाहीं. नुसत्या बाह्य शुद्धीनें अंतरंगावर कांहीं परिणाम होत नाहीं, म्हणूनच आचार्यांना तरी एवढा खटाटोप करावा लागला आहे, आणि तो सर्वस्वी योग्यच आहे. धार्मिक बंधनें मनुष्यप्राण्यांस हवींच आहेत, असें विचारी माणसास आढळून येईल. यावरून जैनमुनीवरील अशौचाचा आरोप चुकीचा ठरतो.

"दुसरें, या मुनींस आपण तुच्छ लेखतां, परंतु यांचें पूर्वचरित्र जर आपणाला कळून येईल तर स्वतःविषयींचा आपला अभिमान नाहींसा होईल. यांची हकीकत अशी आहे:—

"कलिंग देशाचा सुदत्त नामेंकरून एक राजा होऊन गेला. आपल्या बलवान् शत्रूचा पराजय करून त्यानें निष्कंटक राज्य चालविलें असतां एके वेळीं कोतवालांनीं एका चोरास धरून राजसभेंत आणिलें. कोतवालांनीं त्या चोराची अशी हकीकत सांगितली कीं, तो एका श्रीमंत मनुष्याचा वध करून त्याचें धन हरण करून जात असतां त्यास पकडलें. राजानें या अपराधाबद्दल काय शिक्षा करावी, याविषयीं आपल्या सभेंतील स्मृतिपारंगत ब्राह्मणांस विचारिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, अशा प्रकारच्या अपराध्यास त्याचे हात, पाय, नाक,

वगैरे छेदन करून हद्दपार केलें पाहिजे. राजा पापभीरु होता. त्यास ब्राह्मणांचा हा निकाल ऐकून अंगावर शहारे उत्पन्न झाले व अशा विलक्षण राजनीतीच्या पायीं राजास कितीतरी घोर पातकें जोडून घ्यावीं लागत असतील, या विचारानें त्यास वैराग्य प्राप्त होऊन त्यानें जिनदीक्षा ग्रहण केली, व आपल्या मुलास राज्यपद दिलें. तोच हा सुदत्त मुनि विहार करित करित या ठिकाणीं प्राप्त झाला आहे."

कल्याणमित्रानें ही मुनीची सांगितलेली हकीकत ऐकून राजास आपल्या कृतकर्माबद्दल अत्यंत खेद उत्पन्न झाला. स्वतःच्या दुष्ट कृत्यांबद्दल त्यास अतिशय शरम वाटूं लागली व पश्चात्तापातिरेकानें त्याचें अंतःकरण जळूं लागलें. मुनीस त्यानें भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार केला, व त्यांची ती भव्य, प्रशांत व अत्यंत तेजस्वी मूर्ति पाहून आपलें शिरकमल उतरून तें मुनीस वाहिलें असतां आपल्या दोषांचें क्षालन होईल, असाहि एक भयंकर विचार क्षणभर त्याचे डोक्यांत आला. परंतु मुनींनीं आपल्या दिव्य ज्ञानानें त्याच्या मनांतील हा आशय तत्काळ ओळखून त्यापासून पराङ्मुख करण्याच्या उद्देशानें ते त्यास म्हणाले "राजा, घडलेल्या दोषांबद्दल प्रायश्चित्त म्हणून तूं स्वतःचें शिरकमल तोडून मला वाहण्याचा विचार करित आहेस, परंतु स्वतःची हिंसा करणें हें देखील तीव्र पापबंधाचेंच कारण आहे, हें लक्षांत असूं दे. अज्ञानामुळें तूं अशा भलत्याच कार्यास प्रवृत्त होऊं नकोस. दोषांपासून शुद्धि होण्याकरितां शास्त्रांमध्यें अनेक प्रायश्चित्तादि विधि सांगितल्या आहेत, आणि त्यांपासून आत्मशुद्धीचें कार्य होतें. तथापि, ज्याअर्थीं तुला आपल्या कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला आहे, त्याअर्थीं यानेंहि शुद्धीचें बरेंचसें कार्य होईल, यांत संशय नाहीं."

आपलें मनोगत मुनींनीं ताडलेंसें पाहून तर राजाची त्यांचेवरील भक्ति दुणावली व तो त्यांस मोठ्या नम्रतेनें म्हणाला, "महाराज, आपलें म्हणणें खरें आहे, आत्महत्येनें कांहीं

करा कीं, एक वेदस्मृति जाणणारा व उत्तम क्रियावान् असा ब्राह्मण एखाद्या निर्जल प्रदेशीं गेला आहे व तेथें त्याला पाण्याचा एक बुंद सुद्धां मिळत नाहीं. अशा वेळीं स्नानादि शौचकर्माच्या अभावीं त्याचें आजपर्यंतचें धार्मिक वर्तन निष्फळ झालें असें समजावयाचें काय? असें जर होऊं लागेल तर जगामधून धर्म ही वस्तूच काढून टाकावी लागेल. महाराज, विचार करा कीं, रक्तशुक्रादिकांपासून उत्पन्न झालेल्या व मातेच्या अशुद्ध गर्भांत दीर्घ कालपर्यंत राहिलेल्या अमंगल शरीराची नुसत्या स्नानादिकानेंच शुद्धि होती, तर प्राचीन महर्षींनीं मोठमोठीं धर्मबंधनें घालून देण्याचा इतका अट्टाहास तरी कां केला? मग त्यांची मुळींच जरूरी राहत नाहीं. परंतु तसें नाहीं. नुसत्या बाह्य शुद्धीनें अंतरंगावर कांहीं परिणाम होत नाहीं, म्हणूनच आचार्यांना तरी एवढा खटाटोप करावा लागला आहे, आणि तो सर्वस्वी योग्यच आहे. धार्मिक बंधनें मनुष्यप्राण्यांस हवींच आहेत, असें विचारी माणसास आढळून येईल. यावरून जैनमुनीवरील अशौचाचा आरोप चुकीचा ठरतो.

"दुसरें, या मुनींस आपण तुच्छ लेखतां, परंतु यांचें पूर्वचरित्र जर आपणाला कळून येईल तर स्वतःविषयींचा आपला अभिमान नाहींसा होईल. यांची हकीकत अशी आहे:—

"कलिंग देशाचा सुदत्त नामेंकरून एक राजा होऊन गेला. आपल्या बलवान् शत्रूचा पराजय करून त्यानें निष्कंटक राज्य चालविलें असतां एके वेळीं कोतवालांनीं एका चोरास धरून राजसभेंत आणिलें. कोतवालांनीं त्या चोराची अशी हकीकत सांगितली कीं, तो एका श्रीमंत मनुष्याचा वध करून त्याचें धन हरण करून जात असतां त्यास पकडलें. राजानें या अपराधाबद्दल काय शिक्षा करावी, याविषयीं आपल्या सभेंतील स्मृतिपारंगत ब्राह्मणांस विचारिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, अशा प्रकारच्या अपराध्यास त्याचे हात, पाय, नाक,

वगैरे छेदन करून हद्दपार केलें पाहिजे. राजा पापभीरु होता. त्यास ब्राह्मणांचा हा निकाल ऐकून अंगावर शहारे उत्पन्न झाले व अशा विलक्षण राजनीतीच्या पायीं राजास कितीतरी घोर पातकें जोडून घ्यावीं लागत असतील, या विचारानें त्यास वैराग्य प्राप्त होऊन त्यानें जिनदीक्षा ग्रहण केली, व आपल्या मुलास राज्यपद दिलें. तोच हा सुदत्त मुनि विहार करित करित या ठिकाणीं प्राप्त झाला आहे."

कल्याणमित्रानें ही मुनीची सांगितलेली हकीकत ऐकून राजास आपल्या कृतकर्माबद्दल अत्यंत खेद उत्पन्न झाला. स्वतःच्या दुष्ट कृत्यांबद्दल त्यास अतिशय शरम वाटूं लागली व पश्चात्तापातिरेकानें त्याचें अंतःकरण जळूं लागलें. मुनीस त्यानें भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार केला, व त्यांची ती भव्य, प्रशांत व अत्यंत तेजस्वी मूर्ति पाहून आपलें शिरकमल उतरून तें मुनीस वाहिलें असतां आपल्या दोषांचें क्षालन होईल, असाहि एक भयंकर विचार क्षणभर त्याचे डोक्यांत आला. परंतु मुनींनीं आपल्या दिव्य ज्ञानानें त्याच्या मनांतील हा आशय तत्काळ ओळखून त्यापासून पराङ्मुख करण्याच्या उद्देशानें ते त्यास म्हणाले "राजा, घडलेल्या दोषांबद्दल प्रायश्चित्त म्हणून तूं स्वतःचें शिरकमल तोडून मला वाहण्याचा विचार करित आहेस, परंतु स्वतःची हिंसा करणें हें देखील तीव्र पापबंधाचेंच कारण आहे, हें लक्षांत असूं दे. अज्ञानामुळें तूं अशा भलत्याच कार्यास प्रवृत्त होऊं नकोस. दोषांपासून शुद्धि होण्याकरितां शास्त्रांमध्यें अनेक प्रायश्चित्तादि विधि सांगितल्या आहेत, आणि त्यांपासून आत्मशुद्धीचें कार्य होतें. तथापि, ज्याअर्थी तुला आपल्या कृतकर्माबद्दल पश्चात्ताप झाला आहे, त्याअर्थी यानेंहि शुद्धीचें बरेंचसें कार्य होईल, यांत संशय नाहीं."

आपलें मनोगत मुनींनीं ताडलेंसें पाहून तर राजाची त्यांचेवरील भक्ति दुणावली व तो त्यांस मोठ्या नम्रतेनें म्हणाला, "महाराज, आपलें म्हणणें खरें आहे, आत्महत्येनें कांहीं

परिणाम व्हावयाचा नाहीं. मीं आपला भयंकर अपराध केलेला आहे त्यांत माझा दुष्ट हेतु तर खराच, परंतु त्याबरोबर अज्ञानही होतें हें लक्ष्यांत आणावें व या पामराकडे क्षमादृष्टीनें पहावें. जैनसाधु क्षमाशील असतात, असा त्यांचा मोठा नांवलौकिक आहे. तेव्हां दासाची ही क्षमेची याचना व्यर्थ जाणार नाहीं, असा यास भरंवसा आहे."

हें ऐकून मुनि म्हणाले "राजा, ज्या वेळीं आम्हीं घरादाराचा त्याग करून हा संन्यासवेष धारण केला, त्याच वेळीं आह्मीं क्रोधादि विकारांस काढून लावून क्षमाभाव धारण केला आहे. एखादा मनुष्य आमचेवर क्रुद्ध झाला असतां आह्मी असाच विचार करितों कीं, आम्हीं पूर्वी कधीं तरी याचेवर क्रोध केला असेल. एखादा आम्हांस भयंकर उपसर्ग करित असेल, तरी सुद्धां शांतभाव न सोडतां आम्हीं पूर्वीं याचा कांहीं तरी अक्षम्य अपराध केला असेल त्याचें हें फळ आहे, या विचारानें तो निमूटपणें सहन करितों. सारांश, प्रत्येक गोष्टींत आम्ही आपलेकडेच दोष घेतों, त्यामुळें आमचे विकार सर्व मावळून जातात. आम्ही प्रत्येक गोष्टींत जर विकारवश होऊं लागलों तर आमचें संसारपरिभ्रमण वाढत जाणार, आणि तें कमी व्हावें एतदर्थ जर हा वेष आम्हीं धारण केला आहे, तर या वेषास क्रोधादि विकार हे उचित कसे होतील? मग या वेषाचें सार्थक्य तरी काय व यापासून खरी फलप्राप्ति तरी कधीं व्हावयाची? राजा, यावरून तुझी खात्री व्हावयास पाहिजे कीं, तुझ्या कृत्यांबद्दल मी मुळींच रुष्ट झालों नाहीं. माझ्या शांततेमध्यें त्यापासून यत्किंचित्‌हि बदल झाला नाहीं."

मुनींचें हें शांत भाषण ऐकून यशोमति राजास संसाराचा वीट येऊन वैराग्यभावना होऊं लागली, व तशांतच आपल्या पूर्वजांची काय गति झाली असेल, हें समजून घेण्याची त्यास इच्छा उत्पन्न होऊन त्यानें नम्रपणें मुनीस तशा अर्थाचा प्रश्न केला; व मु-

नींनींहि त्यावरून आपल्या दिव्यज्ञानशक्तीनें सर्व हकीकत सांगण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, “राजा, तुझ्या मागील पिढींची हकीकत नीट लक्ष्यपूर्वक ऐक. तुझा आजा जो कीर्त्यौघराजा, त्यास आपल्या डोक्यावरील पिकलेला केस पाहून वैराग्य झालें, व तुझा पिता जो यशोधर राजा त्याचे स्वाधीन राज्य करून आपण दीक्षा ग्रहण करिता झाला. पांच दिवसच त्यानें तपश्चरण केलें, व शेवटल्या रात्रींच त्यानें *समाधिमरण साधून ब्रह्मोत्तरनामक स्वर्गामध्यें जन्म घेतला. तपाचें असेंच कांहीं विलक्षण सामर्थ्य आहे.

“तुझी माता अमृतादेवी, ही व्यभिचारिणी निघून तिनें आपल्या पतीस व सासूस विष देऊन मारिलें; त्या पापामुळें तिला महारोग उद्भवून ती मरण पावली व हल्लीं ती सहाव्या नरकामध्यें घोर दुःख भोगित आहे.

“तुझा पिता यशोधर राजा यानें आपल्या मातेच्या सांगण्यावरून पिठाच्या कोंबड्याचा कुलदेवतेला बळी दिला, त्यामुळें उभयतां मातापुत्रांसहि तीव्र पापबंध होऊन त्यांनीं आतांपर्यंत मोर, कुत्री, मांजर, सर्प, मगर, मासा, बकरी, मेंढा, रेडा, शेळी आणि शेवटीं कोंबडें, याप्रमाणें योनी धारण केल्या व त्यांमध्यें अनिर्वचनीय दुःख भोगिलें. तें कोंबड्यांचें युगल एका कोतवालानें पाळिलें होतें व त्यांसह तो एका वनांत एके दिवशीं आला होता. कर्मधर्मसंयोगानें तूंहि त्याच वेळीं त्या वनांत आपल्या स्त्रीसह क्रीडा करण्याकरितां आला होतास, व मीहि दुसऱ्या बाजूस तपश्चरण करित होतों. माझें ध्यान संपण्याच्या सुमारास तो कोतवाल तीं कोंबडीं घेऊन मजकडे आला, व मला तेथून काढून लावण्याच्या उद्देशानें माझ्याशीं त्यानें वाद आरंभिला. परंतु त्याचें भवितव्य चांगलें असल्यामुळें त्या वा-

* शुद्धपरिणामयुक्त मरण.

दाचा मूळ हेतु एकीकडेस राहून माझ्या उपदेशांतील सार त्यास पटलें व जैनधर्माचा त्यानें अंगीकार केला. श्रावकाचीं कांहीं व्रतेंहि त्यानें त्या वेळीं धारण केलीं. विशेष आश्चर्य हें कीं, त्या कोंबड्यांच्याहि मनावर माझ्या उपदेशाचा ठसा चांगला उमटून तीं आनंदानें आरवूं लागलीं होतीं, तोंच त्यांचा तो शब्द तुझ्या कानीं येऊन तूं शब्दवेध करण्याच्या मिषानें आपला बाण नेमका त्यांचेवर सोडलास. त्यायोगें तत्काळ तीं गतप्राण होऊन अंतसमयींच्या उज्ज्वल परिणामानें तुझ्याच स्त्रीच्या पोटीं अभयमति व अभयरुचि नामें पुत्रपुत्री होऊन जन्मास आलीं आहेत."

यशोमति राजानें मुनीच्या तोंडून ही सर्व भवावली ऐकून त्याचें चित्त शोकविव्हल झालें. शोकातिरेकानें त्याच्या सर्वांगास कंप सुटला व डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्याचा कंठ सद्गदित होऊन त्यास कांहीं बोलतां येईना. छाती दाटून आली व खालीं मान घालून कांहीं वेळपर्यंत तो स्वस्थ राहिला. नंतर शोकाचा आवेग थोडासा कमी झाल्यावर तो मुनींस ह्मणाला, "भो मुने, मी माझें पाप घालविण्याच्या मार्गास लवकरच लागेन व इतःपर कोणत्याहि जीवाशीं वैर करणार नाहीं, अशी मी आपलेजवळ प्रतिज्ञा घेतों. माझ्या पित्यानें आजीच्या सांगण्यावरून नुसत्या पिठाच्या कोंबड्याचाच आपल्या कुलदेवीपुढें बली दिल्यानें त्यांस नाना कुयोनी धारण कराव्या लागून अचिंत्य दुःख भोगावें लागलें, आणि मी तर आजपर्यंत केवळ मौजेखातर हजारों प्राण्यांचा वध केला, नानाप्रकारांनीं त्यांस छळलें, तेव्हां मला केवढा पापबंध झाला असेल? माझी गति काय होणार? माझ्या पापाच्या स्वरूपावरून माझे हाल कुत्राहि खाणार नाहीं. मुने, मी अधर्मास धर्म मानून जिव्हालंपटी भटांच्या नादीं लागल्यानें श्राद्धादिकांप्रीत्यर्थ अनेक प्राण्यांचा संहार केला, पुरा मांसभक्षी बनलों व पापाचें ओझें करून ठेविलें. त्याच्या दडपणाखालीं

मला उठतां येईल कीं नाहीं, याचीच शंका आहे. किंवा शंका कसली? मी त्याखालीं पुराच दडपलों जाणार व त्यांतून उठतां येण्याजोगी पुण्यसामुग्री मिळविण्यास मला अनंतकाळ भ्रमावें लागणार, हें खरें आहे. महाराज! ज्या धर्मांत दयेचें महत्व वर्णिलें नाहीं तो धर्म कसला? तो अधर्मच होय." नंतर तो कल्याणमित्राकडे वळून ह्मणाला, "बा कल्याणमित्रा, तुझे मजवर अनंत उपकार आहेत. तुझ्याच सहवासानें मी मुनिहत्येपासून मुक्त झालों. मला आतां पापबंध तोडण्याच्या मार्गास लागलें पाहिजे. मला कशाचीही आशा नाहीं. मी आतां दीक्षा ग्रहण करणार! तूं माझा मित्र आहेस तेव्हां हें माझें कार्य मुनींकडून करीव." कल्याणमित्रानें उत्तर दिलें, "महाराज, आपला विचार स्तुत्य आहे, परंतु एक अडचण आहे ती ही कीं, प्रजापालनाकरितां राजाची आवश्यकता असल्यामुळें पहिल्यानें आपण आपल्या मुलास राज्याभिषेक करून सर्व राज्यसूत्रें त्याच्या स्वाधीन करा, व मग आपल्या इच्छेस येईल तें करा. राजे लोक गादी मोकळी टाकून कधींहि जात नाहींत, एवढेंच नव्हे, तर अकल्पित रीतीनें राजा मरण पावला असतां, गादीच्या खऱ्या वारसास गादीवर बसविल्यावांचून त्याच्या शवाचें उत्तरकार्य होत नाहीं, अशी प्रथा आजपर्यंत चालत आली आहे. यांतील इंगित तरी गादी मोकळी पडून तंटेबखेडे उपस्थित होऊं नयेत, हेंच आहे. अर्थात् या राजनियमास अनुसरून आपणाला गादीची व्यवस्था लावल्याशिवाय दीक्षेचा विचार अमलांत आणितां येत नाहीं." यावर राजा ह्मणाला, "तुझें ह्मणणें कांहीं अंशीं खरें असलें, तथापि मला पुन्हां घरीं जाण्याची इच्छा नाहीं. कारण चंचल मनाचा भरंवसा कोणीं धरावा? घरीं जाऊन तेथील विभूतीनें माझे डोळे दिपले जाऊन पुन्हां जर

त्याविषयीं मोह उत्पन्न झाला, तर मी आत्मकल्याणाच्या मार्गापासून वंचित झालों असें होईलना? ह्मणून मला त्या राज्याभिषेकाच्या भानगडींत घालूं नकोस, व जी कांहीं व्यवस्था लावणें असेल ती तूंच परभारें जाऊन लावून ये. मला आतां आत्मकल्याणाखेरीज दुसरें कांहीं कर्तव्य नाहीं."

याप्रमाणें त्या उभयतांचें त्या वनामध्यें संभाषण होत असतां इकडे शहरांत, राजास वैराग्य प्राप्त झालें असून तो तत्काळ दीक्षा ग्रहण करणार आहे, अशा तऱ्हेची बातमी कर्णोपकर्णी होत होत चोहोंकडे पसरली. सर्व शहरवासी जन आतां पुढें आपलें कसें होणार या फिकिरींत पडले. शहरवासी जनांचा बराच मोठा समूह त्या वनाकडे चालला. इकडे राजगृहांत व अंतःपुरांत या बातमीनें फारच हलकल्लोळ उडवून दिला, व सर्व राजस्त्रिया त्या वनामध्यें येण्याकरितां पालखींत बसून निघाल्या. तें पाहून मीहि आपल्या बहिणीसमवेत पालखींत बसून त्यांचेबरोबर निघालों. बरोबर प्रधानमंडळहि होतेंच. नंतर कांहीं वेळानें आम्ही सर्वजण त्या वनांत जाऊन पोहोंचलों व अशोकवृक्षाखालीं सुदत्ताचार्य मुनि श्रावकमंडळीस धर्मोपदेश करीत बसले होते त्या ठिकाणीं जाऊन त्यांस आह्मीं नमस्कार केला, व त्याच श्रोतृसमूहामध्यें बसलेल्या आमच्या पित्याजवळ जाऊन आह्मी बसलों. त्या वेळीं यशोमति राजाचा चेहरा मला फारच उदास दिसला, व त्या योगें माझी चित्तवृत्तीहि फार चमत्कारिक झाली. कांहीं वेळानें धर्मोपदेश संपल्यावर मीं मोठ्या नम्रतेनें त्यास अशी विरक्तता प्राप्त होण्याचें कारण विचारिलें. त्यावर त्यांनीं शिकारीच्या निमित्तानें त्या वनांत आल्यापासून त्या वेळपर्यंतची सर्व हकीकत विस्तृत रीतीनें सांगितली व त्यामध्येंच ओघानें मुनींनीं सांगितलेलें आम्हां बंधुभगिनींचें भवांतरहि सांगितलें. तें ऐकून आह्मांस अतिशय आश्चर्य वाटलें व त्याबरोबर पूर्व-

जन्मींच्या दुःखाची आठवण होऊन आह्मी मूर्च्छा येऊन निश्चेष्ट पडलों. आमची ही स्थिति पाहून चोहोंकडे फारच हाहाःकार झाला व शीतोपचारांनीं आह्मी कांहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर आह्मां उभयतांसहि संसारापासून वैराग्य प्राप्त झालें. राजानें आमची अशी स्थिति होण्याचें कारण विचारिलें व आम्हींहि आह्मांस पूर्वजन्मींच्या दुःखाची आठवण झाल्याबद्दलची हकीकत सांगितली. त्याबरोबर अगोदरच संसारापासून विरक्तदशेप्रत पावलेलें त्याचें मन या हकीकतीनें जास्तच भयभीत होऊन, त्यानें संसाराचा त्याग करून दीक्षाग्रहण करण्यासंबंधींचा आपला विचार कायम केला. राजस्त्रिया, इतर प्रतिष्ठित शहरवासीजन व सेवकजन, यांनीं त्याचें मन वळविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला असतांहि तो आपल्या निश्चयापासून यत्किंचित्‌हि ढळला नाहीं. नंतर कल्याणमित्र मजकडे वळून ह्मणाला, "बा अभयमती कुमारा, तुझ्या पित्यास वैराग्य प्राप्त झालें असून तो आतां सर्वसंगपरित्याग करून साधुवेष ग्रहण करणार आहे. त्या अर्थीं राज्याचा कारभार तूं आपल्या माथीं घे व प्रजेचें पुत्रवत् पालन कर. वडील मुलगा या नात्यानें हा हक्क तुलाच पोहोंचतो. तेव्हां तूं आपल्या पित्यावरील राज्यभाराचें ओझें आपल्या माथीं घेऊन त्यास इष्टकार्यास मदत कर. तुझ्या उत्तम कर्तव्यांपैकीं हें एक आहे." नंतर राजाकडे वळून शेवटचे चार शब्द मला सांगण्याविषयीं त्यानें विनंति केल्यावरून राजा म्हणाला, "बाळा, मला सांगावयाचें आतां कांहीं राहिलें नसून फक्त मागें एकदां मी माझी कन्या अभयरुचि, हिला अहिच्छत्र नगरच्या राजाचा मुलगा जो अरिदमन कुमार, त्यास देण्याविषयीं वचन दिलें होतें, तेवढें पूर्ण कर. राज्यकारभारासंबंधीं तुला उपदेश देण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. कारण तूं सर्व जाणतो आहेस. विश्वासू प्रधानमंडळाच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालीव ह्मणजे झालें." हें ऐकून मीं आश्चर्यानें मान डोलाविली व उत्तरादाखल म्ह-

घालों, "पिताजी, दुःखमूलक अशा राज्याचा संबंध आतां पुरे. मी पूर्वी यशोधर राजा असतांना राज्य करित होतों त्या वेळीं जीं कर्में केलीं, तीं सर्व संसार वाढविण्यासच कारण झालीं. हें प्रत्यक्ष असतां, आतां पुन्हां तींच कर्में करून संसारभार वाढविण्यांत काय अर्थ आहे? कांहीं विशेष कारणांवरून आपणांस जशी संसारापासून विरक्ति उत्पन्न झाली आहे, तशीच आम्हांसहि आमच्या पूर्वजन्मींच्या वृत्तांतानें झाली असून आतां पुन्हां मीं प्रत्यक्ष दिसत असलेल्या अशा दुःखमूलक राज्याचा अंगीकार करणें, म्हणजे माझें हें वर्तन फारच विलक्षण होईल. सुज्ञ व अज्ञजनांत मग भेद तो काय राहिला? आजपर्यंत अनेक वेळां मीं राज्योपभोग घेतला असेल, परंतु त्यापासून क्षणमात्र तरी आत्म्यास शांति मिळाली व संसारपरिभ्रमण कमी झालें, असें झालें काय? बाबा, मला आतां भोगोपभोगाच्या गोष्टी कांहीं सुद्धां रुचणार नाहींत. कारण हे भोगोपभोग पापाचे सोबती असून धर्माचा नाश करणारे आहेत, व स्वर्गाच्या द्वारास अर्गलेप्रमाणें आहेत. इतकें समजत असूनहि हातांत दिवा धारण करून स्वतः आडांत पडणाऱ्या मूर्ख लोकांप्रमाणें मी जर पुन्हां त्यांत रममाण झालों, तर मला उपमा देण्यालायक दुसरी निंद्य वस्तु सर्व दुनयेंत आढळणें कठीण आहे. आजपर्यंत मायावी आणि मूर्ख लोकांच्या नादीं लागून अज्ञानामुळें भ्रमण केलें तेवढें पुरें. आतां माझ्या सुदैवानें असा अकल्पित सुयोग जुळून आला असून तो सोडून पुन्हां मी नरकाचा मार्ग सुधरूं काय? मी आतां भगिनीसमवेत जिनदीक्षा धारण करून भयंकर तपश्चरण करीन, आणि संसारभ्रमणाचा नाश करून अक्षय्य सुखाची प्राप्ति करून घेईन."

याप्रमाणें मी संसारापासून विरक्त झालों असें पाहून यशोमति राजा माझें मन वळविण्याच्या उद्देशानें मला म्हणाला, "वत्सा, वडील दीक्षा घेतेवेळीं वडील मुलास राज्यमुकुट अर्पण

करून राज्याभिषेक करित असतात, अशी परंपरा आहे; आणि अशी परंपरा चालू ठेवण्यामध्यें फार शहाणपणाचा हेतु आहे. कारण, राज्यावर जर कोणी शास्ता नसेल, तर प्रजेचें पालन कोण करील व राज्यामध्यें शिस्त कशी राहील? सर्वत्र बेबंदशाही माजून 'बळी तो कान पिळी' या न्यायानें जो तो एकमेकांच्या छातीवर बसून त्याचें सर्वस्व हरण करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. नीतिबंधनें नाहींशीं होतील व त्या ठिकाणीं धर्माचें नांव सुद्धां ऐकूं येणार नाहीं. ह्मणून राज्याभिषेकाची परंपरा अवश्य कायम ठेवावयास पाहिजे. सुज्ञ पुरुषांनीं क्षात्रधर्म (राजधर्म) याच कारणाकरितां अवश्य ह्मणून सांगितला आहे. करितां बाळा, तुलाहि त्यांचें अनुकरण करणें जरूर आहे व राज्याभिषेकाची पूर्वपरिपाठी तुला नाकबूल करितां यावयाची नाहीं. राज्यामध्यें अनेक उपाधि असतात, हें मला माहित आहे. तथापि प्रजापालनाकरितां व धर्मरक्षणाकरितां तुला राज्यपद ग्रहण केलेंच पाहिजे. असें जर तूं न करशील तर एक प्रकारें कर्तव्यापासून तूं भ्रष्ट झालास असें होईल. कांहीं दिवसपर्यंत राज्यसूत्रें हातीं घेऊन पुढें अनुकूल परिस्थिति आल्यावर दुसऱ्याचे स्वाधीन तीं करून तुला आपले मनोरथ सिद्धीस नेतां येतील. करितां माझ्या बोलण्याचा पूर्ण विचार करून मग त्यासंबंधीं काय तो निर्णय ठरीव." पित्याचें हें ह्मणणें मला विचारांतीं खरें वाटलें, व त्यांच्या म्हणण्यास रुकार देऊन त्यांचा राज्यमुकुट मीं आपल्या शिरीं धारण केला. या आनंदाप्रीत्यर्थ सर्व शहरवासी जनांनीं मोठा उत्सव केला. गुढ्या, तोरणें उभारून आपलीं घरें शृंगारिलीं. मोठा दीपोत्सव केला. माझें मंगल व्हावें, एतदर्थ मंदिरांतून प्रार्थना वगैरे आनंदाचे अनेक प्रकार सुरू झाले. राजानें राजवाड्यांत मोठा दरबार भरविला व तेथें सर्व नागरिकांसमक्ष माझा राज्याभिषेक करून, मी राजा झालों असल्याबद्दल जाहीर केलें. शहरांत सर्वत्र आनंदीआनंदच दिसूं लागला.

याप्रमाणें माझें राज्याभिषेकाचें कार्य आटोपल्यावर माझ्या पित्यानें आपला मित्र कल्याणमित्र, व इतर प्रधान व शहरवासीजन मिळून पांचशें लोकांसमवेत संन्यास धारण केला, व तो उग्रतर तपश्चरण करिता झाला.

भाग ७ वा समाप्त.

भाग ८ वा.

क्षुल्लक पुढें मारिदत्त राजास म्हणाला, "राजा, पित्यानें याप्रमाणें दीक्षा धारण करून मजकडे राज्यकारभार सोंपविला खरा, परंतु माझें चित्तहि पूर्वभवींच्या वृत्तामुळें उदास होऊन गेलें होतें. त्यामुळें राजकारभाराकडे लक्ष लागेना. संसाराचा छेद करून आत्महित साधण्याकडे दिवसेंदिवस मनाचा जास्त कल होऊं लागला, व विषयप्रीति कमी होत चालली. माझ्या बहिणीचीहि अशीच स्थिति झाली होती. अशा स्थितींत कांहीं दिवस लोटल्यानंतर मीं एके दिवशीं दीक्षा घेण्याचा निश्चय कायम केला, व माझ्या सापत्न मातेचा यशोधन नामेंकरून एक मुलगा होता, त्याचे स्वाधीन सर्व राज्यसूत्रें करून मी भगिनीसमवेत त्याच सुदत्त नामक मुनीपाशीं दीक्षा ग्रहण करण्याकरितां गेलों. त्यांस विनयपूर्वक प्रणाम करून आह्मीं आपला निश्चय कळविला, तेव्हां ते ह्मणाले "बाळांनो, तुमचा विचार ठीक आहे. परंतु मुनिधर्म हा फार कडक असून तो तुमच्या बाल्यावस्थेमुळें सध्यां तुमचे हातून पाळला जाणें फार कठीण आहे. करितां कांहीं दिवसपर्यंत तुह्मीं ब्रह्मचाऱ्याचें व्रत धारण करावें हें बरें." गुरूचें हें ह्मणणें आह्मांस बरें वाटलें. कारण, आह्मीं आपल्या मनांत विचार केला कीं, मुनिमार्गामध्यें कोणकोणत्या अडचणी येतात, आणि त्या निभावण्याइतकी आमच्यामध्यें पात्रता आहे कीं नाहीं, याचें ज्ञान आह्मांपेक्षां साहजिकरीत्या त्यांनाच ज्यास्त आहे, तेव्हां आमच्या अज्ञानानें एकदम पुढील पायरी चढ-

ण्याची हांव धरून ती न गांठतां आल्यामुळें मध्यंतरीच तोंडघशीं पडण्यापेक्षां गुरूनीं दाखविलेल्या क्रमानेंच जाऊन उच्चपदवी हस्तगत करणें श्रेयस्कर आहे. गुरूनीं पोक्त विचारानेंच ही सल्ला आपणांस दिली असेल, तेव्हां अशा वेळीं आपला शहाणपणा चालवून सर्वच गमावून घेण्यांत पुरुषार्थ कोणता? असा विचार करून आह्मीं गुरूंच्या आज्ञेप्रमाणें ब्रह्मचाऱ्याचा वेषच धारण केला. आमच्या गुरूंना तपोबलानें अनेक लब्धि प्राप्त झाल्या आहेत. त्यांचेबरोबर पुष्कळ मुनींचा संघ असून त्या संघासहवर्तमान विहार करित करित आज सकाळीं ते या शहराजवळील एका उद्यानांत उतरले आहेत. संघांतील सर्व मुनींनीं आज गुरूजवळ प्रोषधोपवासाची प्रतिज्ञा घेतली; तें पाहून आम्हांसहि घ्यावीशी वाटून त्याप्रमाणें गुरूंस आह्मीं विनंति केली, तेव्हां ते ह्मणाले, "तुह्मी अद्याप नवीन आहांत, तुम्हांस इतक्यांत प्रोषधोपवास सहन होणार नाहीं. करितां शहरांत जाऊन आहार घेऊन यावा हें बरें." असें त्यांनीं सांगितल्यावरून त्यांच्या आज्ञेप्रमाणें आह्मी उभयतां बहीणभाऊ शहरांत येत असतां वेंशीजवळ तुझ्या शिपायांनीं अडवून आह्मांस तुजकडे आणिलें. राजा, याप्रमाणें आमचें पूर्वचरित्र आहे आणि त्यापासून तुला बराच बोध घेतां येण्यासारखा आहे. आतां तुझ्या इच्छेस येईल तें कर." इतकें बोलून तो अभयमती ब्रह्मचारी स्तब्ध राहिला.

त्या देवळांतील चंडकर्मा देवीहि गुप्तपणें ब्रह्मचाऱ्याचें हें चरित्र मन:पूर्वक ऐकत होती. तें ऐकून तिला वैराग्य उत्पन्न झालें, व एकदम प्रगट होऊन तिनें बली देण्याकरितां बांधून ठेवलेल्या सर्व प्राण्यांस सोडून दिलें. आपल्या वैक्रियिक ऋद्धीनें तिनें तें सर्व वन नंदनवनाप्रमाणें सुशोभित करून मनोहर केलें, स्वत:चा क्रूर वेष टाकून देऊन बहुमोल रत्नमयी आभूषणांनीं आपलें शरीर सुशोभित केलें, पांढरा शालू परिधान केला व सर्वांगास चंदनाची उटी लावून शांत

मुद्रेनें ती त्या ब्रह्मचाऱ्याचें स्वागत करण्याकरितां गंधाक्षता वगैरेंनीं युक्त, असें एक रत्नजडित पात्र आपल्या हातीं घेऊन त्याचेकडे आली. तिच्या स्वरूपांतील हा एकदम पालट पाहून तेथील लोकांना फार आश्चर्य वाटलें व त्यांचेमध्यें त्यासंबंधी चर्चा सुरू झाली. ती देवी त्या ब्रह्मचाऱ्याजवळ येऊन तिनें त्यास साष्टांग नमस्कार केला व त्याची पूजा करून त्यास ह्मणाली, "महाराज, क्षमा करा, मीच ती चंडी देवी व मजकरितांच हा सर्व प्राण्यांचा संहार होत होता, तो आपल्या अकल्पित संयोगानें चुकला. आपल्या चरित्रांतील रहस्य माझे मनावर पूर्णपणें बिंबलें असून मी आजपासून क्रूरता वर्ज्य केली आहे व शांतता धारण केली आहे. आपण आपल्या चरित्रकथनानें आमचेवर फार उपकार केले आहेत. आतां माझ्या आजपर्यंतच्या क्रूर वर्तनानें लागलेल्या दोषांच्या क्षालनाकरितां मीं काय करावयास पाहिजे ह्मणजे त्यांपासून माझी मुक्तता होऊन मी शुद्ध होईन, यासंबंधीं मेहेरबानी करून उपाय दाखवा ह्मणजे मी आपली अत्यंत ऋणी होईन." इतकें बोलून तिनें त्या ब्रह्मचाऱ्याच्या पायावर लोळण घेतली. देवीचें हें अनपेक्षित वर्तन पाहून ब्रह्मचाऱ्यास फार चमत्कार वाटला व त्याबरोबरच तिची ती केविलवाणी स्थिति पाहून त्यास दया आली. त्यानें तिला आशीर्वाद दिला व आपल्या हातानें तिला उठवून तो तिला म्हणाला, "देवी, पापापासून मुक्त होण्यास मुख्य उपाय म्हटला म्हणजे दयामयी जिनधर्माचा अंगिकार करून त्याचें रहस्य समजून घेणें, त्यावर श्रद्धा ठेवणें व त्याप्रमाणें वर्तन ठेवणें, हाच होय. ज्या धर्माचरणापासून यत्किंचित्‌हि हिंसा होईल, तो धर्म नसून अधर्मच समजला पाहिजे. हा जीव संसारामध्यें जीं कर्में बांधून घेतो, त्यांबद्दलचें सुखदुःख त्यास एकट्यासच भोगावें लागतें. त्यास दुसरा कोणी साथीदार होत नाहीं. आणि म्हणून त्यास फार जपून वागावयास पाहिजे. क्षणिक इच्छेच्या पूर्तीकरितां जीवहिंसा



देवी शांत स्वरूपांत प्रगट होऊन ब्रम्हचाऱ्याचें पूजन कारंत आहे.

पृष्ठ ८२.

The 'Lakshmi Art' Bombay.

करून भयंकर कर्मबंध करणें कधींहि बरें नाहीं. त्यापासूनचें सर्व इष्टानिष्ट फल त्यासच भोगावें लागणार, हें निश्चित आहे. तुला हें लवकरच समजून येऊन तूं आपले क्रूर परिणाम सोडून दिलेस व त्याप्रमाणें सर्व प्राण्यांना मुक्त केलेंस, ही फार चांगली गोष्ट झाली. आतां फक्त जिनेश्वरांनीं सांगितलेल्या तत्वांचें चिंतवन कर म्हणजे तुझें कल्याण होईल." हें ऐकून देवी पुन्हां म्हणाली, "महाराज, मला यांतून मुक्त होण्यास आतां मुनिव्रताशिवाय दुसरा तरणोपाय दिसत नाहीं. करितां तें देऊन मला कृतार्थ करावें." ब्रह्मचाऱ्यानें उत्तर दिलें, "देवी ! नारक, तिर्यंच व देव, या योनींमधील जीवांस मुनिव्रत घेतां येत नाहीं. करितां तूं श्रावक धर्माचाच अंगिकार करून तदनुसार चाल म्हणजे पुरें आहे." देवीनें यावर श्रावकधर्म ग्रहण केला व तिचें चित्त फार संतुष्ट झालें. ब्रह्मचाऱ्याच्या या उपकाराबद्दल कांहीं तरी उतराई व्हावें म्हणून ती त्यास म्हणाली, "महाराज, आपण मला धर्मदान देऊन पवित्र केलें, याबद्दल मी आपली फार ऋणी आहें. मला प्रज्ञप्ति नांवाची एक महाविद्या अवगत आहे ती आपणास अल्प गुरुदक्षिणा म्हणून देऊं इच्छितें, तरी ती ग्रहण करून या दीन दासीवर आपण अनुग्रह कराल अशी आशा आहे." ब्रह्मचाऱ्यानें उत्तर दिलें, "देवयोनीमधील तूं असूनहि मला मानवाला नमस्कार केलास हेंच जास्त आहे. दयामयी धर्माचें महत्व समजून घेऊन त्याचा तूं अंगिकार केलास ही फार समाधानाची गोष्ट आहे; आणि तीच मला दक्षिणेच्या ठिकाणीं आहे. आम्हां जैन यतींस मंत्रतंत्रादि शिकून काय करावयाचें आहे ? आम्हांस जर कोणती आशाच नाहीं, तर तुझ्या विद्येपासून आम्हांस लभ्यांश कोणता ? आम्हांस एकच लभ्य आहे आणि तो निर्वाण होय. तो तुझ्या या विद्येनें मिळेल काय ?" देवी हें ऐकून निरुत्तर झाली. नंतर मारिदत्त राजाकडे वळून ती म्हणाली, "राजा, आजपासून

केव्हांहि तुझ्या राज्यांत हिंसा होऊं नये, अशा तऱ्हेचा तूं आपल्या प्रजाजनांस हुकूम सोड. तुझ्या हुकुमाचा अंमल जर न होईल तर तुझ्या राज्यांतील लोक अनेक तऱ्हेच्या व्याधींनीं ग्रस्त होऊन पीडित होतील. तुझ्या देशांत दुर्भिक्षादि महान् उपद्रव वरचेवर सुरू होतील. करितां अशी वाईट परिणामी हिंसा कधीं न होईल, याचा तूं आपल्या राज्यांत कडक बंदोबस्त कर." देवीचें हें भाषण सर्वांनीं मान्य केलें.

या सर्व अनपेक्षित रीतीनें घडलेल्या प्रकारानें मारिदत्त राजाच्या परिणामांमध्यें भयंकर उत्क्रांति घडून आली होती. मुखावरील ते क्रूरतादर्शक विकार पार मावळून जाऊन त्या ठिकाणीं शांततेचें एक अपूर्व तेज विलसत होतें. त्याची ती पूर्वीची भव्य मुद्रा शांततेच्या अधिष्ठानामुळें जास्तच खुलून दिसूं लागली. ब्रह्मचाऱ्याचा हा अलौकिक प्रभाव पाहून त्याचेविषयीं राजाचे मनांत फारच आदरभाव उत्पन्न होऊन त्यानें त्याची यथोचित स्तुति केली व त्यास मुनिधर्म ग्रहण करण्याविषयींचा आपला मनोदय कळवून त्याची दीक्षा देण्याविषयीं त्यास विनंति केली. तेव्हां ब्रह्मचारी म्हणाला, "राजा, मला दीक्षा देण्याचा अधिकार नाहीं. आमचे गुरु सुदत्ताचार्य हे जवळीलच एका वनांत आहेत. तिकडे चला, म्हणजे ते आपल्या मनाप्रमाणें सर्व घडवून आणतील." राजास हें ब्रह्मचाऱ्याचें म्हणणें पटलें, व तो त्याचेबरोबर त्या वनाकडे जाण्यास निघाला. हें पाहून तेथील देवी, भैरव जोगी व इतर सभासदगण हेहि त्याचेबरोबर जाण्यास निघाले.

इकडे सुदत्ताचार्य मुनींनीं आपले दोघे शिष्य, ब्रह्मचारी व आर्यिका, आहाराकरितां शहरांत गेलेले अद्याप कां परत आले नाहींत, त्यांस इतका उशीर कां लागला, याविषयीं आपल्या मनाशीं शोध केला. तेव्हां त्यांस अवधिज्ञानाच्या[1] योगानें सर्व वस्तुस्थिति कळून येऊन

---

[1] मर्यादित क्षेत्रांतील रूपी पदार्थांना प्रत्यक्ष जागणें.



सुदत्ताचार्य मुनी आपल्या दिव्य ज्ञानानें सर्वांची भवावली सांगत आहेत. पृष्ठ ८५.

The Lakshmi Art Bombay

एका प्रकारें उत्तम शेवट लागल्याचें पाहून त्यांस फार समाधान वाटलें. इतक्यांत तो ब्रह्मचारीहि मारिदत्तराजा, चंडिकादेवी, भैरवजोगी व इतर सभासदगण यांसमवेत त्या ठिकाणीं येऊन दाखल झाला. येतांच पहिल्यानें त्यानें मुनींस साष्टांग प्रणिपात केला. इतर मंडळीनेंहि त्याचें अनुकरण केलें व ते सर्व आपापल्या स्थानीं मुनींच्या तोंडून धर्मोपदेश श्रवण करित बसले. नंतर कांहीं वेळानें मारिदत्त राजानें मुनिवर्यांस "यशौघ, चंद्रमति, यशोधर, अमृतादेवी, यशोमती, कुसुमावलि, चंडीदेवी, मी, तुम्ही, कल्याणमित्र, भैरवजोगी, कुबडा, म्हैस वगैरे तेरा जणांच्या संयोगाचें कारण काय व त्यांची भवावलि काय आहे," असा प्रश्न केल्यावरून महाराज बोलते झाले: "राजा, या भरत क्षेत्रांत गंधर्व नांवाचा एक देश असून तेथें गंधर्व नामें एक राजा आपल्या विद्याश्री नामक राणीसह राज्य करित असे. त्याला गंधर्वसेन नामक एक पुत्र व गंधर्वश्री नामें एक कन्या, अशीं दोन अपत्यें होतीं. त्या राजाचे पदरीं रामा नामें एक प्रधान असून त्यास चंद्रलेखा नामें एक सुलक्षणी स्त्री होती. तिच्यापासून जितशत्रु व भीम नामें दोन मुलें त्यास झालीं. एके वेळीं राजानें आपली कन्या गंधर्वश्री ही उपवर झालीसें पाहून स्वयंवर मांडिलें; व त्या स्वयंवरांत कर्मधर्मसंयोगानें राजकन्येनें प्रधानपुत्र जितशत्रु यासच माळ घातली. नंतर राजानें मोठ्या थाटानें त्या उभयतांचा विवाह करून देऊन आपल्या मुलीची रवानगी केली व हें विवाहित जोडपें आनंदानें कालक्रमणा करूं लागलें.

"एके वेळीं गंधर्व राजा शिकार करण्याकरितां आपल्या परिवारजनासह एका वनांत गेला असतां, तेथें त्यानें एका हरिणास पाहून त्यावर आपला बाण फेंकला. जवळच त्याची मादीहि बसली होती. तिनें आपल्या पतीच्या अंगावर बाण येत आहेसा पाहून त्याचे प्राण वांचविण्याकरितां फारच त्वरेनें ती त्याचे ठिकाणीं येऊन तिनें तो

बाण आपल्या अंगावर घेतला. तो बाण तिच्या अंगामध्यें घुसल्यामुळें अर्थातच तिचे प्राण जाऊन ती अचेतन होऊन पडली. तिच्याजवळ असलेल्या हरिणानें तिची ही अवस्था पाहिली मात्र, तोंच, तें भीतीनें गर्भगळित होऊन बेफाम पळत सुटलें. बिचाऱ्यास पळतां पळतां भुई थोडी झाली. इकडे राजास शिकार साधलीसें पाहून फार आनंद झाला व ती मृत हरिणी आपल्या नोकराच्या पाठीवर देऊन तो शहराकडे परत जाण्यास निघाला. कर्मधर्मसंयोगानें वाटेंतच तें पळत सुटलेलें हरिण त्यास भेटलें. त्याची ती दुःखद अवस्था पाहून त्यास फार वाईट वाटलें व पश्चात्ताप करित तो म्हणाला, "म्यां मूर्खानें कसलें हें अनुचित कार्य केलें ? कार्य, अकार्य याचा मीं कांहींच विचार केला नाहीं व अखेर या हरिणाच्या जोडप्याचा वियोग करून पापाचा भागीदार मात्र मी बनलों. धिक्कार असो मला! परजीवाचा नाहक घात करविणारी ही शिकार केवळ नरकाचा मार्ग होय!" अशा तऱ्हेनें पश्चात्ताप करित तो घरीं परत आला व आपल्या पुत्रास राज्याभिषेक करून संन्यास धारण करण्याकरितां त्यानें वनाची वाट धरिली.

"इकडे गंधर्वसेनानें पित्याचे पश्चात् उत्तम रीतीनें राज्य चालवून प्रजेस सुखी केलें व त्यायोगें त्याचा नांवलौकिक चोहोंकडे वाढला. त्याची विभूतिहि पुष्कळ वाढली. एके वेळीं त्यास आपल्या पित्याच्या दर्शनाची इच्छा उत्पन्न होऊन त्याकरितां तो ज्या ठिकाणीं ते तपश्चरण करित राहिले होते, त्या वनामध्यें आपल्या ऐश्वर्यासह गेला व त्यांस नमस्कार करून एकीकडे जाऊन बसला. आपल्या मुलाचें तें वाढतें ऐश्वर्य पाहून गंधर्व मुनींचें मन चलबिचल झालें व असा सुखोपभोग घेण्याऐवजीं व्यर्थ हा वेष आपण धारण केला, असें त्यास वाटूं लागलें. नंतर कांहीं वेळानें गंधर्वसेनराजा आपल्या पित्याची परवानगी घेऊन घरीं परत आला.

"इकडे तो भेटल्यापासून गंधर्वमुनीचें मन तपश्चरणाकडे लागेना व मनामध्यें अस्वस्थता उत्पन्न होत चालली. त्याचा अखेर परिणाम असा झाला कीं, मरणसमयीं त्यानें पुढील जन्मीं अशीच विभूति प्राप्त होवो, असें निदान बांधलें व त्यायोगें तो उज्जयिनी नगरांत यशोबंधु राजाचा यशौघ नामें पुत्र होऊन जन्मला. कर्मगति किती विलक्षण आहे पहा! चिंतामणी रत्न हातीं आलें असतांहि अज्ञानानें त्याची किंमत न ओळखून त्यानें तें फेंकून दिलें. ज्या तपश्चरणापासून अविनाशी मोक्षलक्ष्मी प्राप्त व्हावयाची, ती त्या मूर्खानें सोडून देऊन ऐहिक नाशवंत ऐश्वर्याची इच्छा केली. संसाराचें मोहपटल असेंच कांहीं विलक्षण आहे आणि ज्यानें तें सारण्याचें—त्यापासून अलिप्त राहण्याचें—धैर्य दाखविलें, तोच खरा वीर समजला पाहिजे. असो.

"गंधर्वराजाची स्त्री विंध्यश्री, हिचेंहि मन संसारापासून विरक्त होऊन तिनें थोड्याच दिवसांत आर्यिकेची दीक्षा धारण केली व मरणोत्तर ती अजितांगद राजाची चंद्रमती नामें कन्या होऊन जन्मली. पूर्वजन्मसंस्कारामुळें यशौघ राजाशींच तिचा विवाहसंबंध घडून आला.

"गंधर्वराजाची कन्या गंधर्वश्री, जिचा विवाह प्रधानपुत्र जितशत्रूशीं झाला होता, ती आपला दीर जो भीम त्यावर आसक्त झाली. आपल्या स्त्रीचें हें व्यभिचारित्व जितशत्रूस पुढें कांहीं दिवसांनीं कळून आलें. तेव्हां त्यास संसारापासून विरक्तता प्राप्त होऊन त्यानें मुनिदीक्षा धारण केली व कांहीं दिवसपर्यंत तपश्चरण करून अंतसमयीं समाधि मरण साधल्यामुळें मरणोत्तर तो, यशौघ राजाची पत्नी जी चंद्रमती, तिच्या पोटीं यशोधर नामें पुत्र होऊन जन्मला. जितशत्रूचा पिता जो रामा प्रधान, त्यासहि आपल्या सुनेचें दुश्चरित्र कळल्यामुळें संसाराचा कंटाळा येऊन आपल्या स्त्रीच्या विचारें त्यानें आजन्म ब्रह्मचर्यव्रत घेतलें व गृहस्थावस्थेंतच राहून धर्माचरणांत सं-

पूर्ण आयुष्य व्यतीत करून मरणोत्तर विजयार्ध पर्वतावर तो विद्याधर होऊन जन्मला. त्याच्या स्त्रीनेंहि आपलें शेष आयुष्य धर्माचरणांत पूर्ण करून मरणोत्तर ती त्याच विद्याधराची स्त्री होती झाली.

"राजा गंधर्वसेनाच्याहि कानावर क्रमानें आपल्या बहिणीच्या दुर्वर्तनासंबंधाची हकीकत आली, तेव्हां त्यासहि वैराग्य प्राप्त होऊन त्यानें संसारपरित्याग केला व उग्र तपश्चरण करून अंतसमयीं निदान बांधल्यामुळें त्याचा जीव तूं चित्रांगद राजाचा पुत्र मारिदत्त राजा होऊन जन्मला आहेस.

"गंधर्वश्रीसहि पुढें आपल्या दुर्वर्तनासंबंधीं पश्चात्ताप उत्पन्न होऊन तिनें आर्यिकेचा वेष धारण केला व तपश्चरणानें आपलें शरीर कृश करून मरणोत्तर ती विमलवाहन राजाची अमृतादेवी नामें कन्या होऊन जन्मली. दैवयोगानें हिचेंच पाणिग्रहण यशोधर राजानें केलें. दुराचरणी प्रधानपुत्र भीम हा मृत्यूनंतर कुबडा व महारोगी होऊन जन्मला, परंतु त्याच्या गुणावर लुब्ध होऊन यशोधर राजानें त्यास आपल्या एका हत्तीवरील महात केलें. पूर्वसंस्कारामुळें अमृतादेवी याच्याशींच पुन्हां आसक्त झाली.

"यशौघ राजास चंद्रलक्ष्मी नामेंकरून एक राणी चंद्रमतीस सपत्नी होती. राजाचें तिच्यावर फार प्रेम जडलें होतें. ती चंद्रमतीचा अहर्निश द्वेष करित असे. शेवटपर्यंत त्या दोहोंमधील वैर असेंच कायम राहिल्यामुळें मृत्यूनंतर चंद्रलक्ष्मी ही एका घोडीच्या जन्मास गेली. ती फार चपळ असल्यामुळें यशोमती राजानें शिकारीकरितां तिला आपलेजवळ बाळगिलें होतें. चंद्रमतीनें मृत्यूनंतर कांहीं योनी धारण करून म्हशीच्या जन्मास जेव्हां ती गेली, तेव्हां, एका सौदागराच्या पदरीं ती राहिली होती. एके वेळीं विक्रयाकरितां कांही माल त्या सौदागरानें तिच्या पाठीवर लादून तो तिला उज्जयिनी शहराकडे घेऊन येत असतां, भर दोन प्रहर झाल्यामुळें, त्या शहराजव-

ळीलच एका सरोवरावर तो विसांवा घेण्याकरितां उतरला. कर्मधर्मसंयोगानें यशोमती राजाची ती घोडीहि त्या वेळीं त्या ठिकाणीं पाणी पिण्याकरितां आली होती. त्या दोहोंची नजरानजर झाली मात्र, तोंच त्यांचेमधील पूर्ववैर जागृत होऊन दोघेहि एकमेकांच्या अंगावर धांवले व त्या झटापटींत म्हशीनें त्या घोडीच्या छातीमध्यें आपलीं शिंगें भोंसकून तिचा प्राण घेतला. मरणोत्तर ती मिथुलापूर नगरींतील जिनदत्त श्रावकाच्या गाईच्या पोटीं बैल होऊन जन्मली. पुढें त्या बैलाच्या सर्वांगास एक प्रकारचा रोग व्यापल्यामुळें तो मरणोन्मुख होऊन एके दिवशीं अंगणांत पडला असतां, जिनदत्त श्रावकास त्याची ती अवस्था पाहून फार दया आली व त्याचा पुढील भव सुधारण्याच्या शुभेच्छेनें, त्यानें त्याच्या कानाशीं णमोकार मंत्राचा जप सारखा सुरू ठेवला. त्या बैलानेंहि त्या मंत्राचे ठिकाणीं एकाग्रता केली होती व अखेर तशा अवस्थेंतच त्याचें देहावसान होऊन तो, तुझी स्त्री जी रुक्मिणी, तिच्या गर्भांत येऊन राहिला आहे. योग्य समयीं ती प्रसूत होऊन तिच्या कुक्षींतून तो पुत्र होऊन जन्मेल व मोठा पराक्रमी निपजेल.

"तो विद्याधर व त्याची स्त्री, या उभयतांनीं धर्माचरणांत आपलें आयुष्य पूर्ण केलें व मरणोत्तर तो विद्याधर यशोधर राजाचा यशोमती नामें पुत्र होऊन जन्मला व त्याची स्त्री विद्याधरी ही कुसुममाला नामें तुझी बहीण होऊन जन्मली. पूर्वजन्मींच्या पतिपत्नींच्या संबंधामुळें या जन्मींही यशोमती राजाशीं तिचा विवाहसंबंध घडून आला व त्यानें तिला पट्टराणीचें पद दिलें.

"तुझा पिता चित्रांगद राजा, हा मिथ्याधर्मी असून बरेच दिवसपर्यंत त्यानें आपलें राज्य चालविल्यानंतर, त्यास उपरति होऊन त्यानें तें राज्य तुझ्या स्वाधीन केलें व आपण संन्यास घेऊन अज्ञानपूर्वक तप व कायक्लेश करूं लागला. कर्मधर्मसंयोगानें एके वेळीं तो फिरत

फिरत तुझ्या नगरास आला असतां, त्यास एका देवीच्या देवळामध्यें शहरवासीजन त्या देवीची मोठ्या उत्सवपूर्वक पूजा करित असलेले नजरेस पडले. तो भपका पाहून त्याचें मन चलबिचल झालें व अशीच विभूति पुढील जन्मीं आपणासहि प्राप्त व्हावी, असें त्यानें निदान बांधिलें. यामुळें मरणोत्तर देवी होऊन तो जन्मला. तीच ही चंडीदेवी होय.

"तुझी आई चित्रलेखा, हिनें अनेक प्रकारचें मिथ्याचरण केल्यामुळें मरणोत्तर ती भैरवनामें जोगी होऊन जन्मली आहे.

"माझी स्वतःची कथा अशी आहे कीं, मी पूर्वीं उज्जयिनीचा यशोबंधु नामक राजा होतों. पहिल्यानें कांहीं दिवसपर्यंत जैनधर्मीय उच्च तत्वांचें मला ज्ञान न झाल्यामुळें अन्यधर्मावर माझी श्रद्धा राहून त्याप्रमाणें मी चालत असें. परंतु पुढें जैनधर्माचीं तत्वें कळून आल्यावर मीं त्याचा अंगिकार केला व त्यावर अचल श्रद्धा ठेवून त्यांतील व्रतनियमादिकांचें यथाशक्ति ग्रहण केलें. पुढें तो भव पूर्ण करून कलिंग देशाच्या भगीरथ राजाच्या स्त्रीच्या पोटीं सुदत्त नामें पुत्र होऊन जन्मलों. या भवांत कांहीं दिवसपर्यंत मीं राज्यकारभार केला व एके समयीं कांहीं निमित्तानें मला वैराग्य प्राप्त होऊन मीं हा वेष धारण केला.

"उज्जयिनीमध्यें यशौघ राजाचा सत्यधर्मप्रतिपालक, विचारी व राजनीतिकुशल, असा गुणसिंधु नामें एक प्रधान होता. बरेच दिवसपर्यंत त्यानें प्रधानकीचें उत्तम रीतीनें काम केल्यावर त्यास त्या कामाचा कंटाळा येऊन धर्मसाधनांत आपला सर्व वेळ व्यतीत करावा, असें त्यास वाटूं लागलें; व त्याकरितां राजाच्या संमतीनें त्यानें आपला पुत्र जो नागदत्त, त्यास आपल्या जागेवर नेमून गृहस्थाश्रमामध्येंच धर्माचरणांत शेष आयुष्य संपवून धर्मध्यानांत आपला देह ठेविला. तो मरणोत्तर त्याच नगरींतील श्रीभूति नामक श्रेष्टीचा कल्याणमित्रनामें पुत्र होऊन जन्मला. पूर्वसंस्कारामुळें यशोमती राजाशीं त्याचा हल्लीं फार चांगला स्नेह जमला आहे."

याप्रमाणें सुदत्ताचार्य मुनींच्या तोंडून सर्वांची भवावलि ऐकून मारिदत्त राजास वैराग्य उत्पन्न झालें व त्यानें आपणास दीक्षा देण्याविषयीं मुनींस विनंति केली. मुनींनींहि त्याची ती विनंति मान्य केली व त्याप्रमाणें आपण आपलें राज्य मुलाच्या स्वाधीन करून दीक्षा ग्रहण करिता झाला.

यानंतर भैरवानंद कौलिकानेंहि आपणांस दीक्षा मिळावी म्हणून मुनींस विनंति केली; परंतु मुनि म्हणाले, "तुझी अंगुली खंडित झाली आहे त्याअर्थी तुला दीक्षा घेतां येणार नाहीं. खंडावयवी लोकांस मुनिदीक्षा घेण्याचा अधिकार नाहीं. तरी तूं श्रावकधर्मच ग्रहण करून त्याप्रमाणें आचरण कर. तुझें आयुष्य आतां फक्त बावीस दिवसांचें उरलें आहे. तेव्हां या थोड्या अवधींतच जिनधर्माचे ठिकाणीं दृढ श्रद्धा ठेवून व्रताचरणानें उत्तम रीतीनें धर्मसाधन कर." हें ऐकून त्या कौलिकानें मुनीच्या आज्ञेस अनुसरून तत्काळ श्रावक धर्माचा अंगिकार केला व अंतसमयीं संन्यासवृत्ति धारण करून दर्शन,ज्ञान, चारित्र व तप या चार आराधनांच्या चिंतवनामध्यें आपला देह ठेविला. या धर्मध्यानाच्या योगानें तो मरणोत्तर तिसऱ्या स्वर्गांत ऋद्धिधारक देव होऊन जन्मला, व त्या ठिकाणीं अनेक प्रकारचे कल्पवृक्षजनित सुखोपभोग घेता झाला.

नंतर अभयरुचि व अभयमति या दोघां बहिणभावंडांनींहि मुनीपाशीं दीक्षा ग्रहण केली. अभयमति दीक्षा ग्रहण करून वनांत तपश्चरण करूं लागला व अभयरुचि महाव्रतें धारण करून पूर्वीच आर्यिकेची दीक्षा घेतलेल्या आपल्या मातोश्रीसंनिध राहती झाली. पुढें आपला अंतसमय जवळ आलासें पाहून त्या उभयतांनीं यावज्जीव आहाराचा त्याग केला व धर्मध्यानामध्यें त्यांनीं आपले देह ठेविले. त्यायोगें ते दोघेहि ऐशान स्वर्गांत ऋद्धिधारक देव होऊन जन्मले, व तेथील दिव्य सुखाचा अनुभव घेत सप्तधातुविरहित निर्मल देहाला धारण करणारें असें तें देवयुग्म आनंदानें काल व्यतीत करूं लागलें.

सुदत्ताचार्य मुनींनीं आपलें शेष आयुष्य विंध्यगिरीवर तपश्चरणामध्यें व अज्ञ संसारी जनांस उपदेश देण्यामध्यें घालविलें. अंतसमयीं शरीरावरील ममत्व व आपले रागद्वेषादि कषाय क्रमाक्रमानें कमी करित जाऊन (या क्रियेलाच जैनशास्त्रांत 'सल्लेखना' अशी संज्ञा आहे) शुभध्यानपूर्वक त्यांनीं आपला देह ठेविला व मरणोत्तर लांतव नामक स्वर्गामध्यें ते महर्द्धिक देव होऊन जन्मले.

यशोमती राजा, कुसुमावलि, मारिदत्त राजा आणि कल्याणमित्र, या सर्वांनीं दीक्षा धारण केली होतीच; त्यांनीं तपःसामर्थ्यानें झालेल्या आपापल्या कर्मक्षयानुसार मरणोत्तर निरनिराळे शुभ पर्याय धारण केले.

यावरून सद्धर्माचा अंगीकार केल्यानें जीवास कशी सुखप्राप्ति व परलोकीं सद्गति होते, व मिथ्यामार्गाच्या नादीं लागून पापमूलक आचरण करण्यानें परलोक कसा बिघडतो व किती भयंकर दुःखें भोगावीं लागतात, हें उत्तम रीतीनें कळून येण्यासारखें आहे. संसारामध्यें अज्ञ जनांवर अशा अनेक बाह्यतः मोहक, परंतु परिणामीं पापकारक गोष्टींचा पगडा बसून नानातऱ्हेचे अत्याचार त्यांचे हातून होतात. त्यांनीं या चरित्राचें नीट मनन करून यापासून योग्य तो बोध घ्यावा.

शेवटीं,

"जैनेन्द्रं धर्मचक्रं प्रभवतु सततं सर्वसौख्यप्रदायि"

असें इच्छून व तसें होण्याविषयीं श्रीजिनेंद्रचरणीं प्रार्थना करून मी हें अल्पचरित्र संपवितों.

समाप्त.